मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद


भारतीय सौर चैत्र- ज्येष्ठ १९३४

एप्रिल-जून २०१२/ खंड ३६, अंक १

## भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक







लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

International Research Journal मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

ISSN 0973-8452
Reg.No. 31918/77

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

www.marthpari.org

एप्रिल-जून २०१२ / खंड ३६ अंक १

प्रमुख संपादक
अविनाश रामलाल निकम

---

सहाय्यक संपादक
शंकर सुदामराव पवार

---

सल्लागार मंडळ
(२०१२-१५)
प्रशांत काटोले
अशोक खाचणे
राहूल म्होपरे
अशोक हळ्ळी

---

संपादकीय पत्रव्यवहार
डॉ.अविनाश रामलाल निकम
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार.
मोबा: ९८२२६६५१४१

*लेखातील मते लेखकांचीच*

## भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक

*अंतरंग*

भारतीय अर्थव्यवस्था आणि संरचनात्मक बदल
भारतीय पर्यटन उद्योग
भारतातील बेकारी
भारतातील दारिद्र्य
भारतातील मानव विकास निर्देशांक
भारतातील उर्जा संसाधन
भारताच्या राष्ट्रीय उत्पन्न बदलाच्या प्रवृत्ती
भारतीय कृषी उत्पादकता
भारतीय कृषी किंमत धोरण
भारतीय अन्नसुरक्षा
भारतातील कृषी क्षेत्रातील कर्जबाजारीपणा
शेतकऱ्यांच्या आत्महत्या
भारतीय लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांचा विकास
किरकोळ बाजारात मोठ्या कंपन्यांचा प्रवेश
भारतीय बँकींग क्षेत्र

मराठी अर्थशास्त्र परिषद
कार्यकारी मंडळ २०१२-१३
अध्यक्ष
कैलास काशिनाथ पाटील (परभणी)
कार्याध्यक्ष
चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)
कार्यवाह खजिनदार
अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)
प्रमुख संपादक-अर्थसंवाद
अविनाश रामलाल निकम (शहादा)
विश्वस्त
ज.फा. पाटील (कोल्हापूर)
मधुकर शिंदे (इस्लामपूर)
सूर्यकांत जगदाळे (उस्मानाबाद)
सदस्य
महंमद रफिक मुलाणी (बारामती)
तानाजी भोसले (सांगली)
श्रीरंग मंडले (सिंधुदूर्ग)
श्रीराम जोशी (जळगाव)
सुरेश ढाके (डोंगरकठोरे)
हरिहर तिवारी (वाशीम)
रामकृष्ण टाले (नागपूर)
तुकाराम मुंडे (परभणी)
बालाजी शिंदे (परभणी)
मधुकर खंदारे (औरंगाबाद)
वसंत पाटील (स्थानिक कार्यवाह) भुसावळ

अक्षर रचना:
सुनिल भांडारकर, शहादा.
मुद्रणालय:
सातपुडा ऑफसेट, जळगाव.

● कार्यालयीन पत्रव्यवहार:
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक: अनिल बाबुराव सूर्यवंशी
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,
बार्शी - ४१३ ४११, जि. सोलापूर.
दूरध्वनी: ०२१८४-२२४२१४,
भ्रमणध्वनी: ८८०५६११४०६

● वर्गणी:

▪ परिषदेचे सदस्य:
आजीव सदस्य: रु.२०००/- (एकरकमी)

▪ संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)

▪ वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च

▪ संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
▪ कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
▪ अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
▪ **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**

● अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:
१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली.
२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
*टिप:* म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक

## अनुक्रमणिका


- संपादकीय संवाद ........ ३
- अविनाश रामलाल निकम, शहादा: भारतातील पर्यटन उद्योग ........ ५
- शिवाजी मुरलीधर भोसले, विटा: अर्थव्यवस्थेतील शेती जलसिंचनाची भूमिका ........ १०
- अर्जुन एस. पाटील, कोपार्डे: शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती व आत्महत्या ........ १५
- विद्या म्होपरे, कोल्हापूर; जी.डी. जाधव, विटा: भारतातील उर्जा स्थिती ........ २१
- युगंधरा एस. टोपरे, औरंगाबाद: भारतीय अर्थव्यवस्थेतील वित्तीय समावेशन ........ २६
- रामलिंग कुंडलिक नाळे, सरूड: भारतातील अन्नसुरक्षा-एक मंथन ........ ३१
- आर. जी. रसाळ, प्रवरानगर: भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या ........ ३५
- शकुंतला पाटील, इचलकरंजी: शेती क्षेत्रातील कर्जबाजारीपणा ........ ३९
- अलका अनिल मानकर, नांदुरा रेल्वे: शेतकऱ्यांच्या आत्महत्या ........ ४३
- राजू कथ्थू शिंदे, देवपूर: शेतकऱ्यांच्या आत्महत्या-एक अभ्यास ........ ४७
- पी. आर. कुलकर्णी, अंबाजोगाई: भारतातील सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम ........ ५०
- नारायण चिंतामण पाटील, लासूर: आव्हान - वित्तीय तूट नियंत्रणाचे ........ ५४
- एम. जे. गायकवाड, नंदुरबार: 'रोहयो'चा स्त्री-रोजगारावर प्रभाव ........ ५७
- वंदना भगवान देवकर, जयसिंगपूर: अन्नसुरक्षा-काळाची गरज ........ ६३
- गजानन भाकरे, कोल्हापूर: महागाईतील सरकारी धोरण व रिझर्व्ह बँक ........ ७०
- दीपक भुसारे, पैठण, शिवाजी अंभोरे, औरंगाबाद: विकासात गुंतवणुकीचे योगदान ........ ७२
- आय. ए. निरगुडे, श्रीरामपूर: भारतीय बँकींग क्षेत्र ........ ७७
- माधुरी प्रदीप लेले, नागपूर: नवीन आर्थिक धोरणाचे द्विदशक ........ ८२
- दिनकर टकले, परतूर: भारतीय अन्नसुरक्षा - सद्यस्थिती ........ ८६
- चंद्रकांत माळी, माणगाव, हिरालाल चव्हाण, जळगाव: विदेश व्यापार-रचना व दिशा. ९१
- जितेंद्र दगडू तलवारे, धुळे: भारतातील अन्नसुरक्षा- एक समस्या ........ ९८
- जे. एस. इंगळे, लोणंद: भारतातील दारिद्र्याची समस्या ........ १०२

## मराठी अर्थशास्त्र परिषद

# छत्तीसावे राष्ट्रीय अधिवेशन

## भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओं.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे छत्तीसावे राष्ट्रीय (वार्षिक) अधिवेशन भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओं.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ, जि.जळगाव येथे २२, २३ व २४ नोव्हेंबर २०१२ या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. अधिवेशनाच्या संयोजकाकडून परिषदेच्या सदस्यांना निमंत्रण व माहिती पत्रक पाठविण्यात येईल. अधिवेशनासाठी प्रतिनिधी शुल्क रु.८००/- आहे. जे परिषदेचे सदस्य नाहीत त्यांना साधारण सदस्य शुल्क रु.३००/- अतिरिक्त भरून सहभागी होता येईल. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय यापूर्वीच निश्चित करण्यात आले आहेत.

१) जोसेफ स्टिगलीश यांचे अर्थशास्त्रातील योगदान

२) भारतातील भाववाढीची चिकित्सा

३) महाराष्ट्रातील जलधोरण

आयत्या वेळेचा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असून तो परिषदेच्या मा.अध्यक्ष अधिवेशनापूर्वीच जाहीर करीत आहेत. चौथ्या विषयासाठी शोधनिबंध मागविले जात नाहीत.

***चौथा विषय : दारिद्र्यरेषेची वास्तविकता***

परिषदेस उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

डॉ. कैलास पाटील
अध्यक्ष

प्रा. चारुदत्त गोखले
कार्याध्यक्ष

प्राचार्या डॉ. मिनाक्षी वायकोळे,
स्थानिक कार्याध्यक्षा
मोबा: ९९२२२५१८९७

डॉ. अनिल सूर्यवंशी
कार्यवाह-खजिनदार

प्रा. व्ही. डी. पाटील
स्थानिक कार्यवाह
मोबा: ९८९०७०७५३१

डॉ.अविनाश निकम
संपादक, अर्थसंवाद

# संपादकीय संवाद

## " सुजलाम् ! सुफलाम् !! "

असं भारतीय अर्थव्यवस्थेचं वर्णन नेहमी केलं जातं. 'सुजलाम् सुफलाम्' याचा अर्थ नैसर्गिक साधनसामुग्रीने समृध्द असलेला प्रदेश होय. हे वर्णन भारतीय अर्थव्यवस्थेबाबत कितपत खरं ठरतं असा प्रश्न निर्माण होणं स्वाभाविक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचं अध्ययन करताना एक बाब लक्षात घ्यावी लागते की सुपीक जमिनीचा विस्तीर्ण प्रदेश, नद्या-तलावांच्या रूपानं प्रचंड जलसंपत्ती, अथांग समुद्रकिनारे, अनेक प्रकारची खनिजे, स्वच्छ सूर्यप्रकाश या रूपाने निसर्गानं भरभरून वरदान दिलं म्हणून या भूमीला 'सुजलाम् सुफलाम्' म्हणता येणार नाही. देशात उपलब्ध नैसर्गिक साधनसामुग्रीचा उपयोग पर्याप्त प्रमाणात विकासासाठी करता आला पाहिजे. नैसर्गिक साधनसामुग्रीला पुरेसे भांडवल व लोकसंख्येची जोड देता आली पाहिजे. उपक्रमशीलतेची जोड देता आली पाहिजे. अन्यथा नैसर्गिक संपन्नता असूनही अर्थव्यवस्थेतील बहुसंख्य लोकांच्या वाट्याला दारिद्र्य आलेलं दिसेल. निसर्गाच्या संपन्नतेतून लोकांचं जीवन समृध्द झालं आहे का? सर्वसामान्यांची राहणीमान पातळी सुधारली आहे का? दरडोई उत्पन्नावर किती सकारात्मक परिणाम झाला? शहरी-ग्रामीण दारिद्र्याची पातळी घटली का? अशा प्रश्नांसदर्भात 'सुजलाम् सुफलाम्'चा अर्थ शोधावा लागेल.

नव्या मुक्त आणि स्पर्धायुक्त जगाच्या आर्थिक वातावरणात कोणत्याही राष्ट्राला एकटं राहणं परवडणारं नव्हतं. माजी अर्थमंत्री डॉ.मनमोहनसींग यांनी खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या धोरणांचा अवलंब करून विकासाच्या वाटांचा शोध घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे अर्थव्यवस्थेला स्पर्धेचे फायदे मिळाले. नवीन आशावाद निर्माण झाला. अनिवासी भारतीयांकडून मदत आली. जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय / विदेशी कंपन्या मोठ्या प्रमाणावर भारतात आल्या आहेत. त्यांच्याशी स्पर्धा करण्यासाठी खासगी क्षेत्र सरसावलं. मुक्त आर्थिक प्रवाहात विकासाची संधी उपलब्ध झाली. अर्थव्यवस्थेच्या विकासदरात सुधारणा झाली. भारतीय अर्थव्यवस्था एक जागतिक आर्थिक शक्ती म्हणून वेगानं पुढे येत आहे. नवीन आर्थिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर जागतिक व्यापार कराराच्या आविष्काराचा भारतीय अर्थव्यवस्थेवर बराच अनुकूल परिणाम झाला आहे.

बाजाराधिष्ठीत अर्थव्यवस्थेत किंमत यंत्रणेचं महत्त्व वाढवलं की तेजी-मंदीची चक्रे आहेतच. जगावर आर्थिक साम्राज्य गाजवणारी अमेरिकन अर्थव्यवस्था त्यातून सुटू शकत नाही, तिथं भारतीय अर्थव्यवस्था कशी अपवाद असू शकेल? सार्वजनिक उद्योगातून संपत्ती निर्माण होईल, नियोजनातील संख्यात्मक उद्दिष्टपूर्तीतून देश विकसित होईल, कृषि-उद्योग माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल, विकासाच्या ओघात गरीबी आपोआप लुप्त होईल, विदेशी भांडवलातून प्रचंड रोजगाराचं उद्दिष्ट गाठलं जाईल, रोजगारातून विकासदर उंचावेल हा आशावाद फसवा ठरला. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं राष्ट्राचा विकास होत असताना त्याच वेळी बेरोजगारीचा दर वाढणं हा विरोधाभास आज अर्थव्यवस्थेत आहे. हे सगळं स्वीकारून स्थिरतेसह विकासाचं उद्दिष्ट गाठण्यासाठी अर्थव्यवस्थेला प्रभावी, प्रवाही व लवचिक बनविण्याचं आव्हान आहे. भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हानांची अर्थतज्ज्ञांकडून खुलेपणानं चर्चा होणे गरजेचं आहे. हे सगळं पाहता या अंकाचा विषय *'भारतीय अर्थव्यवस्था'* असा घेतला आहे.

*'भारतीय अर्थव्यवस्था'* विशेषांकासाठी दिलेल्या सर्व विषयांवर लेखकांनी पेपर पाठवून अंकास उत्स्फूर्त प्रतिसाद दिलाय् हे विशेष! या अंकाने लेख व लेखक संख्येबाबत नवीन उच्चांक गाठला आहे. या विशेषांकासाठी प्राप्त झालेल्या सर्वच लेखांना अंकाची पृष्ठसंख्या व लेखांच्या तांत्रिक मर्यादांमुळे सहभागी करून घेता आले नाही हे नम्रपणे नमूद करावेसे वाटते. 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या'सारख्या जिव्हाळ्याच्या विषयावर जास्त संख्येने लेख आले आहेत. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त विद्यापीठ क्षेत्रातील लेखकांचा समावेश करण्याचा प्रयत्न या अंकात केला आहे. 'अर्थसंवाद'च्या माध्यमातून परिषदेने आर्थिक विषयावर लेखन करणारे जास्तीत जास्त लेखक तयार करून समाजास द्यायला हवेत, असा माझा दृष्टिकोन आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. चारुदत्त गोखले, कार्यकारी मंडळ सदस्य प्राचार्य डॉ.रामकृष्ण टाले यांनी विशेषांकासाठी जाहिरात उपलब्ध करून दिली, विशेषांकासाठी लेखकांनी उत्स्फूर्त व मोठा प्रतिसाद दिला, सातपुडा ऑफसेटचे निलेश लाठी व सुनील भांडारकर या मित्रांनी अंक अधिक आकर्षक व वाचनीय करण्याकामी मला खूप सहकार्य केलं, वाचकांनी मागच्या अंकाबाबत प्रशंसनीय प्रतिक्रिया दिल्या. आपणा सर्वांचे मन:पूर्वक आभार !

**- अविनाश रामलाल निकम**

प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# भारतातील पर्यटन उद्योग

अविनाश रामलाल निकम, शहादा
प्रमुख संपादक-अर्थसंवाद
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
पूज्य सानेगुरूजी वि.प्र. मंडळाचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
जिल्हा नंदुरबार
आजीव सदस्य क्र. ८९८

पर्यटन बाजारपेठ:

जगातल्या निवडक विस्तृत उद्योगामध्ये पर्यटन उद्योगाचा समावेश होतो. मानवी मनाला असलेला नाविन्याचा आनंद, नाविन्याची आवड, उत्तम पर्यावरणासंबंधी आकर्षकता, नव्या अनुभवांचे आकर्षण म्हणून मानव प्रवास करतो. पर्यटन हा विविध क्रिया असलेला उद्योग आहे. ज्याद्वारे प्रवासी मालाचे उत्पादन होते. शिवाय याद्वारे वाहतुक व्यवस्था, निवास सोयी, कारखाने, बाजारपेठा इत्यादी विभाग स्थापन होतात. प्राचीन काळापासून पाश्चिमात्त्य जगतातील औद्योगिक समाजातील परिवर्तनानंतर जगाच्या उर्वरित भागात अनेक बदल घडून आले. औद्योगिक क्रांतीनंतर जगातील बाजारपेठेचे स्वरुप आमुलाग्र बदलले. पर्यटन बाजारपेठ अस्तित्त्वात येऊ लागली. या पार्श्वभूमीवर इतर उद्योगातील बाजार व्यवस्थेपेक्षा पर्यटनातील बाजारव्यवस्था अतिशय वेगळी असून नाविन्यासाठी केलेला प्रवास या जाणिवेतून ती निर्माण झाली आहे. याच जाणिवेतून पर्यटक निरनिराळ्या स्थळांचा प्रवास करतात. विविध प्रकारची ऐतिहासिक, नैसर्गिक, सांस्कृतिक पर्यटन स्थळे हा बाजार व्यवस्थेचा आधार असतो. पर्यटकांच्या आवडी-निवडी, गरजा, अपेक्षा या बाबी लक्षात घेऊन पर्यटन व्यवसायाचे व्यवस्थापन केले जाते. क्रिपेन डॉर्फ यांच्या मते, ''स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर खासगी किंवा राज्य अंगीकृत पर्यटनाद्वारे पद्धतशीर व व्यवस्थित मांडणी करुन पर्यटकांच्या गरजा व त्यांचे समाधान करण्यासाठी केलेला उद्योग म्हणजे पर्यटन बाजारपेठ होय.''

## भारतातील पर्यटन:

भारत हा हजारो वर्षे जुनी संस्कृती असलेला देश. भारतात खूपच वैविध्य आहे. जवळ जवळ सर्व प्रकारचे प्रदेश, बर्फाच्छादीत हिमालय, हिरवीगार जंगले, राजस्थानातील वाळवंटे, अप्रतिम समुद्र किनारे, ऐतिहासिक स्थळे, राजवाडे व किल्ले आहेत जे इतर फारच थोड्या देशांमध्ये पहावयास मिळतात. Conde Nast UK या आंतरराष्ट्रीय पर्यटन मासिकाच्या सर्व्हेनुसार 'भारत' हा पर्यटनाच्या दृष्टीने पहिल्या दहा तर 'लोनली प्लॅनेट' या आंतरराष्ट्रीय चॅनलच्या सर्व्हेनुसार पहिल्या पाच ठिकाणांमध्ये गणला जातो.

आपल्या देशातील निसर्ग पर्यटन उद्योगासाठी डोळसपणे वापरुन समृद्ध होणारे स्वित्झर्लंड व सिंगापूर सारखे देश जगात आहेत. भारतातला विविधरंगी निसर्ग, गूढ परंपरा, वैविध्यपूर्ण इतिहास, विविध प्रकारे अभिव्यक्त होणारी संस्कृती अन् उत्सव या गोष्टी तर अप्रतिम आहेतच पण इथल्या लोकांमध्ये रुजलेली 'अतिथी देवो भव !' ची शिकवण पर्यटन उद्योगाच्या भरभराटीला पोषक आहे.

पर्यटन उद्योगाचा विकास झाला तर ते देशातील पर्यटन स्थळांबरोबर देशाच्या संस्कृतीची जोपासना केल्यासारख आहे. शिवाय देशाची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे. त्यासाठी गरज आहे ती पर्यटन क्षेत्रात योग्य प्रकारे गुंतवणूक करण्याची. भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थिती आणि पर्यटकांच्या आवडी निवडी पाहून वाहतुक व्यवस्था, उद्याने इत्यादीवर खर्च होण्याची गरज आहे.

## भारतातील पर्यटन बाजारपेठ:

विदेशात आपली स्वतंत्र प्रतिमा निर्माण व्हावी यासाठी भारताने पर्यटन कार्यालये विदेशात उघडली. या कार्यालयांमार्फत पर्यटनासंबंधी माहिती वितरित केली जाते. भारतीय पर्यटनांची कार्यालये १९५७ मध्ये जर्मनीत, १९६४ या वर्षी जपानमध्ये उघडण्यात आली. यानंतर अनुक्रमे फ्रान्स, ग्रेट ब्रिटन, संयुक्त संस्थाने व कॅनडा या देशात पर्यटनाचे नवीन मार्ग विकसित झाले. Operation Europe ही योजना पर्यटन बाजाराच्या विकासासाठी १९६८ मध्ये आली. या सर्व योजनांमागील उद्देश विदेशी पर्यटकांना आकर्षित करणे तसेच भारताच्या निर्यातवाढीसाठी प्रयत्न करणे हा होता. या योजनेला प्रचंड यश आल्याने ती १९७० मध्ये इंग्लंड व १९७१ मध्ये पूर्व-पश्चिम आशियापर्यंत विस्तारण्यात आली. आता विदेशात भारताची अशी १७ कार्यालये आहेत. ही कार्यालये न्युयॉर्क, लॉस एंजेलीस, टोरँटो, लंडन, जिनेव्हा, क्वालालंपूर, टोकियो, ॲम्स्टरडॅम, माद्रिद, मिलन, सिडने, फ्रँकफूर्ट, बँकॉक, बहारिन, मुंबई आणि बिजिंग येथे आहेत. चीनची राजधानी बिजिंग येथे भारताचे पर्यटन कार्यालय एप्रिल २००८ मध्ये स्थापन झाले. त्याचप्रमाणे पर्यटन विकासासाठी १९६६ पासून भारतीय पर्यटन विकास महामंडळ (ITDC - Indian Tourism Development Corporation) कार्यरत आहे. पर्यटकांसाठी विश्रामगृहे, वाहतुक सुविधा, बाजार या सारख्या सुविधा निर्माण करण्याचे कार्य या महामंडळाकडे आहे.

सर्वोच्च पातळीवर मंत्रालयात पर्यटन विभाग आहे. १९८८ मध्ये नियोजन मंडळाने एक राष्ट्रीय पर्यटन समिती स्थापन केली आहे. या

समितीने खाजगी क्षेत्रात पर्यटन बाजारपेठेच्या विकासासाठी शासकीय मदतीची शिफारस केली आहे.

## पर्यटक-पर्यटन स्थळे :

भारतात एवढे काही पाहण्या-अनुभवण्यासारखे आहे की त्याला मर्यादाच नाही. धार्मिक पर्यटनाला भारतीयांच्या मनामध्ये एक वेगळेच स्थान आहे. मुंबई, दिल्ली, अहमदाबाद, मदुराई आणि जयपूर खरेदीदारांसाठी उत्तम बाजारपेठ म्हणून प्रसिध्द आहेत. मराठा इतिहासाची साक्ष देणाऱ्या किल्ल्यांसाठी महाराष्ट्र प्रसिध्द आहे. चंदीगडपासून जवळ असलेले हिल स्टेशन 'सिमला', येथे जाण्यासाठी कालकापासून मिनी ट्रेनमधून वळणा-वळणाच्या घाटामधील प्रवास सुखकारक अनुभव देऊन जातो. हिरव्यागार निसर्गाची मुक्त उधळण असलेले महाबळेश्वर, नैनिताल, कोडाईकॅनाल, माउंटअबू, मसुरी, उटी ही पर्यटकांना भुरळ पाडणारी निसर्गरम्य गिरीस्थाने आहेत. हिमालयाच्या रांगांतील वसलेले जम्मू काश्मिर, कुलू मनाली थंडगार-आल्हाददायक हवेमुळे पर्यटकांना नेहमीच आकर्षित करतात. रोहतांगपास येथील हिमाच्छादित प्रदेशाचा अनुभव पर्यटकांना अविस्मरणीय वाटतो. गोवा येथील अथांग पसरलेला समुद्र किनारा पर्यटकांना खुणावत असतो.

पाषाणातील अप्रतिम कलाविष्कार म्हणून जागतिक ख्याती असलेल्या अजिंठा-वेरूळच्या लेण्या जैन-बौध्द कलेचे विहंगम दर्शन घडवितात. बांधकाम कलेचा अप्रतिम नमुना असलेला ताजमहाल जगातील सात आश्चर्यांपैकी ख्यातीप्राप्त आहे. हैदराबाद, म्हैसूर, बडोदा आणि इंदोर ही शहरे सुंदर बगीचे, ऐतिहासिक भव्य वास्तू, स्मारके, संस्कृतीचा वारसा जपणारे म्हणून प्रसिध्द आहेत. अमृतसरचे सुवर्णमंदीर जगप्रसिध्द आहे. भारतातील इतर राज्यात राजस्थानएवढे ऐतिहासिक राजवाडे शोधून सापडणार नाहीत. हे सगळं काही एका देशात पाहून विदेशी पर्यटकसुध्दा आनंदी होतात. पण त्यांचे आनंदी होणे हे आपण चांगल्या अर्थकारणाकडे अद्याप वळवू शकलो नाहीत.

विदेशी पर्यटक वाढीसाठी उत्तम प्रकारे जाहिरात तंत्राचा वापर, देशातील विविध प्रकारच्या बाजारपेठा, वाहतुकीचे उत्तम जाळे, अर्न् सर्वाधिक महत्त्वाचे म्हणजे विदेशी पर्यटकांच्या दृष्टीने मिळणारा डॉलरच्या तुलनेने स्वस्त रुपया यामुळे पर्यटन विकासाला चालना मिळाली आहे. संयुक्त संस्थाने, पश्चिम युरोप, ग्रेट ब्रिटन, जपान, ऑस्ट्रेलिया तसेच पूर्व आशियातूनही चांगल्या संख्येने भारतात पर्यटक येतात.

जर्मन पर्यटकांना भारतातील समुद्र किनारे (Beaches) जास्त आवडतात. इटालीयन व फ्रेंच पर्यटकांना प्राचीन शिल्पे आवडतात. अरब देशातील पर्यटकांना मुंबई व दिल्ली येथील बाजारपेठांमध्ये खरेदी करणे आवडते. जपानमधील पर्यटकांना बौद्धकालीन वास्तूंना भेटी देण्यात आनंद मिळतो. युरोपातील बहुतांश पर्यटकांना हिमालयातील हिमाच्छादीत पर्यटनस्थळे आकर्षित करतात. भारत पर्यटनाच्या दृष्टीने एक वैशिष्ट्यपुर्ण देश आहे. केरळ, राजस्थान, तसेच गोव्याने आपली संस्कृती जगभरात यशस्वीतेने पोहोचविली आहे.

भारतात येणाऱ्या विदेशी पर्यटकांपैकी ४९% उत्तर भागात, २९% पश्चिम भागात, १८% दक्षिण भागात तर ४% पूर्व भागात विभागले जातात.

तक्ता क्र. १

विदेशी पर्यटकांचे आगमन व विदेशी मुद्रा उत्पन्न

| वर्ष | विदेशी पर्यटक आगमन | | विदेशी मुद्रा उत्पन्न | |
|---|---|---|---|---|
| | संख्या(लाखात) | वृध्दी दर | मिलियन डॉलर | वृध्दी दर |
| २००२-०३ | २४.५४ | १.१ | ३,३१२ | ५.६ |
| २००३-०४ | २९.३३ | १९.५ | ५,०३७ | ५२.१ |
| २००४-०५ | ३६.०३ | २२.८ | ६,६६६ | ३२.३ |
| २००५-०६ | ४१.०० | १३.८ | ७,८५३ | १७.८ |
| २००६-०७ | ४६.७० | १३.८ | ९,१२३ | १६.२ |
| २००७-०८ | ५१.७ | १०.७ | ११,६६६ | २७.९ |
| २००८-०९ | ५०.७ | -१.९ | १०,५४३ | -९.६ |
| २००९-१० (एप्रिल-डिसें.) | ३७.२ | १.१ | ८,६६३ | १०.९ |

*(स्त्रोत - पर्यटन मंत्रालय, भारत सरकार)*

तक्ता क्र. १ नुसार सन २००८-०९ मध्ये देशातील विदेशी पर्यटकांच्या आगमन संख्येत घट दिसत आहे. त्याचबरोबर याच वर्षात विदेशी मुद्रा उत्पन्न घटले आहे. देशात होणाऱ्या दहशतवादी कारवायांचा हा परिणाम आहे. सर्वाधिक संख्येने पर्यटक सन २००७-०८ मध्ये दिलेल्या कालावधीमध्ये भारतात आले असून या वर्षात विदेशी मुद्रा उत्पन्न सर्वाधिक आहे. भारताला नैसर्गिक साधनसंपत्तीतून पर्यटन उद्योगाद्वारे आर्थिक फायदे मिळत आहेत.

## अर्थव्यवस्थेत पर्यटनाचे योगदान:

पर्यटनामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते. आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढते. पर्यटन उद्योगामुळे हॉटेल्स, वाहतुक, बँकिंग क्षेत्र, अल्पोपहारगृहे यात मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होतो. सन २००९-१० मध्ये या व्यवसायात एकूण व्यवसायाच्या केवळ २.७ टक्के भांडवल गुंतले असून देशाच्या रोजगारामध्ये ७.२ टक्के रोजगार या उद्योगातून मिळतो. या शिवाय अप्रत्यक्षपणे शेती, बांधकाम, पशुपालन, मासेमारी, दुग्ध उत्पादने, हस्तकला, वस्तू उत्पादन या क्षेत्रात रोजगार उपलब्ध होतो. गोवा, राजस्थान, हिमाचल प्रदेश, गुजरात, केरळ व महाराष्ट्राचा पर्यटनदृष्ट्या चांगला विकास झाला आहे. परंतु दहशतवादी कारवायांमुळे जम्मू-काश्मिरचा पर्यटन व्यवसाय धोक्यात आहे. पर्यटनामुळे वाहतुकीच्या विकासाला चालना मिळते. याचा अप्रत्यक्ष परिणाम औद्योगिकीकरण, नागरिकीकरण व व्यापारावर होतो. पर्यटनासाठी पर्वतीय भागात बांधलेल्या रस्त्यांचा उपयोग त्या क्षेत्रातील व्यापार वाढीसाठी होतो. थोडक्यात पर्यटन हे देशाच्या

विकासासाठी प्रभावी साधन आहे.

जर्मन अभ्यासक मॅक्सम्युलर यांनी भारताबद्दल उद्‌गार काढले की, ''*जर आपणाला निसर्गाने काही भागात उधळलेले सौंदर्य, पृथ्वीवरचा स्वर्ग, जगातील संपत्ती पाहायची असेल तर मला भारताकडे बोट दाखवावे लागेल.*'' पर्यटन विषयक साधन संपत्तीचा स्त्रोत व पर्यटन विकास क्षमता यांचा विचार करुन पर्यटनाचे नियोजन करणे आवश्यक आहे. भारतात ऐतिहासिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक साधन संपत्ती विपुल आहे. अशा पर्यटन स्थळांकडे पर्यटकांचा ओघ वाढण्यासाठी त्या स्थळांच्या विकासासाठी कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे. त्याच बरोबर देशांतर्गत पर्यटनास उत्तेजन देणे आवश्यक आहे. भारतात वैविध्यपूर्ण पर्यटन स्थळांची कमी नाही. पर्यटन सेवा सुविधांच्या विकास झाल्यास भारताचे पर्यटन दृष्ट्या विकसित देशांच्या यादीतील स्थान अधिक उंचावेल हे निश्चित !

संदर्भ:


१) *पर्यटन मंत्रालय*, भारत सरकार

२) *प्रतियोगिता दर्पण*, भारतीय अर्थव्यवस्था अतिरिक्तांक , २०१०

३) *पर्यटन भूगोल*, डॉ. एस.बी. शिंदे, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ऑक्टोंबर २००६

४) *Indian Economy*, Datta Sundaram, S. Chand Publications, New Delhi, 2010

५) *पर्यावरण व आर्थिक क्रिया*, डॉ. शंकर रा. चौधरी, हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई, २००२

६) *पर्यटन भूगोल*, डॉ. विपुल घाटपुरे, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपुर, जून २००१

७) *पर्यटन*, डॉ. प्रभाकर नागतोडे, प्रा. दिगंबर पारधी, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, जून २००६

# अर्थव्यवस्थेतील शेती जलसिंचनाची भूमिका

**भोसले शिवाजी मुरलीधर, विटा**
बळवंत कॉलेज, जि. सांगली
आजीव सभासद क्र. ५१२
भ्रमणध्वनी: ९४२११२१९७४५

प्रस्तावना :

शेती विकास देशाच्या सर्वांगीण विकासाचा कणा आहे. भारतासारख्या विकसनशील देशाचा अर्थिक विकास हा प्रामुख्याने शेती विकासावरच अवलंबून आहे. शेती ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार मानला जातो. शेतीचा विकास झाल्यास इतर सर्व क्षेत्राचा विकास साधला जातो. मात्र शेतीचा विकास पाण्यावर अवलंबून असतो. शेतीच्या क्षेत्रात पाणी हे पायाभूत भूमिका बजावत असते. पाणी असेल तर शेतकरी शेतीतून सोने पिकवण्याची किमया करु शकतो. परंतु अपुऱ्या पावसामुळे व मान्सूनच्या अनिश्चिततेमुळे शेतीच्या विकासात अडथळा निर्माण होत असतो. मान्सून येण्यास थोडा विलंब झाला किंवा पुरेसा झाला नाही तरीही त्याचा पिकावर प्रतिकुल परिणाम होतो. त्यामुळे पावसाच्या पाण्याबरोबर शेतीला कृत्रिम जलसिंचनाच्या शाश्वत सोयी निर्माण करुन देणे गरजेचे आहे.

जगातील सर्वात जास्त पाऊस पडण्याचे ठिकाण चेरापुंजी हे भारतात आहे. येथे ११०० सें.मी. इतका प्रचंड पाऊस पडतो. आपल्या देशाचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान १०५ सेमी इतके समाधानकारक आहे. मोठमोठ्या नद्या आपल्या देशात आहेत. आपल्या देशात भूभागातील पाण्याचे प्रमाणही चांगले आहे असे असूनही भारताच्या अनेक भागात पाणी टंचाईची समस्या तीव्रतेने जाणवते. उत्तरेत आसाम, उत्तरप्रदेश, बिहार या राज्यात महापुरामुळे हाहा:कार उडतो तर त्याच काळात राज्यस्थान, गुजरात, महाराष्ट्र, तामिळनाडू व कर्नाटक या राज्यात लोकांना पाणी पिण्यासाठीही मिळत नाही. भारतातील पाण्याची समस्या मोठी विचित्र आहे. भारतात पडणारा पाऊस हा विषम प्रमाणात पडतो. ८०% पाऊस हा जून ते सप्टेंबर या कालावधीत पडतो तोही अनियमित, अनिश्चित व लहरी आहे. त्याचा शेती उत्पादनावर प्रतिकुल परिणाम होतो. त्यावर मात करण्यासाठी व शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी शेतीला पुरेशा व शाश्वत जलसिंचनाची

आवश्यकता आहे. देशातील शेती क्षेत्र केवळ पर्जन्यावर अवलंबून न राहता त्याला सिंचनाचा आधार असावा असे कौटिल्याचेही मत होते. जे राज्य आपल्या शेती उत्पादनासाठी पावसावर अवलंबून न राहता जास्तीत जास्त सिंचनावर अवलंबून असते ते राज्य अधिक समृध्द होते.

## जलसिंचनाचे उद्देश:

कमीतकमी पाण्यात जास्तीत जास्त उत्पादन हा प्रधान हेतू जलसिंचनाचा असतो पिकांच्या योग्य वाढीच्या काळात जमिनीत ओलावा टिकून राहतो की नाही, तसेच पाण्याचा प्रवाह, वापर व निचरा याकडेही लक्ष द्यावे लागते. जलसिंचनासाठी पाणी उपलब्ध करण्यासाठी सिंचनप्रकल्पाचा विकास महत्त्वाचा मानला जातो. *''पाण्याच्या उगमापासून शेतीतील पिकापर्यंत पाण्याची वाहतूक व वितरण पध्दतशीरपणे करण्याच्या क्रियेला जलसिंचन असे म्हणतात.''* पाण्याच्या उगमापासून शेतापर्यंत पाणी वाहून नेणे, शेतामधील पिकांसाठी पाण्याचे योग्य वितरण व विभाजन करण्याची सोय करणे इत्यादी जलसिंचनाचे उद्देश आहेत. शेती क्षेत्राच्या विकासामध्ये जलसिंचनाला महत्त्वाचे स्थान आहे.

## जलसिंचनाचे महत्त्व / गरज:

भारतात ७०% शेती पूर्णत: पावसावर अवलंबून आहे. परंतु पावसाबाबत काहीच हमी देता येत नाही. तो कधी वेळेवर येतो तर काही वेळेस फसवितो. तसेच देशाच्या काही भागात जास्त पाऊस तर काही भागात फारच कमी पाऊस पडतो. त्यांना दुष्काळांना तोंड द्यावे लागते त्यामुळे दुष्काळावर एकमेव पर्यायी मार्ग म्हणजे शेतीला जलसिंचनाच्या सोयी करणे, शेतीमधून जास्तीत जास्त उत्पादन काढण्यासाठी, एकापेक्षा अधिक दुबार, त्रिवार पिके घेण्यासाठी जलसिंचन आवश्यक आहे. अन्नधान्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी, नगदी पिकांमुळे रोजगार व उत्पन्न वाढते त्यामुळे नगदी पिकांच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी, जेव्हा पिकांना नैसर्गिक पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊ शकत नाही अशी गरज जलसिंचनाद्वारेच पुर्ण होते. नद्यांचे वाहून वाया जाणारे पाणी साठवून शेतीला गरज असेल त्यावेळी त्याचा वापर करण्यासाठी जलसिंचन आवश्यक आहे. जमिनीच्या अंतर्गत असलेल्या पाण्याचा वापर करण्यासाठी जलसिंचन महत्त्वाचे ठरते. तसेच देशात विविध राज्यात येणारे महापूर कमी करण्यासाठी व दुष्काळावर मात करण्यासाठी जलसिंचनाची गरज आहे. जलसिंचनाच्या सोयी मोठ्या प्रमाणात केल्याशिवाय शेतीचा विकास होणार नाही. कृत्रिम जलसिंचनामध्ये विहिरी, कालवे, धरणे, नलिकाविहिरी, उपसा-जलसिंचन इत्यादींचा समावेश केला जातो.

## योजना काळातील जलसिंचन विकास:

भारतातील शेती विकासाच्या दृष्टीने जलसिंचनाचे महत्त्व लक्षात घेऊन नियोजनाची सुरुवात झाल्यापासून जलसिंचन सुविधांचा विकास करण्यावर भर देण्यात आला आहे. जलसिंचन क्षमतेत वाढ करण्यासाठी मोठ्या, मध्यम व लघु जलसिंचन प्रकल्पांवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. पुढील तक्त्यामध्ये योजना काळात जलसिंचन क्षमतेत, त्यांच्या वापरात, त्यावरील खर्च, निर्माण झालेली व वापरलेली सिंचन क्षमता दर्शविली आहे.

### योजना काळातील जलसिंचनाचा विकास

| पंचवार्षिक योजना | जलसिंचन प्रकल्प क्षमता (दशलक्ष हेक्टर) | क्षमता वापर (दशलक्ष हेक्टर) |
|---|---|---|
| योजनापूर्व कालखंड | २२.६० | २२.६० |
| पहिली योजना | २६.६६ | २५.०४ |
| सहावी योजना | ६५.२२ | ५८.८२ |
| नववी योजना | ९३.९५ | ८०.०६ |
| दहावी योजना | १०२.७७ | ८६.२९ |

*(स्रोत: रसाळ राजेंद्र - भारतीय अर्थव्यवस्था, सक्सेस प्रकाशन, पुणे - २०१०)*

भारतात योजना काळात जलसिंचन क्षमतेची निर्मिती व त्याचा वापर यामध्ये वाढ झालेली आहे. २२.६० दशलक्ष हेक्टर वरुन १०२.७७ दशलक्ष हेक्टर पर्यंत जलसिंचन क्षमतेत वाढ झालेली आहे. मात्र नियोजन काळात निर्माण झालेल्या सिंचन क्षमतेचा वापर पूर्णपणे करण्यात यश आलेले नाही. काही योजनांमध्ये सिंचन क्षमतेचा पूर्णपणे वापर न केला गेल्याने ती वाया गेलेली आढळते. सिंचन क्षमतेचा वापर २२.६० द.ल. हेक्टरवरून ८६.२९ द.ल. हेक्टरपर्यंत वाढलेला आहे. परंतु सिंचन क्षमतेच्या निर्मितीच्या तुलतेने वापर कमी झालेला आढळतो. नियोजन काळातील मोठ्या मध्यम प्रकल्पावर केलेला खर्च ३७६ कोटी रुपयांवरून ८२२९१ कोटी रुपयांपर्यंत वाढलेला आहे. मोठ्या व मध्यम प्रकल्पातून निर्माण झालेली सिंचन क्षमता ९.७० द.ल. हेक्टर वरुन ४२.३६ द.ल. हेक्टर पर्यंत वाढलेली दिसते. नियोजनाच्या सुरवातीच्या काळात मोठ्या व मध्यम प्रकल्पांवर भर देण्यात आला होता. मात्र मोठ्या प्रकल्पाचे दोष व समस्या आणि निधीच्या टंचाईमुळे अलिकडील काळात लघु जलसिंचन प्रकल्पावर अधिक भर देण्यात आलेला आहे. नियोजन काळात लघु सिंचन योजनेद्वारे मोठ्या प्रमाणात जलसिंचन क्षमता निर्माण करण्यात आली, ती १२.९० द.ल. हेक्टरवरुन ६०.४० द.ल. हेक्टर पर्यंत वाढली. निर्मित सिंचन क्षमतेचा वापर १९८० पर्यंत पूर्ण क्षमतेने करण्यात आला. मात्र त्यानंतर निर्मित सिंचन क्षमतेचा वापर पूर्ण क्षमतेने केला गेला नाही. हा वापर १२.९० द.ल. हेक्टर पासून ५२.८० द.ल. हेक्टर पर्यंत वाढलेला दिसतो. जलसिंचन क्षमतेचा पूर्ण वापर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणेचे गरजेचे आहे याशिवाय पर्याय नाही.

### ठिबक व तुषार सिंचन विकास:

ठिबक व तुषार सिंचनामुळे सिंचनाखालील क्षेत्रात वाढ होते. ठिबक सिंचनामुळे पाण्याची २५ ते ६०% बचत होते

तसेच उत्पादनात ६०% पर्यंत वाढ होते. तुषार सिंचनामुळे २५ ते ३३% पाण्याची बचत होते. भारतातील ६९ द.ल. हेक्टर या निव्वळ ओलिताखालील क्षेत्रापैकी ०.५ द.ल. हेक्टर क्षेत्र ठिबक सिंचनाखाली व ०.७ द.ल.हेक्टर तुषार सिंचनाखाली आहे. भारतातील ठिबक सिंचनाखालील एकूण क्षेत्रापैकी महाराष्ट्रात ४६%, कर्नाटक २१%, तामिळनाडू १४% व आंध्रप्रदेशात १२% आहे. ठिबक व तुषार सिंचनाचे अनेक फायदे होत असले तरी याबाबत फारशी प्रगती झालेली दिसून येत नाही. भारतातील इतर राज्यातही या सिंचन पद्धतीचा विकास करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

## विविध मार्गाद्वारे जलसिंचनाची प्रगती:

भारतात विहिरी, धरणे, नलिकाविहिरी हे जलसिंचनाचे प्रमुख मार्ग आहेत. याद्वारे जमीन ओलिताखाली आणली जाते. भारतात १९५०-५१ ते २०००-०१ या काळात विहिरी व कूपनलिका खालील क्षेत्र ६ द.ल. हेक्टरवरुन ३३.६ द.ल. हेक्टर पर्यंत वाढले आहे. याच काळातील यांचा हिस्सा २९% वरुन ५८.६०% पर्यंत वाढला आहे. याच काळात तलावाद्वारे सिंचित क्षेत्र ३.६ द.ल. हेक्टरवरुन २.७ लक्ष हेक्टर इतके कमी झालेले आहे. याच काळात कालव्याद्वारे ८३ लक्ष हेक्टर वरुन १८० लक्ष हेक्टर पर्यंत सिंचन क्षेत्र वाढले आहे. थोडक्यात सिंचन स्रोतामध्ये विहिरीद्वारे होणाऱ्या सिंचनाला अधिक महत्त्व आहे. अलिकडे विहिरींची व नलिकाविहीरींची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे. नलिकाविहीरी खालील सिंचनक्षेत्राचा हिस्सा १% वरुन ३०% पर्यंत वाढला.

## निष्कर्ष:

१) भारतातील जलसिंचनाचा विकास करण्यासाठी भारत सरकारने जे प्रयत्न केले त्या प्रमाणात सिंचन प्रकल्प व त्यांची सिंचन क्षमता निर्माण झालेली नाही व निर्माण झालेली सिंचन क्षमता पूर्णपणे वापरण्यात अपयश आले आहे. २) योजना काळात सिंचन निर्मिती व सिंचन क्षमता वापर यामध्ये वाढ झाली आहे. मात्र निर्मितीच्या तुलनेने वापर कमी आहे. ३) लघु, मध्यम व मोठ्या प्रकल्पावरील खर्चात, जलसिंचन निर्मितीत व जलसिंचन क्षमतेत वाढ झाल्याचे आढळते ४)ठिबक व तुषार सिंचनाखालील क्षेत्रात वाढ झालेली आहे. मात्र यापेक्षा अधिक वाढ होणे गरजेचे आहे. विहिरींचे सिंचनामधील महत्त्व वाढत आहे. ५) ओलिताखालील क्षेत्राचे एकूण पिकाखालील क्षेत्राशी असलेले प्रमाण वाढत गेलेले दिसते. ६) नियोजनकाळात मोठ्या प्रकल्पावर अधिक भर दिला होता मात्र त्यांच्या समस्या व निधीच्या टंचाईमुळे अलिकडे लघुप्रकल्पावर अधिक भर देण्यात येत आहे. ७) एकूण सिंचित क्षेत्राची पिकाखालील एकूण क्षेत्राशी असलेल्या प्रमाणात वाढ झालेली आहे. ८) सिंचनाच्या क्षेत्रात गुंतवलेल्या रकमेच्या तुलनेत मिळणारा लाभ अत्यल्प मिळतो त्यामुळे तोटाच सहन करावा लागतो. ९) जमिनीत पाण्याचा, खतांचा अतिरेकी वापर वाढल्यामुळे क्षारपड जमिनीच्या प्रमाणात वाढ होत आहे. १०) सिंचन निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च होतो. त्याचा कार्यक्षमपणे व पूर्ण क्षमतेने वापर होत नाही.

## सारांश:

भारतातील जलसिंचनाचा विकास व सद्यस्थिती यांचा आढावा घेतला असता. केवळ

वाढीव जलसिंचन क्षमता निर्माण होऊन जलसिंचनाचा विकास साधला जाऊ शकत नाही. त्यासाठी योग्य प्रमाणात खर्च व कामे करणे गरजेचे आहे. तसेच देशामध्ये पुरेशा निधीची तरतुद न करता अनेक प्रकल्पांना मंजुरी देण्यात आल्याने अनेक प्रकल्प निधीअभावी रखडलेले आहेत. त्यांच्यावरील खर्चात दिवसेंदिवस वाढ होत आहे. जलसिंचन प्रकल्प राबविताना भूभागाचा व नैसर्गिक परिस्थितीचा विचार न केल्याने अनेक प्रकल्पांतून प्रभावी जलसिंचन क्षमता निर्माण होत नाही. सिंचन प्रकल्प नियोजित कालावधीत पूर्ण होत नसल्याने त्यावरील खर्चात व तेवढ्या कालावधीत उत्पादनासाठी सिंचन उपलब्ध होत नाही. सिंचन प्रकल्पातील भ्रष्टाचार, नियोजनाचा व निर्णय क्षमतेचा अभाव, विकासामधील पक्षीय राजकारण, निधीची टंचाई, अनुशेष, पक्षांतर्गत कुरघोड्या, शासकिय धोरणातील उणिवा, पाण्याचा गैरवापर, सिंचन प्रकल्पांच्या देखभालीचा प्रश्न व अपूर्ण प्रकल्पांची मोठी संख्या अशा अनेक समस्यांमुळे अपेक्षित सिंचन क्षमता व त्याचा वापर वाढलेला नाही.

सिंचनप्रकल्पांच्या विकासामध्ये अनेक समस्या असल्या तरी सिंचन प्रकल्प पूर्णपणे निरुपयोगी ठरलेले नाही. १९५१ ते २०१०-११ या कालावधीत सिंचनाखालील, पिकाखालील, विहिरीखालील, सिंचनाखालील क्षेत्रात वाढ झालेली आहे. पाणलोट क्षेत्रांतर्गत जलसिंचन प्रकल्पाची कामे झाल्याने, ठिबक व तुषार सिंचनाच्या वापरामुळे सिंचनाखालील क्षेत्रात वाढ होत आहे. देशात जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी स्थानिक लोकांचा सहभाग वाढविणे, अपुरे प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक आहे. राजकारणासाठी व सवंग लोकप्रियतेसाठी नविन प्रकल्प हाती घेऊ नयेत. मोठ्या प्रकल्पांऐवजी लघु प्रकल्प हाती घ्यावेत. सिंचन क्षेत्रात वाढ होण्यासाठी शेतकऱ्यांनी पाण्याचा योग्य वापर करावा. त्यासाठी ठिबक व तुषार सिंचन पध्दतीचा वापर सक्तीचा करण्यात यावा. यासाठी शेतकऱ्यांचा सहभाग व त्यांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे. थोडक्यात जलसिंचनाशिवाय शेतीचा व देशाचा सर्वांगिण व समतोल विकास होणे अशक्य आहे. यासाठी शासनकर्त्यांची इच्छा शक्ती, अधिकाऱ्यांची कार्यक्षमता व तळमळ, लोकांचा सहभाग, प्रकल्पांची देखभाल इत्यादी आवश्यक आहेत.

**संदर्भ:**


१) रसाळ राजेंद्र, *भारतीय अर्थव्यवस्था,* सक्सेस प्रकाशन, पुणे, २०१०.

२) घाटगे-वावरे, *भारतीय अर्थव्यवस्था,* निराली प्रकाशन, पुणे, २०१०.

३) के सागर, *जलसंपदा विभाग भरती परीक्षा संपूर्ण मार्गदर्शक,* के सागर प्रकाशन, पुणे, २००८.

४) कविमंडन विजय, *कृषि अर्थशास्त्र,* श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००८.

५) पवार जयसिंगराव, *विज्ञान तंत्रज्ञान व प्रगती,* फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६) इंटरनेट, वेबसाईट.

७) रायखेलकर डांगे, *भारतीय अर्थव्यवस्था,* मेहता प्रकाशन, कोल्हापूर.

# शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती व आत्महत्या

**अर्जुन एस. पाटील, कोपार्डे**
स. ब. खाडे महाविद्यालय
ता. करवीर, जि. कोल्हापूर
आजीव सभासद क्र. ५५७
भ्रमणध्वनी: ९९७५८४९४८९

प्रस्तावना :

भारतीय शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा व शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण घटत असले तरी शेतीवर अवलंबून असलेल्यांची संख्या सर्वात जास्त आहे. शेतीमधील महत्त्वाचा घटक शेतकरी हा आपण अन्नदाता मानतो. परंतु गेल्या दहा-पंधरा वर्षात भारतात २.५ लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी कर्जबाजारी व इतर कारणांनी आत्महत्या केल्या आहेत व अजूनही आत्महत्येचे सत्र सुरूच आहे. ही भारतीय शेतीमधील अतिशय करुणाजनक स्थिती आहे. भारतीय शेतकरी हा नेहमीच लहरी मान्सूनचा बळी ठरतो. त्यामुळे त्याला अपेक्षित उत्पादनाची खात्री नसते. शेतमालाला मध्यस्थांच्या हस्तक्षेपामुळे किफायतशीर किंमत (Remunerative prices) मिळत नाही. परिणामी शेतकरी अनेक वर्षांपासून आपल्या उत्पन्न व खर्चामध्ये मेळ घालू शकले नाहीत. कर्जबाजारीपणा हा त्यांच्या पाचवीलाच पुजलेला असतो. या संदर्भात असे म्हटले जाते की भारतीय शेतकरी हा कर्जामध्ये जन्माला येतो, कर्जामध्येच जगतो आणि कर्जामध्येच मरतो. पूर्वी शेतकरी वर्ग सावकाराकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेत होते. लहरी मान्सूनमुळे शेतमालाचे अनिश्चित उत्पादन व शेतमालाला किफायतशीर किंमती न मिळाल्यामुळे ते सावकारांचे कर्ज वेळेत फेडू शकत नव्हते. त्याचा जास्त व्याजदर आणि चक्रवाढ व्याजपद्धतीमुळे सावकार शेतकऱ्यांच्या जमिनी व मालमत्ता बळकावत असत.

१९८० नंतरच्या काळात राष्ट्रीयीकृत बँकांचा शाखा विस्तार, सरकारी धोरणानुसार त्यांनी सुरू केलेला कर्जपुरवठा सहकारी बँकांच्या माध्यमातून होणारा कर्जपुरवठा इत्यादींनी या परिस्थितीत सुधारणा झाली असली तरीही शेतकऱ्यांचे सावकाराकडून कर्ज घेण्याचे प्रमाण अजूनही कमी झालेले नाही. शेतीमधील नवीन

तंत्रज्ञानामुळे उत्पादन खर्चात झालेली वाढ, अकिफायतशीर किंमती, उपभोगखर्चात झालेली वाढ, कर्जबाजारीपणा या सारख्या अनेक कारणांनी शेतकरी राजा आज चांगलाच पेचप्रसंगात सापडला आहे. अनेक राज्यातील शेतकऱ्यांनी कर्जाचे ओझे सहन न झाल्यामुळे व अन्य कारणांनी आत्महत्या केल्या आहेत. महाराष्ट्रात विशेषत: विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरूच आहे. जून २००६ ते आजअखेर जवळजवळ ११०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. पंतप्रधानांची मदत योजना (Relief Package) आत्महत्येचे सत्र रोखू शकलेली नाही ही वस्तुस्थिती आहे.

## भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती:

भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती कशी आहे या संदर्भात व्यापक प्रमाणात सर्वेक्षण करून त्याचे विश्लेषण बऱ्याच काळापासून झालेले नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात शेतीचा विकास होत आहे. परंपरागत शेतीची जागा आता आधुनिक शेतीने घेतली आहे. १९६७-६८ मध्ये हरितक्रांती झाली. त्यानंतर धवलक्रांती झाली. शेतीच्या नव्या तंत्रामुळे शेती उत्पादन वाढले. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली असा निष्कर्ष निघतो. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की मोठे शेतकरीच नव्या उत्पादनतंत्राचा फायदा घेतात त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढून राहणीमान सुधारले. परंतु लहान शेतकरी/सीमांत शेतकरी मात्र याचा फायदा उठवू शकले नाहीत. प्रतिकुल नैसर्गिक परिस्थिती, शेती उत्पादक मालमत्तेची कमतरता, भांडवलाची उणीव इ. मुळे हा शेतकरी शेती विकासात अपेक्षित वाटा मिळवू शकला नाही. दुष्काळग्रस्त किंवा अवर्षणग्रस्त भागातील शेतकऱ्यांचा प्रश्न यापेक्षा भयावह आहे. शेती उत्पादनाची शाश्वती नाही. नवीन तंत्राचा अवलंब करण्यासाठी व इतर घरगुती कारणासाठी घेतलेल्या कर्जाचे ओझे कधीच कमी झालेले नाही. कर्जबाजारीपणा हेच भारतीय शेतकऱ्यांचे दुर्दैव अजूनही अबाधित राहिलेले आहे. शेतकऱ्यांचे कमी उत्पन्न, जास्त उत्पादन खर्च, एकूण उत्पन्नापेक्षा एकूण उपभोग खर्च जास्त अशी स्थिती काही राज्यात पाहावयास मिळते. परिणामी शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा आणि कर्जबाजारीपणातून आत्महत्या अशी करुणाजनक परिस्थिती निर्माण झाली आहे हे वास्तव चित्र आज पुढे येत आहे. हा भारतीय शेतीच्या दृष्टीने शुभ शकुन नाही हे मात्र निश्चित आहे.

शेती व्यवसायामध्ये ही करुणाजनक परिस्थिती का निर्माण झाली? शेतकरी आत्महत्या का करतात? ते अगदी टोकाची भूमिका का घेतात? शेतीपासून मिळणारे उत्पन्न हे उपभोग खर्च व इतर खर्च भागविण्याच्या दृष्टीने अपुरे आहे का? शेतमालाचा वाढलेला उत्पादन खर्च आणि कमी उत्पन्न यामुळे शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले आहेत का? किंवा ते शेतीमध्ये नव्याने सुरू झालेल्या स्पर्धात्मक परिस्थितीशी व नवीन आर्थिक धोरणाशी जुळवून घेण्यात अपयशी ठरले आहेत का? या सारखे असंख्य प्रश्न निर्माण होतात.

या सर्व प्रश्नांची सखोल उत्तरे शोधण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्रालयाने २००३ मध्ये प्रथमच शेतकरी कुटुंबांचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण केले आहे. शेतकऱ्यांचे राहणीमान, शेतीपासून मिळणारे उत्पन्न, बिगर शेती व्यवसायापासून

मिळणारे उत्पन्न, शैक्षणिक स्थिती, धारण केलेली उत्पादक मालमत्ता, नवीन शेतीविषयक तंत्राची माहिती व त्याचा वापर, उपभोग खर्च कर्जबाजारीपणा, शेती विषयक इतर प्रश्न इत्यादी माहिती गोळा करून राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेने (National, Sample Survey Organization) (NSSO) शेतकऱ्यांची स्थिती मूल्यमापन सर्वेक्षण (Situation Assessment Survey) जानेवारी २००३ ते डिसेंबर २००३ या कालावधीमध्ये पूर्ण केले. सर्व राज्यातील ६६३८ खेड्यांमधील ५१,७७० शेतकरी कुटुंबांचा अभ्यास करण्यात आला. या संबंधीचा अहवाल पाच विभागामध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे.

१. शेतकरी कुटुंबाचा कर्जबाजारीपणा

२. शेतकरी कुटुंबाचा उपभोग खर्च

३. शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न, खर्च आणि उत्पादक मालमत्ता व शेती साधने

४. शेतीसाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर

५. शेतीची इतर काही वैशिष्ट्ये

या अभ्यासातून भारतीय शेतकरी कुटुंबांची आर्थिक स्थिती काय आहे याचे वास्तव चित्र स्पष्ट झाले आहे. विशेषत: शेतकरी कुटुंबांचे उत्पन्न, उपभोग खर्च कर्जबाजारीपणा इ. बाबत करुणाजनक अशी माहिती पुढे आलेली आहे. संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करून NSSO ने आज भारतीय शेतकरी कोणत्या अवस्थेतून जात आहे हे सविस्तरपणे स्पष्ट केले आहे. शेतकरी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न, वार्षिक पीक खर्च, कर्ज बाजारीपणा इ. बाबत सविस्तर निष्कर्ष काढलेले आहेत.

**१. शेतकरी कुटुंबांचे सरासरी उत्पन्न, खर्च व कर्जाचे प्रमाण :**

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेने केलेल्या सर्वेक्षणावरून असे दिसून येते की, अखिल भारतीय पातळीवर शेतकऱ्यांचे दरडोई एकूण वार्षिक उत्पन्न २५, ३८०/- रूपये इतके आहे. या दरडोई एकूण वार्षिक उत्पन्नामध्ये शेती उत्पन्न, मजूरीपासून मिळालेले उत्पन्न, पशुपालनापासून मिळणारे उत्पन्न व इतर बिगर शेती व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न यांचा समावेश आहे. महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे दरडोई एकूण वार्षिक उत्पन्नापैकी फक्त ४५% उत्पन्न म्हणजे ११,६२८/- इतकेच उत्पन्न शेतीपासून मिळते. ३९% उत्पन्न हे मजुरीपासून आणि उर्वरित १६% हे पशुधन व इतर स्त्रोतापासून मिळते. राज्यपातळीवर देखील यापेक्षा वेगळे चित्र दिसत नाही. सर्वात जास्त दरडोई एकूण वार्षिक उत्पन्न जम्मू-काश्मिर मधील शेतकरी कुटुंबांचे आहे (रु. ६५,८५६/-), त्या पाठोपाठ पंजाब (रु.५९,५२०/-), केरळ (रु.४८,०४८/-) या राज्यांचा क्रमांक लागतो. ओरिसातील शेतकरी कुटुंबांचे दरडोई एकूण वार्षिक उत्पन्न हे (रु.१२,७४४/-) सर्वात कमी आहे. त्यानंतर मध्यप्रदेश (रु.१७,१६०/-), राजस्थान (रु.१७,१७६/-) आणि आंध्रप्रदेश (रु.१९६०८/-) ही राज्ये आहेत.

आश्चर्याची बाब म्हणजे देशपातळीवर जी राज्ये तौलनिक दृष्ट्या पुढारलेली मानली जातात त्यापैकी पश्चिम बंगाल व तामिळनाडू राज्यातील शेतकऱ्यांचे दरडोई एकूण वार्षिक उत्पन्न देशपातळीवरील दरडोई उत्पन्नापेक्षा कमी आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे दरडोई एकूण वार्षिक

देशपातळीवरील सरासरीपेक्षा थोडे जास्त आहे. (रु. २९,५५६/-) या सर्व आकडेवारीवरून असा प्रश्न निर्माण होतो की, एवढ्या कमी उत्पन्नामध्ये शेतकरी कुटुंबे चांगल्या पद्धतीने व सुखी समाधानाने जगू शकतात का? शेतकरी शेती व्यवसायात टिकून राहण्यासाठी काही प्रेरणादायी गोष्टी आहेत का? या वाढत्या महागाईमुळे ते एकूण खर्च व एकूण उत्पन्न यामध्ये मेळ घालू शकतात का?

२.शेती उत्पादनाचा वार्षिक खर्च व शेती उत्पादनापासून मिळणारे उत्पन्न :

शेतकऱ्यांचे शेतीपासून मिळणारे वार्षिक उत्पन्न व खर्च यांच्या तुलनेवरून शेतकऱ्यांना निव्वळ किती नफा मिळतो हे स्पष्ट करता येईल. देशपातळीवर शेतकऱ्यांचे वार्षिक शेती उत्पन्न ११,६२८/- रुपये आहे व वार्षिक शेती खर्च ८,७९१/- रु. इतका आहे. म्हणजे शेतीमधील निव्वळ उत्पन्न रु.११६२८-८७९१=रु.२८३७/- होते. हे निव्वळ उत्पन्न शेतकऱ्यांच्या सर्व गरजा भागविण्याइतपत पुरेसे नाही हे उघड आहे. त्यामुळेच ते बिगरशेती व्यवसायाकडे वळलेले दिसतात.

राज्यांची परिस्थिती मात्र यापेक्षा भिन्न आहे. आंध्रप्रदेश, हरियाना, राजस्थान आणि तामिळनाडू या राज्यांतील शेतकऱ्यांचे निव्वळ वार्षिक उत्पन्न उणे आहे. निव्वळ वार्षिक उत्पन्नाच्या बाबतीत जम्मू व काश्मिर (रु.२२७७०), आसाम (रु.१८३८४), पंजाब (५९१९) ही राज्ये आघाडीवर आहेत. राहिलेल्या इतर राज्यांत हे उत्पन्न रु.४५०० पेक्षा कमी आहे. ओरिसा, उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये ते रु.१००० पेक्षा कमी झाले.

३. दरडोई एकूण वार्षिक उत्पन्न व वार्षिक एकूण उपभोग खर्च :

देशपातळीवर शेतकरी कुटुंबांचे एकूण वार्षिक उत्पन्न रु.२५३८० इतके होते व सरासरी वार्षिक उपभोग खर्च रु.३३२४० इतका होता. म्हणजे वार्षिक उत्पन्नापेक्षा वार्षिक उपभोग हा रु.७८६० इतका जादा होता. कर्जबाजारीपणाचे हे मूळ कारण आहे. त्यामुळे निवडलेल्या शेतकरी कुटुंबांपैकी ४८% पेक्षा जास्त शेतकरी कुटुंबे कर्जबाजारी होती.

राज्यपातळीवर आसाम, जम्मू आणि काश्मिर, पंजाब व कर्नाटक ही राज्ये वगळता सर्व राज्यांत वार्षिक एकूण उत्पन्नापेक्षा वार्षिक उपभोग खर्च जास्त आहे. यामध्ये अनुक्रमे राजस्थान (२१४८०), हरयाणा (१८३८४), उत्तर प्रदेश (१५३९२), मध्य प्रदेश (१०९०८) व आंध्र प्रदेश (९०२४) ही राज्ये आघाडीवर आहेत. या आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की, शेतकऱ्यांच्या वार्षिक उत्पन्नापेक्षा दरडोई वार्षिक उपभोग जास्त आहे. त्यामुळे त्यांच्या कर्जबाजारीपणात भर पडत आहे. शेतकरी वर्ग अडचणीत सापडलेला आहे हे स्पष्ट होते.

४. अपुरे उत्पन्न व कर्जबाजारीपणा यातील सह संबंध :

अखिल भारतीय पातळीवर निवडलेल्या एकूण शेतकरी कुटुंबांपैकी ४८.४६ टक्के शेतकरी कुटुंबे कर्जबाजारी आहेत आणि दरडोई कर्जाची रक्कम रु.१२५८५ इतकी आहे. आंध्रप्रदेशात कर्जबाजारीपणाचे प्रमाण सर्वात जास्त असून ते ८२ टक्के इतके आहे. त्या पाठोपाठ अनुक्रमे तामिळनाडू (७५.५ %), पंजाब (६४.४ %),

केरळ (६४.४ %), कर्नाटक (६१.६ %), महाराष्ट्र (५४.८ %) हरयाणा (५३.१ %) या राज्याचा क्रमांक लागतो.

शेतकऱ्यांचे अपुरे उत्पन्न हे कर्जबाजारीपणाचे प्रमुख कारण आहे. वार्षिक दरडोई एकूण उत्पन्न व वार्षिक उपभोग आणि कर्जबाजारीपणा यांच्यात सहसंबंध आहे. ज्या राज्यांत शेतकऱ्याचा वार्षिक उपभोग खर्च हा वार्षिक एकूण उत्पन्नापेक्षा जास्त आहे अशा राज्यात कर्जबाजारीपणाचे प्रमाण जास्त आहे. मात्र पंजाब व कर्नाटक ही दोन राज्ये याला अपवाद ठरतात. वार्षिक उपभोग खर्च हा वार्षिक एकूण उत्पन्नापेक्षा कमी असूनही या राज्यात कर्जबाजारीपणाचे प्रमाण अनुक्रमे ६५.६ % व ६१.६ %आहे आणि सरासरी कर्जाची रक्कम अनुक्रमे रु.४१५७६ व रु.१८१३५ इतकी आहे. विशेष म्हणजे संपूर्ण देशात पंजाब हे राज्य कर्जबाजारीपणाच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर आहे. आंध्रप्रदेश, हरयाणा, केरळ, पंजाब, तामिळनाडू, या राज्यात दरडोई कर्जाची रक्कम रु.२४००० ते रु.४२००० च्या दरम्यान आहे.

आसाममध्ये कर्जबाजारीपणाचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे १८.१%आहे व कर्जाची सरासरी रक्कम रु.८१३ इतकीच आहे. त्यापाठोपाठ जम्मू व काश्मिरमध्ये हे प्रमाण ३१.८ % आहे व दरडोई कर्जाची रक्कम एकूण रु.१९०३ आहे. भारतात कर्जबाजारीपणामुळे गेल्या १०-१५ वर्षात जवळ जवळ २.५ लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत असा दावा शेतकरी संघटनेने केला आहे. कर्जबाजारीपणामुळे अनेक शेतकरी शेती व्यवसायातून बाहेर फेकले जात आहेत. स्थिती मूल्यमापन सर्वेक्षणाद्वारे (SAS) असाही निष्कर्ष काढलेला आहे की जर शेतकऱ्यांना इतर व्यवसायात जाण्याची संधी दिली तर ४०% शेतकरी शेतीतून बाहेर पडून इतर व्यवसायात काम करण्यास तयार आहेत. या सर्व गोष्टी हे सूचित करतात की, शेतकरी वर्ग हा अतिशय बिकट परिस्थितीतून जात आहे. ही परिस्थिती आणखी करुणाजनक होऊ नये यासाठी शेतकऱ्यांच्या उत्पन्न पातळीत वाढ करण्यासाठी पुरेसे प्रयत्न व उपाययोजना केलेल्या नाहीत हे उघड आहे. याचे विपरित परिणाम शेती व्यवसायावर होत आहेत.

भारतीय शेतकरी हा निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. शेतकऱ्यांना शेती उत्पादनाबाबत नेहमीच अनिश्चिततेस सामोरे जावे लागते. अशातच भर म्हणून त्यांच्या मालाला किफायतशीर भाव मिळत नाही. मध्यस्थांची साखळी शेतकऱ्यांची वारेमाप पिळवणूक करतात. राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, या सरकारी धोरणानुसार अल्प व्याजदराने कर्ज पुरवठा करीत असल्या तरी शेतकऱ्यांच्या गरजेइतका कर्ज पुरवठा करीत नाहीत. अनेक शेतकरी विशेषत: प्रतिकुल नैसर्गिक परिस्थितीशी सामना करणारे शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले जात आहेत. त्यापैकी अनेक जण आत्महत्येचा मार्ग पत्करत आहेत.

**समारोप :**

प्रतिकुल नैसर्गिक परिस्थिती, शेती उत्पादन खर्च व शेतीपासून मिळणारे उत्पादन यांचा मेळ न बसणे, शेतमालाच्या आधारभुत किमती व सर्वसाधारण घाऊक किंमतीचा निर्देशांक यामध्ये मेळ न बसणे, कृषी मूल्य आयोगाला स्वायत्तता नसणे, मध्यस्थांची साखळी, अपुरी सिंचन सुविधा,

शेतीपूरक जोड व्यवसायाकडे दुर्लक्ष, मुक्त आयात धोरण, शेतकऱ्यांची व्यसनाधिनता, अनावश्यक बाबींवर होणारा अनुत्पादक खर्च इत्यादी अनेक कारणे शेतकऱ्यांच्या हलाखीस व आत्महत्येस जबाबदार आहेत. आज देशाचा आधारस्तंभ असणारा शेतकरी अनेक समस्यांनी ग्रासला आहे. अशा शेतकऱ्यांना उभे करणे हे समाजाचे म्हणजेच सरकारचे कर्तव्यच आहे. कृषीमूल्य आयोगाला निवडणुक आयोगाप्रमाणे स्वायत्तता देणे आणि शेतीसाठी स्वतंत्र अंदाजपत्रक मांडून शेतीसाठी भरीव तरतूद करून शेतीत कायमस्वरुपी सुधारणा करणे महत्त्वाचे आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शेती व्यवसाय व शेतकरी टिकून राहिला पाहिजे व त्यांना सुख-समाधानाचे दिवस पहायला मिळावेत यासाठी जाणीवपूर्वक धोरणे आखून त्यांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

संदर्भ:


१) S. K.Mishra and V. K. Puri, *Indian Economy*, Himalaya Publishing House, Mumbai - 2011

२) Report on Farmer's suicides in Maharashtra-2006

३) *Yojana*, August 2006, p.no.56, 3, Siddharath

४) Siddharat Mishra, Sangita Shroff-*Farmer's suicide in Maharashtra*, EPW, Dec.8, 2007

५) Economic & Political Weekly Feb. 2006

६) Economic & Political Weekly Sept. 22-28, 2006

७) *Dnyanmudra* (Edited), *Farmer's Suicide in India* (2007), Deep & Deep Publication, New Delhi

८) विकल्पवेध, ऑगस्ट १६-३१, २०१०

९) विकल्पवेध, १-१५ जून, २०१०

१०) विकल्पवेध, १-१५ नोव्हें., २००९

११) योजना, अंक १, ऑगस्ट, २००७

१२) योजना, अंक ३, ऑक्टोबर, २००७

# भारतातील ऊर्जा स्थिती - काही आयाम

विद्या राहुल म्होपरे, कोल्हापूर
संशोधनार्थी, अर्थशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ
आजीव सदस्य क्र. ११९५
भ्रमणध्वनी: ९९२३८७९०२०

जी. डी. जाधव, विटा
अर्थशास्त्र विभागप्रमुख
बलवंत कॉलेज, ता.खानापूर, जिल्हा सांगली
आजीव सदस्य क्र. ४५७

## प्रस्तावना:

संपूर्ण जगात आज अतिशय वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्था नावारूपास येत आहे. गेल्या पाच वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा वृध्दीदर सातत्याने ७% च्या आसपास राहिला आहे. डोमिनीक विल्सन आणि रूपा पुरूषोथमन यांच्या मते, भारतीय अर्थव्यवस्थेत पुढील ३० ते ५० वर्षाच्या काळात अतिशय वेगाने वाढण्याची क्षमता असून वृध्दीदर हा पुढील ३० वर्षाच्या काळात ५% पेक्षा अधिक राहील. कोणत्याही अर्थव्यवस्थेची वृध्दी ही प्रामुख्याने ऊर्जा आणि मानव संसाधन या दोन प्रमुख बाबींवर अवलंबून असते. ऊर्जेला वृध्दीचे मशिन म्हणून सुद्धा ओळखतात. ऊर्जेला मानवी श्रमाची साथ मिळाल्यास शेती, उद्योग, सेवा अशा सर्वच क्षेत्रातील उत्पादन क्षमता वेगाने वाढते. अलिकडील काळात पेट्रोल व डिझेलचे वाढते भाव लक्षात घेता जगात ऊर्जा युध्द सुरू झाल्याचे दिसून येते. भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाकडील माहितीन्वये, भारतात वर्ष २००८ मध्ये दरडोई ६३१ किलो वॅट तास ऊर्जेचा उपभोग घेतला गेला होता. तो वर्ष २०१२ मध्ये दरडोई १००० किलो वॅट तास एवढा अपेक्षीत आहे. त्यामुळे भारताला सध्याची ऊर्जानिर्मितीची क्षमता सातत्याने वाढवणे गरजेचे आहे.

## पारंपरिक व अपारंपरिक ऊर्जा:

आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी मानव जे श्रम करतो व त्यासाठी

जी शक्ती वापरतो त्याला ऊर्जा असे म्हणतात. पदार्थांच्या अंगी असलेल्या कार्य करण्याच्या क्षमतेला देखील ऊर्जा म्हणतात. अशी ऊर्जा वाहनांना पेट्रोल/ डिझेलमुळे मिळते, तर दिव्याला विद्युत ऊर्जा लागते. जी ऊर्जा साधने नव्याने निर्माण करता येणे शक्य नसते त्यांना पारंपरिक उर्जा साधने (उदा.पेट्रोल, डिझेल, कोळसा इ.) म्हणतात. तर ज्या ऊर्जा साधनांचा क्षय होत नाही त्यांना अपारंपरिक (उदा.सौर ऊर्जा, पवन ऊर्जा इ.) ऊर्जा साधने म्हणतात.

अ) पारंपरिक ऊर्जा साधने:

भारतातील ऑईल, गॅस व कोळसा या पारंपरिक ऊर्जा साधनांच्या उत्पादनाची प्रातिनिधीक स्वरूपातील चर्चा खाली केलेली आहे.

१. ऑईल आणि गॅस:

वित्तीय वर्ष २०११-१२ मध्ये कच्च्या तेलाचे अंदाजित उत्पादन ३८.१९ दशलक्ष मेट्रीक टन होते. जे वर्ष २०१०-११ (३७.७०) च्या तुलनेत १.३३% नी अधिक आहे. वर्ष १९५०-५१, १९८०-८१ व २०००-०१ मध्ये हे उत्पादन अनुक्रमे ०.३, १०.५ व ३३ द.मे.ट. होते. देशांतर्गत कच्च्या तेलाचे उत्पादन एप्रिल-डिसेंबर २०११-१२ मध्ये २८.७० द.मे.ट. झाले. जे वर्ष २०१०-११ च्या तुलनेत १.९% नी अधिक आहे. थोडक्यात वित्तीय वर्ष २०१०-११ च्या तुलनेत वर्ष २०११-१२ मध्ये कच्च्या तेलाचे अधिक उत्पादन झालेले दिसून येते.

नैसर्गिक गॅसचा विचार करता वर्ष २०११-१२ (एप्रिल ते डिसेंबर) मध्ये हे उत्पादन ३६.१९ अब्ज घन मीटर एवढे एवढे झाले. जे वित्तीय वर्ष २०१०-११ च्या तुलनेत ८.८०% (३९.६८) नी कमी झालेले आहे. नैसर्गिक गॅसची देशातील मागणी सातत्याने वाढत आहे. वर्ष २०११ (एप्रिल ते डिसेंबर) मध्ये पश्चिम ऑस्ट्रेलियाच्या काही द्रवरूप नैसर्गिक गॅस प्रकल्पांमधून एकूण ८.१७ दशलक्ष मेट्रीक टन तर वर्ष २०१०-११ मध्ये ८.९५ द.मे.ट. गॅसची आयात भारतात करण्यात आलेली होती. यावरून देशातील तेल व गॅसची वाढती मागणी लक्षात येते. सध्या देशात कच्चे तेल, LPG व गॅसची एकूण पाइप लाईन अनुक्रमे ८५५८, २५१३ व १३५०८ कि.मी. असून त्याची वाहतूक क्षमता अनुक्रमे १०६.४५ MMT, ३.९४ MMT व ३३४ MMSCMD एवढी आहे.

२. कोळसा:

साधारणपणे नऊशे वर्षापूर्वी कोळसा या इंधनाचा शोध लागला. आधुनिक काळातील औद्योगिकरणाची सुरूवात कोळशाच्या शोधामुळे झाली. आजदेखील जगातील एकूण ऊर्जेच्या ४०% पेक्षा अधिक ऊर्जा कोळशापासूनच मिळविली जाते. भारतात ९०% पेक्षा अधिक कोळशाचा वापर अन्न शिजविण्याव्यतिरीक्त इतर कारणांसाठी केला जातो. एप्रिल-नोव्हेंबर २०११ मध्ये देशात एकूण ३०७ द.ट. कच्च्या कोळशाचे उत्पादन झाले होते. हेच प्रमाण वर्ष २०१० मध्ये ३२० द.ट. होते. अन्न शिजविण्यासाठी लागणाऱ्या कोळशाचे उत्पादन याच कालावधीत अनुक्रमे २८.३ व २८.७ द.ट. झाले होते. दोन्ही प्रकारच्या कोळसा उत्पादनात पर्यावरणीय कायदे, कोळसा खाण, परिसरातील अती पर्जन्यमान, राज्यनिहाय बदलते कायदे इ. कारणांमुळे घट झालेली दिसून येते. ही घट भरून काढण्यासाठी व वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी वर्ष २०१०-११ मध्ये भारतात

६८.९ द.ट. कोळशाची आयात करण्यात आलेली होती. वर्ष १९५०-५१, १९८०-८१ व २०००-०१ मध्ये भारतात कोळशाचे एकूण उत्पादन अनुक्रमे ३२.३०, ११३.९१ व ३०९.६३ द.ट. झाले होते. तर दगडी कोळशाचे उत्पादन १९८०-८१, २०००-०१ व २०१०-११ मध्ये अनुक्रमे ५.११, २२.९५ व ३७.७४ द.ट. झाले.

थोडक्यात ऑईल, गॅस, कोळसा या तीनही पारंपरिक ऊर्जा साधनांच्या उत्पादनांची व आयातीची प्रवृत्ती लक्षात घेता देशात या ऊर्जा साधनांचा वापर अतिशय वेगाने वाढत आहे. परंतु पुरवठा त्या वेगाने वाढत नसल्याचे दिसून येते. सबब यावर रामबाण उपाय म्हणून अपारंपरिक ऊर्जा साधनांच्या वापराच्या प्रक्रियेने जोर धरणे आवश्यक आहे. एवढेच नव्हे तर ती काळाची गरज बनली आहे.

### ब) अपारंपरिक ऊर्जा साधने:

१. सौर ऊर्जा:

सूर्यकिरणांमध्ये असलेल्या ऊर्जेस सौर ऊर्जा असे म्हणतात. सध्याच्या इंधन टंचाईच्या काळात जगातील सर्वच लोकांना सौर ऊर्जेचे महत्त्व पटले आहे. सौर घटकांचा वापर आजकाल मनगटी घड्याळ, कॅलक्युलेटर, मोबाईल इ. मध्ये सर्रास केलेला दिसतो. सौर दिवे, सूर्य चुली ही साधने देखिल नित्याची झालेली आहेत. परंतु अजूनही सौर ऊर्जेबाबतचे सखोल संशोधन भारतात झालेले दिसून येत नाही. महाराष्ट्रातील लातूर येथे संशोधन प्रकल्पांतर्गत एक मोठी सौर डिश बसविण्यात आलेली आहे. ज्याद्वारे दूध गरम करून पाश्चराइज्ड केले जाते. अशाच प्रकारचे अन्न प्रक्रिया करणे, शेतमाल वाळविणे, पाणी तापविणे आणि अन्न शिजविणे इ. कामांसाठीचे सौर ऊर्जेचे प्रकल्प देशाच्या विविध भागात कार्यरत आहेत. गरज आहे ती लोक जागृतीची आणि स्वस्त सौर उपकरणे उपलब्ध होण्याची.

२. पवन ऊर्जा:

पवन ऊर्जेचा वापर सर्वप्रथम हॉलंड या देशात करण्यात आला. या देशात बाराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत असंख्य पवनचक्क्या वापरात होत्या. अलीकडे जगातील सर्वच देशात पवनचक्क्यांचा वापर करून मोठ्या प्रमाणात ऊर्जा निर्मिती केली जात आहे. ३१ मार्च, २००६ अखेर औद्योगिक क्षेत्रात ५२०० मेगा वॅट पेक्षा अधिक ऊर्जेची निर्मिती पवन ऊर्जेद्वारे करण्यात आली होती. खाजगी क्षेत्राच्या प्राधान्यामुळे पवन ऊर्जेत भारताने चांगली प्रगती केली आहे. दहाव्या पंचवार्षिक योजनेत पवन उर्जेचे जे ध्येय होते त्यापेक्षा अधिक ऊर्जेची निर्मिती करण्यात आली होती. आज जगात भारताचा पवन ऊर्जेच्या बाबतीत जर्मनी, यु.एस.ए. व स्पेन नंतर चौथा क्रमांक लागतो. भारताची ३० जून, २०१० अखेर पवन ऊर्जा निर्मितीची क्षमता १२ GW एवढी होती. ही क्षमता जगात पाचव्या क्रमांकाची असून वार्षिक पवन ऊर्जा वृध्दीमध्ये भारताचा जगात तृतिय क्रमांक लागतो. आज डोंगरी भागात वाऱ्याच्या वेगाने फिरणारी जी मोठी पाती आपण बघतो हे त्याचेच फलीत आहे असे म्हणावे लागेल. विशेष म्हणजे भारत सरकारच्या नूतन आणि पुनर्निर्मितीक्षम ऊर्जा मंत्रालयामार्फत तसेच IREDA मार्फत पवन आणि सौर ऊर्जेच्या प्रकल्पांना वित्तीय सहाय्य दिले जाते. त्यामुळे पवन ऊर्जा केंद्राच्या वाढीस मोठी गती मिळत आहे.

वीज निर्मिती:

आजही देशाच्या ग्रामीण भागात अपुऱ्या वीज पुरवठ्यामुळे भारनियमनाचा प्रश्न निर्माण झालेला दिसतो. सर्वच स्तरांवर विजेची वाढत

चाललेली मागणी याला कारणीभूत आहे. एप्रिल-डिसेंबर २०१०-११ या वर्षात देशात ५९८.२४ अब्ज किलो वॅट तास वीज निर्मिती झाली होती. हेच प्रमाण एप्रिल-डिसेंबर, २०११-१२ मध्ये ६५३.४५ KWh(९.२३% वाढ) पर्यंत वाढले. याच कालावधीत हायड्रोइलेक्ट्रीक -९०.१६९ वरून १०७.५१ KWh (१९.२३% वाढ), थर्मल ४८४.८६ वरून ५१७.१२ KWh (६.६५ % वाढ) तर न्यूक्लीअर -१७.८५४ वरून २३.७९० KWh (३३.२४% वाढ) पर्यंत ही ऊर्जानिर्मिती झालेली आहे. सदर कालावधीत भुतान या देशाकडून आपण ५.३६० KWh वीज आयात करत होतो ते ५.०२८ KWh पर्यंत घटलेले आहे. विशेष म्हणजे वर्ष २००६-०७ मध्ये एकूण वीज तूट ९.६% होती. ती एप्रिल-डिसेंबर २०११ मध्ये ७.९% पर्यंत घटल्याचे दिसून येते. अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात एकूण ७८७०० MW एवढी वीजनिर्मिती क्षमतेत वाढ झालेली आहे. एप्रिल २०११ ते १५ जानेवारी २०१२ दरम्यानच्या काळातील केंद्र, राज्य व खाजगी क्षेत्रातील थर्मल, हायड्रो व न्यूक्लीअर ऊर्जा निर्मितीचे एकूण ध्येय व वास्तव परिस्थिती लक्षात घेता असे दिसते की, केंद्राचे ध्येय ५७२५ MW होते. प्रत्यक्षात २८२० MW (ध्येयाच्या ४९.३%) निर्मिती झाली. राज्याचे ध्येय ४२६६ MW होते प्रत्यक्षात १६१८.२ MW (ध्येयाच्या ३७.९ %), खाजगी क्षेत्राचे ध्येय ७६१० MW होते. प्रत्यक्षात ७७६९.५ MW (ध्येयाच्या १०२.१%) निर्मिती झाली. थोडक्यात खाजगी क्षेत्राची निर्मिती ही केद्र व राज्य सरकारपेक्षा खूपच चांगली आहे. त्यामुळे शासन स्तरावर याची योग्य ती दखल घेवून कार्यवाही करणे गरजेचे आहे. तरच येणाऱ्या काही वर्षात भारनियमनाचा प्रश्न पूर्णत: सुटू शकेल अन्यथा नाही.

## समारोप:

एकंदरीत भारतात मार्च २०१० अखेर अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून एकूण ऊर्जेच्या फक्त ९.७% ऊर्जेची निर्मिती होत होती. उर्वरित ९०.३% ऊर्जेसाठी पारंपरिक स्त्रोतांचाच वापर करावा लागत होता. म्हणजेच पवन ऊर्जा व काही प्रमाणात गोबरगॅस वगळता आजही भारतात अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांनी आवश्यक ती गती पकडलेली नाही. पारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचाच वापर आज अधिक होताना दिसतो. परंतु जोपर्यंत अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांची सर्व स्तरात प्रगती होत नाही तोपर्यंत भारताची चिरंतन विकासासह आर्थिक वृद्धीची कल्पना प्रत्यक्षात येईल असे वाटत नाही.

## संदर्भ:


1. *Economic Survey of India 2011-12*, Directorate of Eco.& Statistics, Govt. of India, 2012.

2. *Indian Renewable Energy Status Report,* Background Report for DIREC 2010, Oct. 2010.

3. Kakodkar Anil, *Energy in India for the Coming Decades*, www. dae. gov.in/iaea/ak-paris0305.doc, Date : 15/05/2012.

4. http://www.economywatch.com/

business-and-economy/india-energy.html – Date : 15/05/2012.

5. http://www.vestas.com/in/in/wind-power-in-india/indian-economy-and-power-sector.aspx – Date : 15/05/2012.

६. म्होपरे (सुतार) विद्या राहुल, (२०००), *"जांब गावातील ऊर्जा वापर"*, एम.ए.भाग-१ पर्यावरणाचे अर्थशास्त्र प्रकल्प, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**'अर्थसंवाद' अंकासाठी त्वरित लेख पाठवा !**

**फक्त एवढच करा...**

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 असावी. गरज असल्यास एखादा टेबल घ्यावा. लेखातील टेबलचा आकार सामान्यपणे अर्धा ते पाऊण कागद इतका असावा.
- PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word **मध्ये टाईप करून लेख पाठवू नयेत.**
- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे त्वरीत पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, मोबाईल क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# भारतीय अर्थव्यवस्थेतील वित्तीय समावेशन

युगंधरा एस. टोपरे, औरंगाबाद
शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालय
आजीव सदस्य क्र. १०२२
भ्रमणध्वनी: ९८५०६८३७३९

प्रस्तावना:

नवीन आर्थिक धोरण, जागतिकीकरणाचा अंगिकार आणि वित्तीय व्यवस्थेतील धोरणात्मक बदल यांचा परिणाम गेल्या वीस वर्षांच्या कालावधीत भारतीय अर्थव्यवस्थेवर खूप मोठ्या प्रमाणात झाला आहे. अर्थव्यवस्था जसजशी बाजाराभिमूख होत गेली तसतशी बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेतील असमानता समोर येत आहे. बाजारात ही असमानता असण्याचे प्रमुख कारण जसे साधनांची असमान उपलब्धता हे आहे तसेच ग्राहकांची वित्तीय निरक्षरता हेही आहे. अधिकाधिक वित्तीय साक्षरता ही वित्तीय समावेशनाचे (Financial Inclusion) उद्दिष्ट पूर्ण करण्यास सहाय्यक ठरणारी आहे. सर्वसमावेशक विकासाचे (Inclusive Growth) उद्दिष्ट वित्तीय समावेशनाशिवाय अपूर्ण आहे. अर्थव्यवस्थेतील वित्तीय बाजारात येणाऱ्या अनेक संस्था, बँका, विविध वित्तीय साधने याचा सामान्य माणसाच्या विकासासाठी तेव्हाच उपयोग होऊ शकतो जेव्हा तो या प्रक्रियेचा भाग असेल तसेच याबाबत त्याला पूर्ण माहिती असेल.

वित्तीय समावेशन (Financial Inclusion):

वित्तीय समावेशन ही एक व्यापक संकल्पना असून, देशातील विविध वित्तीय संस्थांनी त्यांची विविध वित्तीय साधने नागरिकांना न्याय्य पद्धतीने, वेळेवर आणि पुरेशा सोयींसह पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्याची ही प्रक्रिया आहे. वित्तीय सेवांमधे बचत, गुंतवणूक, विमा, पैसे / धनाकर्ष जमा करण्याची सुविधा, पतसुविधा इत्यादींचा समावेश होतो. वित्तीय संस्थांमधे व्यापारी बँक, खाजगी बँका, पोस्ट ऑफिस बचत खाते, लघुक्ति, स्व-बचत गट, वित्तीय संस्थांचा समावेश होतो. सी. रंगराजन

समिती (२००६) ने केलेल्या व्याख्येनुसार, ''देशातील विविध गरजू समूह, कमी उत्पन्न गटातील लोक तसेच दुर्बल घटक यांना वेळेवर वाजवी किंमतीत आणि पुरेशा प्रमाणात पतपुरवठा तसेच वित्तीय साधनांच्या उपलब्धतेची हमी देणारी प्रक्रिया म्हणजे वित्तीय समावेशन होय.''

### वित्तीय समावेशन धोरण व आवश्यकता:

अर्थशास्त्रातील अनेक सिद्धांत हे आर्थिक विकासात वित्तपुरवठ्याची भूमिका महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट करतात. मात्र आधुनिक सिद्धांतात वित्तीय समावेशनही आवश्यक असल्याचे म्हटले आहे. वित्तीय समावेशन हे केवळ मागास किंवा विकसनशील देशांमध्येच आवश्यक आहे असे नाही, तर ते विकसित देशांतही महत्त्वाचे आहे. विकसित देशांत साधनांचा प्रचार झालेला असल्यामुळे समावेशन अधिक आहे. मात्र वित्तीय साक्षरता ही तितकीच आवश्यक आहे. युरोपियन आर्थिक पेचप्रसंगांच्या पार्श्वभूमीवर भारताचे वित्तमंत्री प्रणव मुखर्जी यांनी मांडलेली भूमिका खूप महत्त्वाची आहे. त्यांच्या मते, ''लोकांमधे वित्तीय साक्षरता जर अधिक असती तर कदाचित या आर्थिक पेचाची तीव्रता युरोपात कमी झाली असती. त्यामुळेच बँकिंग आणि वित्तीय व्यवस्थेकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे.'' (मुखर्जी २००९) त्यामुळेच विविध देशांत, प्रामुख्याने उदयोन्मुख बाजारपेठांमधे वित्तीय समावेशन साध्य करणे ही अग्रक्रमाची बाब आहे. भारतातही वित्तीय विकास परिषद आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने यासाठी विविध उपाययोजना आखल्या आहेत. २००६ मधे वित्तीय समावेशनासंदर्भात स्थापना केलेल्या सी.रंगराजन समितीनेही महत्त्वपूर्ण शिफारसी केल्या आहेत. त्यानुसार

१) २००० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या बँक नसलेल्या गावांची यादी तयार करून २०११-१३ या काळात तेथे बँक सुविधा देण्यात यावी.

२) बँक सुविधा इंटरनेट, मोबाईल बँकिंग किंवा बँकेचे व्यवहार करण्यासाठी नियमित गावात येणारे बँक प्रतिनिधी या कोणत्याही स्वरुपात चालेल.

३) प्रत्येक राज्यातील व जिल्ह्यातील अग्रणी बँकेने पुढाकार घेऊन, जिल्हास्तरीय समितीच्या संगनमताने बँकविरहीत गावे शोधून बँक सुविधा पुरवावी.

४) प्रत्येक बँकेने वित्तीय समावेशनाचा आराखडा तयार करावा.

५) बँक सुविधा पुरवतांना बचत खाते, देयक सेवा, देयक जमा करण्याची सुविधा, तातडीने कर्जपुरवठा सुविधा आणि उद्योग स्थापन करण्यास इच्छुक असणाऱ्यांना पतपुरवठा या प्रमुख सोयी असणे आवश्यक आहे.

या व्यतिरिक्त रिझर्व्ह बँक प्राधान्य क्षेत्राला कर्जपुरवठा (Priority Sector Lending), अग्रणी बँक यासारख्या योजना राबवत असली तरीही वित्तीय क्षेत्रातून

अपवर्जित (Excluded) लोकसंख्येचे प्रमाणही भारतात मोठे आहे असे काही अभ्यास दाखवतात.

## वित्तीय समावेशनाची आवश्यकता :

१) वित्तीय असंघटित क्षेत्रातील अनिश्चिततेमुळे होणारे सामान्य माणसाचे नुकसान टाळता येईल.

२) वित्तीय सेवा कमी अंतरावर, पाहिजे त्यावेळी आणि वाजवी दरात उपलब्ध होतील.

३) अर्थव्यवस्थेतील पारदर्शकता वाढेल.

४) सामान्य माणसांना भविष्यातील आर्थिक नियोजन करण्यास मदत होईल.

## भारतीय वित्तीय व्यवस्था:

भारतीय वित्तीय व्यवस्थेत अल्पकालीन आणि दीर्घकालीन निधीच्या पुरवठ्यानुसार नाणेबाजार आणि भांडवलबाजार हे दोन प्रमुख वित्तीय बाजार आहेत. व्यापारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, राष्ट्रीयीकृत तसेच परदेशी बँका, विविध वित्तीय कंपन्या, सुक्ष्म वित्त संस्था या नाणेबाजाराचाच भाग आहेत. सामान्य माणसाचा, वित्तीय व्यवहार करतांना प्रामुख्याने संबंध याच उपरोक्त संस्थांशी येतो. भांडवलबाजाराचा संबंध रोखे गुंतवणूक व अप्रत्यक्ष वित्त पुरवठ्याशी येतो. भारतात सहकार कायदा (१९०४), अग्रणी बँका (१९६९), प्रादेशिक ग्रामीण बँका (१९७४) याद्वारे ग्रामीण भागापर्यंत वित्तीय समावेशन होऊन, बँक सेवांचा लाभ ग्रामीण भारतालाही मिळावा हाच यामागील स्थापनेचा उद्देश होता. मात्र विविध अभ्यासगटांच्या निष्कर्षानुसार असे दिसते की, आजही ६०% भारतीय हे वित्तीय व्यवस्थेत सामावले गेले नाहीत.

बँक राष्ट्रीयीकरणानंतर भारतातील व्यापारी बँकांची खूप मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली. देशभरात एकूण ८५ हजारापर्यंत व्यापारी बँकांच्या शाखा आहेत. तक्ता क्र.१ मधील आकडेवारी व्यापारी बँकांचे वित्तीय व्यवस्थेतील योगदान स्पष्ट करते. ग्रामीण तसेच निमशहरी भागात व्यापारी बँकांच्या शाखांचा विस्तार झालेला आहे. एकूण कर्जांच्या ३५.१% कर्ज हे प्राधान्य क्षेत्राला दिले जाते. त्यात प्रामुख्याने कृषी, लघुउद्योग आणि शासनाच्या विविध योजनांतर्गत होणाऱ्या कर्ज वितरणाचा समावेश आहे. एकूण ठेवींच्या प्रमाणात मात्र दरडोई पतनिर्मिती ही केवळ २७,४८९ इतकीच आहे. बँक सुविधा, महाग कर्जे आणि कागदपत्रांची पूर्तता ही यामागील काही कारणे आहेत.

वित्तीय समावेशनासाठी रिझर्व्ह बँकेने विविध तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे सूचवले आहे. त्यात इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकींग तसेच ए.टी.एम. केंद्रांची सुविधा यांचाही समावेश आहे. क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड याचा वापर वाढवण्यासाठी बँका प्रयत्नशील आहेत. वर्ष २०१०-११ नुसार आज भारतात राष्ट्रीयीकृत बँकांची २३,४६६ तर परदेशी बँकांची १३६७ ए.टी.एम. केंद्रे आहेत. मात्र याचा वापर हा काही प्रमाणात निमशहरी तर अधिक प्रमाणात शहरी भागात आहे. चोवीस

तास बँक सुविधा तसेच कमी अंतरावर आणि कमी खर्चात पैसे काढण्याची आणि भरण्याची सुविधा ए.टी.एम. केंद्रांमुळे असली तरीही ते वापरणारी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या मानाने नगण्य आहे असे जागतिक बँकेची आकडेवारी सांगते.

## वित्तीय समावेशन निर्देशांक आणि भारतीय अर्थव्यवस्था:

भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेत केवळ ४०% कुटुंबांचे ठेव खाते असुन, २०% कुटुंबांची कर्जे आहेत आणि विम्याचे प्रमाण केवळ १५% आहे (बसु २००६) रिझर्व्ह बँकेच्या धोरणात्मक संशोधनपर शोधनिबंधात भारतातील वित्तीय समावेशनाच्या अभ्यासात राज्यनिहाय वित्तीय समावेशन निर्देशांक तयार केला आहे. हा निर्देशांक तयार करतांना अनेक सामाजिक आर्थिक निर्देशक वापरले असून, बँक खाते संख्या, भौगोलिक प्रदेशानुसार बँक शाखांची घनता, ए.टी.एम. केंद्र, बचत, पतनिर्मिती, रोख-ठेवी गुणोत्तर तसेच ठेवी-उत्पन्न गुणोत्तर इत्यादी निकष वापरले आहेत. यानुसार केरळ, महाराष्ट्र आणि कर्नाटकात उच्च वित्तीय समावेशन असून, प.बंगाल, गुजरात आणि पूर्वेकडील राज्यांतील वित्तीय समावेशन पातळी कमी आहे. वित्तीय समावेशन निर्देशांक क्रमवारीत केरळ पहिल्या क्रमांकावर तर महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर आहे.

जागतिक बँकेने तयार केलेल्या वैश्विक वित्तीय समावेशन निर्देशांकात भारतातील वित्तीय समावेशनाबाबत प्रसिध्द केलेल्या आकडेवारीनुसार बँकेत साधारण खाते असणारी प्रौढ लोकसंख्या केवळ ३५.२% इतकी आहे. मोबाईलद्वारे पैसे पाठवणे किंवा जमा करणे याचे प्रमाण हे एक टक्क्यांपेक्षाही कमी आहे. कर्ज घेतांना नातेवाईक, मित्रांकडून कर्ज घेण्याचे प्रमाण १९.७% इतके तर वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्याचे प्रमाण केवळ ७.७% इतके आहे. खाजगी कर्जदाता किंवा सावकाराकडून कर्ज घेण्याचे प्रमाण ६.६% इतके आहे. कर्ज घेण्याच्या कारणांचे विवेचन करताना जागतिक बँकेची आकडेवारी सांगते की आरोग्य आणि दवाखान्यांसाठी सर्वाधिक कर्ज घेतले जाते. (१४.२%) विमा काढण्याचे प्रमाण हे केवळ ६.८% इतकेच आहे. ब्रिक्स् राष्ट्रांशी (ब्राझील, रशिया, चीन, द. आफ्रिका आणि भारत) तुलना केल्यास बँक खात्यांचा वापर, विम्याचा वापर आणि इंटरनेट बँकिंगबाबत भारत चीनच्या तुलनेत मागे असल्याचे दिसते.

## समारोप:

युरोपियन आर्थिक पेचप्रसंगाच्या पार्श्वभूमीवर वित्तीय व्यवस्था आणि समावेशनाबाबत रिझर्व्ह बँक आणि भारत सरकारने काळजीपूर्वक पावले उचलणे आवश्यक आहे. विकसित आणि उच्च उत्पन्न गटातील राष्ट्रांचे समावेशन विषयक धोरण आणि भारतासारख्या कमी ते मध्यम उत्पन्न गटातील राष्ट्राचे समावेशन विषयक धोरणात फरक करणे गरजेचे आहे. भारतात केवळ आर्थिक स्थैर्यासाठीच नाही तर सर्वसमावेशक विकासासाठी वित्तीय समावेशन अपरिहार्य आहे.

तक्ता क्र. १
भारतातील व्यापारी बँकांची प्रगती

| | निर्देशक | मार्च २०१० |
|---|---|---|
| १) | व्यापारी बँकाची संख्या | १६९ |
| २) | व्यापारी बँकांच्या शाखा (सूचित बँका) | ८५३९३ |
| | ग्रामीण | ३२६२४ |
| | निम-शहरी | २०७४० |
| | शहरी | १७००३ |
| | महानगरी | १५०२६ |
| ३) | प्रति शाखा असणारी लोकसंख्या (प्रति १०,०००) | १४ |
| ४) | सूचित व्यापारी बँकांच्या ठेवी (करोड) | ४४१२८२६ |
| ५) | सूचित व्यापारी बँकांच्या पतनिर्मिती (करोड) | ३२४४७८८ |
| ६) | सूचित व्यापारी बँकांच्या प्रती शाखा ठेवी (लाख) | ५२६१ |
| ७) | सूचित व्यापारी बँकांच्या प्रती शाखा पतनिर्मिती (लाख) | ३८०० |
| ८) | सूचित व्यापारी बँकांची दरडोई पतनिर्मिती () | २७४८९ |
| ९) | प्राधान्य क्षेत्राला दिली जाणारी कर्जे (एकूण कर्जांच्या पैकी) | ३५.१ |

*(Source : www.rbi.org)*

**संदर्भ:**


1) Asli Demigul-Kunt and Leora Klapper, 2012, *"Measuring Financial inclusion : The Global Findex Database"*, WPPR-6025.

2) S. Chattopadhyay (2011), *Financial Inclusion in India : A case study of W.Bengal,* RBI Paper (www.rbi.org)

3) Sarma M (2008), *Index of Financial Inclusion* : ICRIER Working Paper.

4) Report of the C.Rangrajan Committee on Financial Inclusion in India (2008)

5) Rakesh Mohan (2006), *Eco-growth, Financial deepening and Financial inclusion,* Address at BANCON, Hyderabad.

# भारतातील अन्नसुरक्षा - एक मंथन

रामलिंग कुंडलिक नाळे, सरूड
व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिव-शाहू महाविद्यालय
ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर
आजीव सभासद क्र. ११०७
भ्रमणध्वनी: ९४२११००४२७

## प्रास्ताविक:

*'अन्नात् भवति भूतानि'* असे एक संस्कृत सुवचन आहे. अन्न ही मानवाची मूलभूत गरज असून मानवाला त्याच्या आरोग्य चपळ जीवनासाठी आवश्यक इतका शुद्ध व सकस अन्नधान्याचा पुरवठा होणे आवश्यक आहे. भारतात एकीकडे अन्नधान्याची कोठारे तुडूंब भरलेली आहेत तर दुसरीकडे लक्षावधी माणसे अजूनही अर्धपोटी जीवन कंठत आहेत. केवळ २००० कॅलरिज (उष्मांक) मिळणे इतपत मानवास अन्नधान्याचा पुरवठा होत आहे. भारतातील लोकांचा आहार ज्वारी, बाजरी, मका इत्यादी अपौष्टिक अन्नधान्यावर अवलंबून आहे. मानवाच्या आहारात भात, गहू, दूध, फळे, अंडी, मांस, भाजीपाला इत्यादी वस्तूंचे प्रमाण कमी आहे. भारतातील अन्नधान्याचे संख्यात्मक स्वरूप पाहण्यापेक्षा गुणात्मक स्वरूप पाहणे व त्यावर मंथन होणे हे भारतातील अन्नसुरक्षेसाठी गरजेचे आहे. यादृष्टीने विचार करून प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील अन्नसुरक्षेचे वास्तव चित्र स्पष्ट करण्याचा प्रयत्न आहे.

## अन्नसुरक्षा म्हणजे काय?

अन्नसुरक्षा ही व्यापक संकल्पना असून विविध संघटनांनी अन्नसुरक्षेचा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१) "अन्नसुरक्षा याचा अर्थ सर्वांना, सदासर्वकाळ अन्नधान्य मिळविण्यासाठी भौतिक व आर्थिक क्षमतेची निर्मिती करणे होय."

२) "Ensuring that all people at all times have both physical & Economic access to basic food they need." - *Food and Agricultural Organization, 1983.*

३) "Access by all people at all times to enough food for an

active healthy life" - *World Development Report, 1986.*

४) " सक्रिय व स्वास्थवर्धक आयुष्यासाठी सर्वांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करून देणे म्हणजे अन्नसुरक्षा होय"- जागतिक विकास अहवाल १९८६.

५) "एकंदरीत अन्नसुरक्षा म्हणजे सर्वांना सर्ववेळ पोषणयुक्त अन्नाची उपलब्धता होणे होय."

**अन्नसुरक्षेच्या अवस्था :**

१) प्राथमिक अवस्था : मानवास आपले जीवन जगण्यासाठी पर्याप्त अन्नधान्याची उपलब्धता असण्याच्या दृष्टीने या अवस्थेत प्रमुख अन्नधान्ये व भरडधान्यांचा समावेश होतो.

२) द्वितीय अवस्था - माणसाच्या आहाराच्या दृष्टिकोनातून प्रोटिनयुक्त घटक असणाऱ्या डाळींचा व अन्नधान्याचा समावेश या अवस्थेत केला आहे.

३) तृतिय अवस्था : या अवस्थेत अन्नधान्ये व डाळीबरोबरच दूध व दूग्धजन्य पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे.

४) चतुर्थ अवस्था : या अवस्थेत डाळी, दूध व दुग्धजन्य पदार्थाबरोबर फळे, भाजीपाला, अंडी, मांस, मासे इत्यादी पौष्टिक आहाराचा समावेश केला जातो.

अन्न सुरक्षेच्या अवस्थेवरून अन्नसुरक्षेचे मूर्त असे व्यापक स्वरुप स्पष्ट होते. याची भारतातील अन्नसुरक्षेशी तुलना करता अन्नसुरक्षेच्या व्यापक संकल्पनेला असे मूर्त रूप अद्यापही प्राप्त झालेले नाही असे म्हणावेसे वाटते.

**दरडोई उपभोग व अन्न सुरक्षा :**

अन्नसुरक्षेची कल्पना समजण्यासाठी दरडोई अन्नधान्याची उपलब्धता विचारात घेतली आहे.

**तक्ता क्र. १**

**अन्नधान्य उत्पादन व उपभोग**

| वर्ष | अन्नधान्य उत्पादन (द.ल.टन) | दरदिवशी/दरडोई उपभोग (ग्रॅम मध्ये) |
|---|---|---|
| १९५१ | ५०.८२ | ३३४.२ |
| १९६१ | ८२.०१ | ३९९.७ |
| ११७१ | १०८.४२ | ४१७.६ |
| १९८१ | १२९.५८ | ४१७.७ |
| १९९१ | १७६.३९ | ४६८.५ |
| २००१ | २४१.०० | ४७३.९ |

*स्रोत:* १. *योजना* अंक ३ रा, ऑक्टों, २०१०
२. *Kurukshetra* Vol-59, Mar-2011

तक्ता क्र. १ वरुन भारतातील १९५१ मध्ये अन्नधान्य उत्पादन ५०.८२ द. ल. टन तर दरडोई उपभोगाचे प्रमाण ३३४.२ ग्रॅम इतके होते. २०११ मध्ये अन्नधान्य उत्पादन २४१.०० द.ल. टन तर दरडोई उत्पादन ४७३.९ ग्रॅम इतका होता याचा अर्थ अन्नधान्याचे उत्पादन चार पटीपेक्षा जास्तीने वाढले मात्र दरडोई उपभोग फक्त १३९.७ ग्रॅमने वाढला आहे. याचा अर्थ अन्नसुरक्षा आजही गरजेची बाब आहे.

### अन्नसुरक्षेच्या अपयशाची कारणे :

१) भारताची लोकसंख्या वेगाने वाढत आहे.
२) अन्नधान्याच्या किंमती वेगाने वाढत आहेत.
३) भारतातील सार्वजनिक वाटप व्यवस्था पूर्णतः कोलमडली आहे.
४) पर्यावरणाची हानी व ऱ्हास होत आहे.
५) योजनांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे.

साधारणपणे वरील कारणे अन्नसुरक्षेचा प्रश्न बिकट होण्यास कारणीभूत ठरत आहेत. म्हणून आज २१ व्या शतकात भारतात अन्नसुरक्षेबाबत अन्नधान्य उत्पादनातील अस्थिरता, अतिरिक्त अन्नसाठा, उपासमार, दारिद्र्य, बेकारी, शेती अनुदानाचे अयोग्य धोरण इत्यादी अनेक आव्हाने आहेत. यामध्ये अन्नसुरक्षा हे एक ज्वलंत व मूलभूत आव्हान आहे.

### धोरणात्मक उपाययोजना :

१. अन्नधान्याच्या बेसुमार वाढत्या किंमती नियंत्रित करण्यासाठी धोरणात्मक उपायांची गरज आहे.
२. दुसरी हरितक्रांती घडून येण्यासाठी सर्व पातळींवरून प्रयत्न होणे आवश्यक आहे.
३. ग्राहकांच्या निवासस्थानी अन्नधान्याचे थेट वितरण करण्याची यंत्रणा उभारायला पाहिजे.
४. शेती उत्पादकता व एकूण उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्याच्या ताब्यातील जमीन त्याच्याकडून अमुक इतका काळ निश्चितपणे काढून घेतली जाणार नाही याची हमी व ठरविलेला काळ संपण्यापूर्वी दोन-तीन वर्षे अगोदर त्यापुढील निश्चित काळ वाढविण्यात यावा.
५. अन्नसुरक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचार कडक कारवाईने त्वरीत बंद करून खुल्या बाजाराकडे होणारी धान्याची बेकायदा वाहतुक थांबविली पाहिजे.
६. आपल्या देशातील भटक्या व विमुक्त जमाती गटातील लोकांना कोणताही ठराविक पत्ता नसलेल्या गरीबांना सर्वत्र चालतील अशी रंगीत *'रेशन कार्ड'* द्यावीत.
७. सार्वजनिक वाटप व्यवस्थेतील भ्रष्टाचाराचे मूळ शोधून काढून त्यावर कडक कारवाई करावी व सार्वजनिक वाटप व्यवस्था दुकानांची संख्या वाढवावी. ही वाढीव दुकाने *'महिला बचत गट'* यांना चालविण्यास परवानगी द्यावी.
८. सार्वजनिक ठिकाणच्या कार्यक्रमातील अन्नधान्याची नासाडी संपविणे. उदा. लग्न, मुंज, यात्रा इत्यादी.
९. नैसर्गिक आपत्तीमुळे अन्नाची होणारी नासाडी थांबविण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभाग सुरू करण्यात यावा.
१०. अन्नधान्याची पारंपरिक मळणी करण्याची पद्धत बंद करून मळणी यंत्राच्या सहाय्याने

मळणी करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे.

अन्नसुरक्षेसाठी वरील उपायांची धोरणात्मक अंमलबजावणी करताना अन्नधान्यास हमी भाव, अन्नधान्य क्षेत्रात वाढ करणे, अन्नधान्याचे राखीव साठे, भारतीय अन्नधान्य महामंडळाची प्रभावी भूमिका इत्यादीकडे सरकार बरोबरच स्वयंसेवी संस्था, धर्मादाय संस्था, सामाजिक कार्यकर्ते, समाज यांचेकडून प्रामाणिक प्रयत्न झाल्यास 'अन्नसुरक्षा एक मंथन' घडून आले असे आपण समजू या!

संदर्भ:


१. *भारतीय अर्थव्यवस्था,* प्रा. देसाई व प्रा.भालेराव.

२. *व्यावसायिक पर्यावरण,* प्रा. भोसले व प्रा.काटे.

३. *Indian Economy*, Mishra-Puri

४. *Kurukshetra*, Vol.59, No.5, Mar, 2010

५. *योजना,* अंक ३, ऑक्टोबर, २०१०

६. *अर्थसंवाद,* जानेवारी - मार्च, २००३

७. *अॅग्रोवन,* दि.४ ऑक्टोबर, २०११

८. *'शिवार्थ'* वार्षिक अंक, २४ व २५ डिसेंबर, २०११.

# भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या

आर. जी. रसाळ, प्रवरानगर
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, जि. अहमदनगर
आजीव सभासद क्र. ६७३
भ्रमणध्वनी: ९८५००४४०८९

**प्रस्तावना:**

आज आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ६४ वर्षे झाली. मात्र शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्षच झाल्याचे दिसून आल्याने देशात जवळ जवळ पाच वर्षात असंख्य बळीराजांच्या आत्महत्या झाल्या आहेत. आज हरितक्रांतीमुळे उत्पादन वाढले परंतु उत्पादित मालाचा झालेला खर्चही फिटू शकत नसल्याने आज ५०% पेक्षाही अधिक शेतकरी कर्जबाजारी आहेत. त्यांना सावकारांकडून कर्ज घेतल्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

भारतात बँक व्यवसायाचे दोन भाग आपण करतो, एक परंपरागत व असंघटित बँक व्यवसाय आणि दुसरा संघटित बँक व्यवसाय. परंपरागत बँक व्यवसाय क्षेत्र ऐतद्देशीय बँका आणि सावकार यांचे बनले आहे. संघटित बँक व्यवसाय क्षेत्रात आधुनिक व्यापारी बँका, परकीय बँका, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया इ. चा समावेश होतो. असंघटित क्षेत्रात सावकारांचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात आजही दिसून येते.

**सावकार:**

भारतात ग्रामीण वित्त पुरवठ्यात सावकारी कर्ज हा एक प्रश्न निर्माण झालेला आहे. ग्रामीण भागातील लोकांचे राहणीमान अत्यंत खालच्या पातळीवर आहे. विस्तृत ग्रामीण भागात दारिद्र्य पसरलेले आहे. ग्रामीण भागात बहुसंख्य लोक कर्जाच्या ओझ्याखाली दबले गेले आहेत. देश स्वातंत्र्यानंतर ग्रामीण कर्जबाजारीपणा कमी होण्याऐवजी वाढला गेल्याचे दिसते. याला अनेक कारणे जबाबदार आहेत. उदा. किंमत पातळीत होत असलेली वाढ, मोठ्या जमीनदारांनी अल्पभूधारकांजवळील जमिनी काढून घेतल्यामुळे शेतमजुरांच्या संख्येत झालेली वाढ, ग्रामीण भागातील वाढता बेरोजगार इ.

भारतात तर आज कर्जबाजारीपणा सतत वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे जमिनीवर अतिरिक्त ताण पडत आहे. परिणामत: जमिनीचे विभाजन व बिनकिफायतशीर धारणक्षेत्राच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. शेतीची दर हेक्टरी अल्प उत्पादकता, शेतीचे पावसावरील अतिरिक्त अवलंबित्व, वारंवार पिके बुडणे, शेतमालाची अकार्यक्षम विक्री व्यवस्था, अतिशय लहान भूधारकाच्या बाबतीत जमीन महसुलाचे अतिरिक्त ओझे, रुढी-परंपरेमुळे धार्मिक कार्यक्रमांवर अतिरिक्त खर्च, मद्यार्काचे सेवन करण्याच्या व अन्य घातक सवयींचे प्राबल्य, कुटीर उद्योगाचा ऱ्हास, ग्रामीण भागात मध्यम व मोठ्या प्रमाणावरील उद्योगांचा अभाव त्यामुळे रोजगाराच्या संधीचा अभाव, वडिलोपार्जित कर्ज फेडणे, ग्रामीण भागातील गरीब लोकांमधील निरक्षरता व अपरंपार दारिद्र्यामुळे त्यांची पिळवणूक करणाऱ्या सावकाराचे प्राबल्य, अनिश्चित शेती उत्पन्न इ. कारणामुळे ग्रामीण भागातील शेतकरी कर्जबाजारी होत गेलेला आहे.

ग्रामीण भागात सावकारी कर्जावरील व्याजदर अधिक प्रमाणात आकारतात कारण शेतकऱ्यांकडून बँकाचे किंवा सहकारी पतसंस्थेचे कर्ज थकल्यामुळे त्यांना बँका पुन्हा कर्ज देत नाही. परिणामत: शेतकऱ्याला सावकार हाच एकमेव कर्ज देणारा मार्ग असतो. सावकार तारण घेतांना बहुदा ऋणकोची जमीन तारण घेतो, ऋणकोने कर्ज परतफेड केली नाही तर आपोआप ती जमीन सावकार लुबाडतो, ही वस्तुस्थिती आजही आहे. त्यामुळे अनेक गरीब शेतकरी भूमिहीन झाल्याचे चित्र आपणास पहावयास मिळते.

### सावकाराचे अस्तित्व:

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतातील शेतकऱ्यांच्या वित्तीय गरजा भागविण्यासाठी अधिक लक्ष दिले जात असले तरी सावकारी कर्जाचे प्रमाण पूर्णत: घटलेले नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या वित्तीय गरजा समाधानकारक रीतीने भागविल्याशिवाय भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेची पुर्नरचना करता येणे आणि ग्रामीण लोकजीवन समृद्ध करता येणे शक्य होणार नाही. या दृष्टीने सहकारी पतपेढ्यांवर व बहुउद्देशीय सहकारी संस्थांवर तसेच व्यापारी बँकांच्या शाखा विस्तारावर भर देण्यात आला आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला केल्या जाणाऱ्या वित्तपुरवठ्यातील सावकाराकडून केल्या जाणाऱ्या वित्त पुरवठ्याचा हिस्सा कमी करुन संस्थात्मक वित्तपुरवठ्याचा हिस्सा वाढविण्याचा प्रयत्न शासनाकडून केला जात आहे. काही प्रमाणात ग्रामीण पतपुरवठ्यांचे पर्यायी मार्ग उपलब्ध करुन देण्यामुळे सावकारांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु भारतातील लक्षावधी खेड्यांच्या वित्तीय गरजा भागविण्यासाठी आणखी किती काळ लागतो ते नक्की सांगता येणे अवघड आहे. त्यामुळे दरम्यानच्या काळात सावकार आपले स्थान टिकवून आहे. अनेक भागात आज ही सावकार ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक अविभाज्य भाग बनला आहे. मात्र सावकाराच्या या पाशातून सुटका करण्यासाठी सरकारने लक्ष घालून नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

सावकारी किंवा संस्थात्मक कर्जाचा बोजा शेतकऱ्यांवर सतत वाढत आहे. मात्र शेतीतून मिळणारे उत्पादन अनिश्चित स्वरुपाचे आहे. बऱ्याचदा कोणत्या ना कोणत्या कारणाने पिके

वायाच गेलेली दिसतात. परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढलेल्या दिसतात.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेमुळे शेतकरी स्पर्धेत ओढला गेला आहे. तो उत्पादन करण्यासाठी कर्ज काढीत आहे. बाजारावर त्याचे नियंत्रण नाही. त्यामुळे शेतमालाला योग्य ती किंमत मिळत नाही. हे आजचे वास्तव आहे. मध्ययुगात शेतकऱ्यांना जगण्याचे कोणतेही हुकमी साधन नव्हते. दारिद्र्य, जुलूम आणि शोषण यामुळे आत्महत्या करणे किंवा वेडे होणे एवढेच त्यांच्यासाठी वाढून ठेवलेले होते. अशा काळात संत मंडळींनी शेतकऱ्यांना आत्महत्येपासून आणि मानसिक विकृतीपासून वाचविलेले आहे. त्यांना जगण्याचे प्रयोजन देऊन जगणे शिकविले आहे.

## जागतिकीकरण व शेतकऱ्यांच्या आत्महत्या:

भारतीय शेतीच्या आर्थिक चित्रावर धावती नजर टाकली तर सहज लक्षात येते की, भारतात लहान शेतकऱ्यांचे प्रमाण ६०% आहे. मध्यम शेतकऱ्यांचे प्रमाण ३०% आहे आणि मोठ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १०% आहे. त्यामुळे नवीन आर्थिक धोरणाचा फटका लहान शेतकऱ्यांना बसला आहे. जागतिकीकरणात बी-बियाणे, खते, औजारे यांच्या भरमसाठ प्रमाणात किंमती वाढल्या आहेत. पाऊस वेळेवर पडत नाही म्हणून दुष्काळांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत आहे.

अनेक शेतकरी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या धोरणांमुळे भूमिहीन झाले आहेत. याचाच परिणाम म्हणून शेतकरी आत्महत्या करीत आहेत. महाराष्ट्रातून विशेषत: विदर्भात आत्महत्यांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. आत्महत्यांचे हे फक्त संख्यात्मक वाढते प्रमाण नसून शेती वित्तपुरवठ्यांच्या प्रश्नांची तीव्रता वाढल्याचे ते लक्षण आहे. एकंदरीतच, शेतकऱ्यांची आत्महत्या हा केवळ एक आजार नसून एका अत्यंत भीषण आजाराचे ते फक्त एक लक्षण आहे. हे सरकारच्या वित्तसंस्थांच्या व व्यापक समाजाच्या जेव्हा लक्षात येईल तेव्हाच या प्रश्नांचे गांभीर्य खऱ्या अर्थाने समजू शकेल.

भारतीय व सार्वजनिक पातळीवरुन काही दशके प्रयत्न केल्यानंतरही शेतकरी सावकारी पाशातून मुक्त का होत नाही याची मूलभूत कारणे शोधणे हे सर्वच संबंधितांना अंर्तमुख करणारे ठरेल. शेतीसाठी कर्जाची आवश्यकता, वित्तीय संस्थांचा अपुरेपणा व अनियमितता, शेतकऱ्यांची कर्ज परतफेडीची असमर्थता आणि त्यातून सावकाराच्या आहारी जाण्याची अपरिहार्यता या चार बिंदूंना शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न वेढलेला आहे. प्रश्नाचं हे समग्र स्वरुप समजावून घेण्यात टाळाटाळ करणे हे शासनाच्या, शेतकऱ्यांच्या आपल्या अर्थव्यवस्थेच्या आणि एकंदर समाजाच्या व कोणाच्याच हिताचे नाही. प्रत्येक घटकाने अंतर्मुख होऊन स्वत:ची जबाबदारी ओळखली तरच यातून मार्ग निघू शकेल. कोणत्याही मूलभूत समस्येवरचा मार्ग कठिण असतो, तसाच हाही मार्ग कठीण आहे पण तोच खरा व टिकाऊ उपाय आहे.

## संदर्भ:


१) *Economic Survey of India : 2007-08*, Government of India, Ministry of Finance; Economic Division, Printed by The Manager, Government of India, New Delhi.

२) *प्रतियोगिता दर्पन*, भारतीय अर्थव्यवस्था, आगरा, २००८.
३) *आर्थिक उदारीकरणाचे कृषीक्षेत्रावरील परिणाम*, चांडक विजय, (२००५), 'व्यासपीठ' देशोन्नती अकोला.
४) *जागतिकीकरण: समस्या, आशय आणि अनुभव*, खेर सी.पं., २००२, दिलीपराज प्रकाशन, पुणे
५) *जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय*, खातू गजानन, २००१, अक्षर प्रकाशन, कोल्हापुर.

## ANNOUNCEMENT FOR CALL OF ARTICLES
## *DR. RAVINDRA SABNIS MEMORIAL PRIZE*

Marathi Arthashastra Parishad has constituted an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in form of an article published during the Calender Year 2011 in standard accredited journals on themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for submission of the entries (Two Copies) for this years contest is 20th September 2012. For further details, contact the undersigned at this address:

*Charudatta S. Gokhale, Plot No.10,*
*Professor Colony, Behind D.I.C., Jalgaon-425001.*

**Charudatta S. Gokhale,**
Executive President,
Marathi Arthashastra Parishad.
Mobile No.: 9422618410
Ph.(R) (0257-2252375).

# शेती क्षेत्रातील कर्जबाजारीपणा

**शकुंतला पाटील, इचलकरंजी**
जयवंत महाविद्यालय
आजीव सभासद क्रमांक: १०६
भ्रमणध्वनी: ९४२३८१४९४४

## पार्श्वभूमी:

स्वातंत्र्यानंतर शेती विकासाच्या अनेक योजना कार्यक्रम राबवले. शेतीचा विकास झाला. हरितक्रांती झाली. अन्नधान्याचे उत्पादन ५० दशलक्ष टनापासून २४० दशलक्ष टनापर्यंत वाढले पण त्यांची फळे शेतकऱ्यांच्या पदरी पडलेली नाहीत. हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येवरुन लक्षात येते. शेतीसमोर येत्या काळात इतर अनेक संकटेही आहेत. परंतु हे संकट जिवंतपणाबाबतचे आहे. मानवाची जगण्याची उमेद ज्या ठिकाणी संपते त्यावेळी विकास, प्रगतीही संपते. त्यामुळे वाढता कर्जबाजारीपणा व शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील मोठे आव्हान आहे. शेती व शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखल्याशिवाय खऱ्या अर्थाने शाश्वत विकास साध्य होणार नाही. त्यामुळे यावर गांभीर्याने विचारमंथन होऊन धोरणात्मक उपाय योजना आखण्याची गरज आहे.

## भारतीय शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा:

शेतीला अल्प, मध्यम व दीर्घकालीन कर्जाची गरज असते. आजही ग्रामीण भागात २७% लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगतात त्यामुळे त्यांना कर्ज काढूनच शेती करावी लागते. शेती करताना जमिनीचा आकार हा घटक महत्त्वाचा असतो. भारतात वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई जमिनीची उपलब्धता घटलेली आहे. त्यातही वारसा हक्काने विभाजन व तुकडीकरणाने जमिनीचे लहान लहान तुकडे होत आहेत. एक हेक्टर पेक्षा कमी जमीन असणाऱ्या सीमांत शेतकऱ्यांची संख्या भारतात ६३ टक्के आहे तर लहान शेतकरी (१ ते २ हेक्टर) असणाऱ्यांची संख्या १८ टक्के आहे. या लहान आकाराच्या तुकड्यात शेती करणे परवडणारे नसते. त्याच्या उत्पादन खर्चात झालेली वाढ व लहरी निसर्ग यामुळे त्यांनी काढलेल्या कर्जाची परतफेड होवू शकत नाही. राष्ट्रीय

नमुना पाहणी २००५ नुसार भारतात ४८.६ टक्के शेतकरी कर्जाच्या सापळ्यात अडकलेले आहेत. सर्वाधिक कर्जबाजारी कुटूंबाची संख्या आंध्र प्रदेशात (८२%) त्यानंतर तामिळनाडू (७४.५ %) आणि पंजाबसारख्या सधन व समृध्द राज्यातही कर्जबाजारी कुटुंबांची संख्या ६५.४ टक्के आहे. महाराष्ट्रात ५४.८ टक्के कुटूंबे कर्जबाजारी असून आत्महत्याचे सत्र सातत्याने सुरु असणारे राज्य आहे.

ग्रामीण भागातील कुटुंबांची कर्जे गेल्या तीन दशकात वाढत गेलेली आहे. १९९१ मध्ये २२,२११ कोटी रु. ची कर्जे होती ती २००७ पर्यंत १,११,४४८ कोटी रु. पर्यंत वाढलेली आहेत. ही वाढ पाचशे पटीपेक्षा जास्त आहे. एकूण कर्जात ६० टक्के शेतकऱ्यांची ७३ % कर्जे होती तर ४० टक्के बिगर शेतकऱ्यांची २७ टक्के कर्जे होती. यावरुन शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत गेल्याचे लक्षात येते.

शेतकऱ्यांचा कर्ज पुरवठा हा प्रामुख्याने संस्थात्मक म्हणजे सहकारी बँका, व्यापारी बँका, ग्रामिण बँका यांच्यामार्फत तर बिगर संस्थात्मक स्त्रोतामध्ये व्यावसायीक सावकार, जमीनदार यांच्यामार्फत कर्ज पुरवठा होत असतो. सावकारी कर्जाच्या तावडीतून सोडवण्यासाठी सहकारी बँका, व्यापारी बँका व ग्रामीण बँकाची स्थापना करण्यात आली. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर संस्थात्मक कर्जाचा पुरवठा वाढलेला आहे परंतु आजही बिगर संस्थात्मक घटकांचा म्हणजेच सावकारांचा प्रभाव फारसा कमी झालेला नाही. हे वेगवेगळ्या अभ्यासावरुन सिध्द झाले आहे. सीमांत व लहान शेतकरी मोठ्या प्रमाणात सावकाराच्या कर्जाच्या विळख्यात सापडलेले असून आजही ४० टक्के कर्ज पुरवठा हा सावकार व जमिनदाराकडून होत आहे. ग्रामीण कर्जपुरवठ्याच्या विविध घटकांचा हिस्सा पाहता ७० टक्के सावकार, १० टक्के सार्वजनिक बँकेमार्फत, ९ टक्के सहकारी बँका, एक टक्का सरकारी बँका, १ टक्का सूक्ष्म पतपुरवठ्यामार्फत तर ९ टक्के इतर मार्गानी होतो. (हिंदूस्थान टाईम्स २००४) यावरुन सावकारांचा कर्ज पुरवठ्यावरील प्रभाव लक्षात येतो.

आजपर्यंत शेती हा व्यवसाय नफ्याचा कधीच नव्हता व आजही नाही. शेतीचे पावसावर अवलंबित्व, परंपरागत पध्दतीने शेती लागवडीच्या पध्दती आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, शेतीचा वाढता उत्पादन खर्च व शेतमालाला उत्पादन खर्चावरुन किंमत निर्धारणाचा अभाव वाढत्या महागाईमुळे वाढत्या खताच्या, बी-बियाण्याच्या, पाण्याच्या किमती, कोरडवाहू शेती, कर्ज पुरवण्याची किचकट पध्दती यामुळे शेतकऱ्यांना शेती फायद्याची झालेली नाही. विदर्भातील कापसाच्या किमती व प.महाराष्ट्रातील ऊसाच्या किंमतीसाठी झालेले आंदोलने यावरुन त्याची तीव्रता सहज लक्षात येईल. एकूणच शेती हा व्यवसाय बेभरवशाचा व्यवसाय बनून शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत गेलेला आहे. याविषयी *इंदिरा गांधी इन्स्टीट्युट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च* या संस्थेचा हवाला देत अमेरिकन वृत्तपत्र, न्युयॉर्क टाईम्सने स्पष्ट केले आहे की ८६.५ टक्के शेतकरी कर्जबाजारी व नापिकीमुळे आत्महत्या करतात.

## भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या:

नवीन आर्थिक धोरणाच्या संरचनेच्या प्रक्रियेत म्हणजेच १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात निर्माण झालेली शेतकऱ्यांची आत्महत्या

ही भारतीय शेती क्षेत्रातील आर्थिक अरिष्टाची परिणती म्हणावी लागेल. या काळातील शेतीमधील घटती गुंतवणूक, शेती व्यवसायाला आलेले भांडवली स्वरुप, शेती क्षेत्रातील आदान आणि प्रदान यातील वाढते अंतर, शेतमालाला उत्पादन खर्चानुसार किंमत निर्धारणाचा अभाव यामुळे दुसरा चांगला व्यवसाय किंवा शेतीला पर्याय उपलब्ध झाल्यास शेती सोडून देण्याच्या मनस्थितीत शेतकरी आहेत. (N.S.S.O.२००५) यावरून शेती व्यवसाय नकारात्मक प्रवृत्तीकडे झुकलेला दिसून येतो. हीच शेती क्षेत्राची मोठी शोकांतिका म्हणावी लागेल. आत्महत्येसारख्या दुर्दैवी घटनेची सुरुवात सर्वप्रथम १९८६ मध्ये केरळमध्ये झाली. नंतर ती पंजाब, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात पसरली. शेतीत प्रगत असणाऱ्या राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र मोठ्या प्रमाणात सुरु आहे. उदा पंजाबमध्ये ८० टक्के (गिल २००४) १९८० च्या दशकात सुरु झालेले आत्महत्येचे सत्र जागतिकीकरणाच्या, खाजगीकरणाच्या, उदारीकरणाच्या रेट्यात सर्व देशभर झपाट्याने पसरले.

डिसेंबर २००७ पर्यंत १५,८०४ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. आत्महत्या केलेल्या एकूण संख्येत ८० टक्के शेतकरी कर्जबाजारी होते, त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कर्जबाजारीपणा हे प्रमुख कारण असल्याचे स्पष्ट होते. २००१ ते २००६ या काळात आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ व महाराष्ट्र या राज्यात ८९०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. कृषी मंत्री, भारत सरकारच्या सर्वेक्षणात १,३८,३२२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

एकूणच शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संख्येत तफावत असली तरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत हेच यावरुन स्पष्ट होते. कृषीतज्ज्ञ डॉ.अजय दांडेकर यांच्या मते शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी कृषीविषयक व्यवस्थाच्या मूलभूत चुकाच जबाबदार आहेत. भांडवलशाहीच्या संरचनेत भांडवलदाराच्या हिताला जोपासणारे धोरण राबवून धनदांडग्यांचेच भले करण्यात आजची केंद्र व राज्य सरकारेही गुंतलेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या वाट्याला फक्त कर्जबाजारीपणा आणि आत्महत्या करण्याची मानसिकता वाट्याला आलेली दिसते. जागतिक व्यापाऱ्याच्या स्पर्धेत शेतकऱ्यांना लाभ मिळणार असल्याचे आमिष दाखवले पण प्रत्यक्षात शेतकऱ्याच्या वाट्याला मरण आले.

## समारोप:

आत्महत्या रोखण्यासाठी कर्जमाफी, आर्थिक पॅकेज यासारख्या योजना तकलादू आहेत. त्या तात्पुरत्या स्वरुपाच्या आहेत. मलमपट्टी लावून उपयोगाचे नाही. तर ती जखम होवू नये या दृष्टीने ठोस पावले उचलण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना कर्जपुरवठा हा संस्थात्मक स्त्रोताद्वारे शिवाय सोप्या पध्दतीने मिळण्याची व्यवस्था विकसित झाली पाहिजे. औद्योगिक वस्तुंच्या उत्पादनाद्वारे शेतमालाच्या किमती उत्पादन खर्चाचा विचार करुन मार्जीन ठेवून ठरवल्या गेल्या पाहिजेत. त्यामुळे आदान व प्रदान यातील तफावत दूर होवू शकेल. कोरडवाहू शेतीचा विकास पाणी अडवा पाणी जिरवा यासारख्या उपक्रमांना प्रोत्साहन, ग्रामीण भागात परिसेवा क्षेत्राचा विकास ग्रामीण औद्योगिकरणाला चालना या उपक्रमांना गती दिली

पाहिजे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या या मानसिक दृष्टिकोनातून होत आहेत असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे गाव पातळीवर समुपदेशन केंद्राची स्थापना करुन त्यामार्फत त्याचे प्रबोधन करण्याची गरज आहे. राष्ट्रीय शेतकरी आयोगाचे अध्यक्ष डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी किंमत स्थिरीकरण निधी स्थापन करावा, जमिनीतील पाण्याचे पुनर्भरण सक्तीचे करावे, कृषी कर्जावरील व्याजदर ४ टक्क्यापर्यंत कमी करावा, विपणन व्यवस्था सुधारण्यावर भर द्यावा, किसान कॉल सेंटर्सची गरज यासारखे उपाय सुचवले आहेत. थोडक्यात शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा व आत्महत्या रोखण्यासाठी शेती व शेतकऱ्यांच्या विकासाला चालना दिल्याशिवाय शेती क्षेत्रातील हे अरिष्ट थांबणार नाही. एकंदर शेतकऱ्यांचा वाढता कर्जबाजारीपणा व आत्महत्या याचा जवळचा संबंध आहे. त्यासाठी शेतकऱ्याला योग्य दरात सुलभ पध्दतीने कर्जपुरवठा उपलब्ध झाला पाहिजे. शेती व शेतकरी हा विकासाचा केंद्रबिंदू जोपर्यंत बनत नाही तोपर्यंत शाश्वत विकास साध्य होणार नाही.

## संदर्भ:


१. *अर्थसंवाद,* ऑक्टो-डिसेंबर २००९.

२. *समाज प्रबोधन पत्रिका,* जुलै-डिसेंबर २००५.

३. *समाज प्रबोधन पत्रिका,* जुलै-डिसेंबर २००९ पृ. ३५१ ते ३६६.

४. *प्रबोधन,* प्रकाशन ज्योती, एप्रिल २००६.

५. *योजना,* ऑगस्ट-२००७, ऑक्टोबर-२००७.

६. डॉ.कळंबे दिनकर, *प्रबोधन,* प्रकाशन ज्योती २००७.

७. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण २००५.

8. *'Indian Economy',* Datt Sundaram 2010.

9. *'A Case Study of Punjab',* Gil Anita, 2004, Interlinked Aggrarian Credit Markets.

10. National Sample Survey Organization (2005)

11. Economics & Political Weekly Dec. 2007

12. *Farmer's Suiside In India,* Muzaffar Assaid, University of Mysore.

13. *'Farmer's Suiside in India'* Mudit Kapoor, Indian School of Business Hyderabad.

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या

**अलका अनिल मानकर, नांदुरा रेल्वे**
श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, जि. बुलडाणा
आजीव सदस्य क्र. १०३
भ्रमणध्वनी: ९४२०००७५२७

भारतीय शेती ही मुळातच अविकसित असून भारतातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती १०-१५ टक्के शेतकरी सोडले तर दारिद्र्याची राहिली आहे. चांगले पीक आले तरी त्यात फरक पडत नाही कारण चांगले पीक आले की शेतमालाचे भाव पडतात. शेती अजूनही पारंपरिक पध्दतीनेच केली जाते. शेताच्या धारणक्षेत्रांचा आकार लहान आहे व शेते विखुरलेली आहेत. पाऊस निश्चित पण शेती पावसावर अवलंबून आहे. पिकांवर पडणारे रोग, कमीजास्त पाऊसमान, प्रतिकूल हवामान यामुळे शेतीत अनेक अडथळे येतात.

जमिनीचे वेगवेगळे भौगोलिक स्थान व सुपीकतेमधील फरक यामुळे जमिनीचे मूल्य ठरविणे हा एक गुंतागुंतीचा भाग बनतो. विहीर खोदणे किंवा मोठा खर्च करणे हे फायदेशीर ठरेलच याची खात्री नसते व त्यामुळे जमिनीचा कर्ज देण्यासाठी हमी किंवा जामीन म्हणून उपयोग करण्यात अडचणी येतात. या गरीब लोकांकडे स्वत:च्या फारशा बचती नसतात त्यामुळे एक जमिनीचा तुकडा सोडला तर कर्जाला हमी म्हणून त्यांच्या जवळ तारण नसते. तारणाअभावी शेतकऱ्याला फारसे कर्ज मिळत नाही. कर्ज नसल्यामुळे शेती अविकसित राहते. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती व राहणीमानाचा दर्जा दिवसेंदिवस घसरत आहे. शेतीचे उत्पन्न अतिशय अल्प त्यामुळे कर्जबाजारीपणा सातत्याने वाढत आहे.

गोरवाला कमिटीने भारतीय शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणा बद्दल म्हटलेच आहे की, *भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जातच जगतो आणि कर्जातच मरतो.* ('Indian Farmer is born in debt, he live in debt and dies in debt'!) ते काही खोटे नाही. वर्तमान स्थितीत होणाऱ्या आत्महत्या पाहता या विधानाला अधिकच बळकटी येते.

१९९७ ते २०११ या कालावधीतील वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके व नियतकालिकांमधील साहित्याचा आढावा घेतल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे पुढील प्रमाणे दिसून येतात.

१. कर्जबाजारीपणा:

कर्जबाजारीपणा हे शेतकऱ्याच्या आत्महत्येमागचे प्रमुख कारण यामध्ये दिसून येते यामध्ये कर्ज परत न केल्यामुळे बँकेने केलेल्या जप्तीच्या भितीमुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. अलीकडे सहकारी पतसंस्थांचे जाळे सर्वत्र विखुरलेले असले तरी सावकारांचे वर्चस्व कमी झालेले नाही. सावकाराच्या पाशातून मुक्ती मिळविण्यासाठी कित्येक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.

२. नैसर्गिक आपत्ती:

पूर, अवर्षण, भूकंप, दुष्काळ, पिकांवरील रोगराई यामुळे उत्पन्न नष्ट झाले त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.

३. दारिद्र्य :

शेतकरी मुळातच दारिद्र्याच्या दुष्टचक्रात जीवन जगतो. गरीब असल्यामुळे त्याच्या जीवनावर राजकीय, आर्थिक धोरणाचा मोठा परिणाम घडून येतो. २००४ या वर्षात संख्यात्मक विशेषणावरुन गरिबीमुळे एकूण ४०४ स्त्री-पुरुषांनी आत्महत्या केल्या.

४. सरकारी धोरण:

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने स्वीकारलेले शेतीविषयक धोरण, आजपर्यंत राबविलेली नीती, योजना यांच्या परिणामातून शेतीची बिकट अवस्था झाली. १९९१ नंतर निर्याताभिमुख, मुक्त अर्थव्यवस्थेचे तत्त्व समोर ठेवून सार्वजनिक क्षेत्रातील सरकारी गुंतवणूक कमी करीत, शेतीला पूरक धोरण न ठेवता खाजगीकरणाचे तत्त्व पुढे रेटत राहिल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या.

५. सदोष कर्ज योजना आणि आत्महत्या:

पीक कर्ज योजना व पीक विमा योजना यामधील दोषांमुळे अनेक शेतकरी आत्महत्या करण्यास बळी पडतात.

शेतकऱ्यांना पीक कर्ज ग्रामीण स्तरावरील सेवा सहकारी संस्था मार्फत देण्यात येते या संस्थांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून पैसे मिळतात. सहकारी बँकेला नाबार्ड या शिखर संस्थेकडून पुनर्अर्थसहाय्य योजनेतून पैसा मिळतो. नाबार्डचा व्याजदर अल्प असला तरी जिल्हा मध्यवर्ती बँक, सेवा सहकारी संस्था यांच्याकडून आकारणी होत असल्याने प्रत्यक्ष शेतकऱ्यांना हा व्याजदर १३ ते १४ टक्के होतो. व्याजदर अधिक, कर्ज जेवढे मागतो तेवढे मिळत नाही. प्रत्यक्ष कर्जपुरवठा वेळेवर होत नाही. पीक कर्ज योजनेप्रमाणे पीक विमा योजनेतही अनेक उणिवा आहेत. पीक बुडाले, नष्ट झाले तरी शेतकऱ्याला दिलासा मिळत नाही.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागे वरील कारणांबरोबरच प्रामुख्याने पुढील कारणांचा देखील समावेश होतो. त्यामध्ये प्रामुख्याने मातीपरीक्षण न करता पिके घेणे, रासायनिक खतांचा अनावश्यक वापर करणे, यामुळे वेळेवर पाऊस येऊनही उत्पन्नात वाढ झालेली दिसून येत नाही. खर्च मात्र भरपूर झालेला असतो. तसेच सध्या बियाण्यांचे असंख्य प्रकार बाजारात असल्यामुळे व त्यांच्या भडक जाहिरातीमुळे बियाणे वापराबाबत शेतकऱ्यांची दिशाभूल होते व शेवटी त्याची फसवणूक होते. याशिवाय सिंचनाची सोय उपलब्ध करुन घेतांना विहिरीला किंवा

कूपनलिकेला पाणी लागेल की नाही ही शंका शेतकऱ्याच्या मनात आल्यामुळे तो विहीर किंवा कुपनलिका करवून घेण्यास धजावत नाही. एखादया शेतकऱ्याने तसे धाडस केले आणि विहिरीला पाणी न लागल्यास जवळचे भांडवल खर्च होते. घेतलेले कर्ज संपते, पुन्हा कर्जाची गरज असते परंतु जुन्या कर्जाची परतफेड न करु शकल्यामुळे कर्ज मिळणे कठीण अशा दुष्ट चक्रात शेतकरी सापडतो शेवटी त्याच्यासमोर उरतो एक मार्ग तो म्हणजे आत्महत्या.

आज शेती करणे म्हणजे कर्जबाजारी होणे असे समीकरण झाले आहे. एकीकडे शेती उत्पादन खर्च भरमसाट वाढत असतांना शेतीतील गुंतवणुकीवरील परतावा अल्प राहिल्यामुळे भारतातील शेतकऱ्यांकरीता शेतीचा व्यवसाय तोट्याचा ठरला आहे. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झालेला दिसून येतो व त्यामधूनच तो आत्महत्येकडे वळतो असा निष्कर्ष दांडेकर यांनी काढला आहे.

थोडक्यात पावसाचा अनिश्चितपणा, त्यामुळे दुष्काळ, दुष्काळामुळे झालेले पिकांचे नुकसान, त्यातून दुबार व तिबार पेरणी करण्यासाठी झालेला अनावश्यक खर्च, शेतीच्या आदानाच्या भरमसाठ किंमती, बोगस बी-बियाण्यांचा सुळसुळाट, कापसाचा वाढता उत्पादन खर्च, परदेशी कापसाच्या आयातीमुळे कापसाचे कोसळलेले भाव, कोरडवाहू शेती, सिंचनाचा अभाव, पिकांची अल्प उत्पादकता, बँका व पतसंस्थांकडून केला जाणारा अपुरा पतपुरवठा, शेतीपुरक व्यवसायाचा अभाव इ.

राष्ट्रीय नमुना पाहणीने नुकत्याच केलेल्या ५९ व्या सर्वेक्षणात ३६ लाख कर्जबाजारी शेतकरी असलेला महाराष्ट्र देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे. देशातील ४० टक्के शेतकऱ्यांच्या आत्महत्या कर्जबाजारीपणामुळे होतात. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या विदर्भातील आहेत.

ऋणग्रस्तता ही भारतीय कृषी व्यवसायातील अत्यंत बिकट समस्या ठरली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ग्रामीण ऋणग्रस्ततेचे व तिच्या परिणामाचे अंदाज वेळोवेळी करण्यात आले.

शासन पुरस्कृत भांडवलदारी विकासाची धोरणे आणि गेल्या दोन दशकापासून केलेली उदारीकरणाच्या धोरणाची अंमलबजावणी यांचा परिणाम म्हणजे भारतीय कृषी व्यवस्था एका अभूतपूर्व अरिष्टांच्या कचाट्यात सापडली आहे. जी अनेक अरिष्टे आहेत त्यामधील सर्वात मोठे अरिष्ट म्हणजे शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा व शेतकऱ्यांच्या आत्महत्या.

थोडक्यात भारतीय अर्थव्यवस्थेचा आर्थिक विकास जर साधावयाचा असेल तर कृषी विकासाच्या मार्गातील अडथळा म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखणे काळाची गरज आहे. त्याकरीता शासनस्तरावर खालील प्रयत्न केले जाणे आवश्यक आहे.

१. मातीपरीक्षण व भूजल सर्वेक्षणाकरीता मोफत शिबिरे आयोजित करावीत.
२. पीक विम्याच्या कक्षेत सर्वच पिकांचा समावेश करावा.
३. प्रत्येक शेतमालाला हमीभाव निश्चित करावा.
४. भविष्यातील नजीकच्या काळातील शेतीमालाच्या संभाव्य दराची पूर्वकल्पना

शेतकऱ्याला देण्यासाठी शासनाने स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करावी.

५. विपणीतील दलालांची संख्या कमी करावी जेणेकरुन शेतकऱ्याला आपला माल सरळ व्यापाऱ्याला विकता येईल.

६. त्या त्या भागातील शेती मालावर आधारित उद्योग त्याच भागात सुरु करावेत.

७. कर्ज वाटप करतांना त्याचा शेतीच्या शासकीय किंमतीच्या आधारावर त्याला आवश्यक असेल तेवढा कर्जपुरवठा केला गेला तर शेतीची योग्य मशागत होवून त्याचे वार्षिक उत्पन्न वाढेल व बँकेला कर्जवसुली चांगली होईल. सक्तीची वसुली करण्यासाठी होत असलेला बँकेचा खर्च वाचेल आणि शेतकऱ्यांनाही मानाने व सन्मानाने जीवन जगता येईल त्यांच्यावर येणाऱ्या संकटामुळे त्यास आत्महत्या करण्याची गरज भासणार नाही.

संदर्भ:

१. *शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंतन आणि उपाय,* नरेंद्र लांजेवार

२. *अर्थसंवाद*

३. *जागतिकीकरण नवीन गुलामगिरी,* ॲडमिरल विष्णू भागवत

४. *भारतीय अर्थव्यवस्था,* डॉ. देसाई, डॉ. सौ. भालेराव

५. *अर्थशास्त्र विश्वकोश*

६. *योजना मासिक*

७. *भारतीय ग्रामीण बँक व्यवसाय,* मुतालिक, देसाई, संतोष रा. दास्ताने.

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या - एक अभ्यास

राजू कथ्थू शिंदे, देवपूर
अर्थशास्त्र विभाग
कला, वाणिज्य, गृहविज्ञान व
बी.सी.ए. महिला महाविद्यालय
आजीव सदस्य क्र. १३२
भ्रमणध्वनी: ९९२१२२११७४

प्रस्तावना:

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीक्षेत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे. सन २००७-०८ मध्ये जीडीपीमधील कृषीक्षेत्राचा हिस्सा १७.५ टक्के झाल्याचे दिसून येत असला तरी अजूनही जवळपास ५९ टक्के ग्रामीण भागातील गरीब, मागास-आदिवासी जनतेची रोजीरोटी या व्यवसायाशीच जोडलेली आहे. देशात नव्वदच्या दशकापर्यंत या व्यवसायाचे स्थान सर्वोच्च असल्याचे आकडेवारीवरुन दिसून येते. त्यानंतर मात्र नवीन आर्थिक उदारीकरणाच्या धोरणातून देशाच्या एकूण उत्पन्नातील कृषीचा हिस्सा सतत कमी होत गेला. जागतिकीकरणाच्या लाटेवर स्वार होऊन भारताने कृषी व्यवसायाकडे दुर्लक्ष केले. गुंतवणुकीचे कमी झालेले प्रमाण व जागतिक व्यापार संघटनेशी केलेल्या करारातून शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सबसिडीत केलेल्या कपातीचा परिणाम असा झाला की, शेतकऱ्यांचा शेतीवरील खर्च वाढला परंतु नैसर्गिक अनियमितता, त्यातून झालेली नापिकी, नवीन तंत्रज्ञान वापराबद्दल शेतकऱ्यांचे अज्ञान यातून वाढलेला कर्जबाजारीपणा शेतकऱ्यांच्या जीवनाला असुरक्षिततेकडे ढकलू लागला व त्यातून शेतकरी आत्महत्येकडे वळला. सन १९९८ ते २००० या काळात वृत्तपत्र व इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांनी यासंदर्भात दखल घ्यायला सुरुवात केली आणि २००४ पर्यंत ही एक जागतिक बातमी बनली.

सन २००१ पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना प्रसारमाध्यमांनी मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय स्तरावर प्रसिध्दी द्यायला सुरुवात केली. असे

असले तरी 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या' अहवालांचा आढावा घेतला असता सन १९९७ पासून आत्महत्या करणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. त्यामध्ये सर्वाधिक आत्महत्या ह्या शेतकऱ्यांच्या असल्याचे निष्पन्न होते. त्यामध्ये प्रतिवर्षी वाढ होत गेल्याचे स्पष्ट होते. सन १९९७ ते सन २००७ पर्यंत १,८२,९३६ शेतकऱ्यांनी आत्महत्या करुन जीवनयात्रा संपविली होती. आत्महत्यांच्या संख्येत कशा पध्दतीने वाढ झाली हे अभ्यासण्यासाठी या दशकाला दोन टप्प्यात विभाजित केल्यास असे दिसून येते की, १९९७ ते २००१ या काळात राष्ट्रीय पातळीवरील आत्महत्यांची सरासरी १५,७४७ होती. तर नंतरच्या २००२ ते २००७ या काळात त्यामध्ये वाढ होऊन ही सरासरी १७,३६६ वर जाऊन पोहोचली. या आत्महत्यांची प्रतिदिवस सरासरी काढावयाचे झाल्यास जवळपास ४६ होते. म्हणजेच दर अर्ध्या तासाला देशात शेतकरी आत्महत्या करतो आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रभाव ज्या राज्यांवर सर्वाधिक प्रमाणात दिसून येतो त्यामध्ये महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि छत्तीसगडचा समावेश आहे. या राज्यांमध्ये एकूण आत्महत्यांच्या दोन तृतियांश आत्महत्या झाल्याचे स्पष्ट होते. या राज्यांमध्ये महाराष्ट्रात हे प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेत अधिक असल्याचे दिसून येते.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरोच्या अहवालानुसार महाराष्ट्रात ४०,००० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. २००६ मध्ये भारतात एकूण १७,०६० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यामध्ये महाराष्ट्रात ४,४५० आत्महत्या नोंदविल्या गेल्या. कोणत्याही राज्यात शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्येचा हा उच्चांक म्हणून नोंदविला गेला. सन २००५ च्या आकडेवारीपेक्षा एकूण राज्याच्या आत्महत्येत ५.२७ ने वाढ झाल्याचे दिसून येते. याअगोदर २००४ मध्ये महाराष्ट्रातच ४,१४७ संख्या होती. यावरुन महाराष्ट्रातील आत्महत्येत सतत वाढ होत असल्याचे दिसून येते. याचवर्षी जी राज्ये आत्महत्येमध्ये आघाडीवर होती त्यांच्यापेक्षा कितीतरी पटीने महाराष्ट्र आघाडीवर असल्याचे दिसून येते.

सन २००६ मध्ये आंध्रप्रदेशात २,६०७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. तर मध्य प्रदेश २,८५८, कर्नाटक मध्ये १,७२० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. ह्या राज्यातील आत्महत्यांचे प्रमाण देशातील एकूण आत्महत्यांच्या दोन तृतीयांश होते व यामध्ये महाराष्ट्रातील आत्महत्यांचा वाटा ३८ टक्के होता.

महाराष्ट्रातील विदर्भात सर्वाधिक आत्महत्या होत असून सन २००६ मध्ये १,४४८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशननुसार सन २००७ मध्ये १२४६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली तर सन २००८ व २००९ मध्ये अनुक्रमे ३०५ व २०१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली होती.

शासकीय पॅकेजनंतर विदर्भातील आत्महत्येमध्ये कमी आल्याचे आकडेवारीवरुन दिसून येते. असे असले तरी विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात जिथे सर्वाधिक आत्महत्या नोंदविल्या गेल्या त्याठिकाणी मात्र शेतकऱ्यांनी पॅकेज नाकारल्याचे दिसून येते.

## निष्कर्ष:

हरित क्रांतीच्या काळात कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल झाले. त्यातून दृष्य परिणाम सुध्दा पुढे आले. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी अन्न-धान्याच्या बाबतीत परावलंबी होता. हरितक्रांती यशस्वी होऊन अल्पावधीतच अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. त्यामुळेच सन १९७२ मध्ये तीव्र दुष्काळ पडल्यानंतरही सन १९७४ मध्ये तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदीरा गांधी यांनी एका रात्रीतून निर्णय घेऊन रासायनिक खतांच्या किमती दुप्पट करण्याची घोषणा करुन रु.५० प्रती पोते असलेला युरिया रु.१०० प्रती पोते केला होता. किटकनाशकाचे भाव तिप्पट वाढविण्यात आले होते. पण तरीही त्या काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रकार नव्हता. रासायनिक खते, कीटकनाशके यांच्या किमती वाढविल्यानंतरही कृषी क्षेत्रावर त्याचा परिणाम जाणवला नाही. त्यामुळेच जवळपास १९९०-९१ पर्यंत कृषीचा वृध्दीदर कायम राहिला. सन १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्यातूनच जागतिक व्यापार संघटनेशी सन १९९५ मध्ये करार केला गेला. त्यातून कृषीक्षेत्रात अनेक परिवर्तन घडून आले. बियाण्यांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली तर रासायनीक खते, कीटकनाशके यांच्या किमती सुध्दा वधारल्या. याप्रमाणात शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकले नाही. सबसीडीत कपात केली गेली. एकीकडे शेतीक्षेत्रात दिल्या जाणाऱ्या सुविधांवर गंडातर आणले व दुसरीकडे निसर्गाच्याच भरवश्यावर पिकविल्या जाणाऱ्या शेतीत निसर्गाच्या अनियमितपणामुळे संकट कोसळले. त्यामुळे शेतीवर लागणारा खर्च अधिक व उत्पन्न कमी अशी परिस्थिती उद्भवली. यातून शेतकरी कर्जबाजारी झाला. त्यामुळे अगोदर निम्न दर्जाचे असलेले जीवनमान अधिकच खालावले.

जागतिकीकरणातून निर्माण झालेली 'जागतिक व्यापार संघटना' जगातील सर्वात शक्तीशाली 'आर्थिक संघटना' म्हणून विकसीत झाली. सुरुवातीला यामधील उद्देश चांगले वाटत असले तरी मात्र भारतात ज्या पध्दतीने कृषी क्षेत्राची दुर्दशा होत आहे, त्यातून येणारे संकट किती भयावह असेल याची कल्पना येते. प्राथमिक उद्देश जरी व्यापाराचे उदारीकरण करणे हे असले तरी मात्र या माध्यमातून आयात निर्यात शुल्क समाप्त करुन विकसनशील देशातील बाजारपेठा ताब्यात घेणे, विदेशी गुंतवणुकीच्या मार्गातील अडथळयांना दूर करुन तेथील बाजारपेठेमध्ये आपल्या मालाला जागा उपलब्ध करुन देणे हाच आहे. ज्यामध्ये स्थानिक कृषी क्षेत्र कोलमडून शेतकरी आत्महत्येच्या दारात जावून पोहोचला.

## संदर्भ:


१) *जागतिकीकरण: समस्या, आशय आणि अनुभव,* खेर सी.पं., २००२, दिलीपराज प्रकाशन, पुणे, पृ.२२.

२) *Farmers Suicide in India,* Shiva, Vandana and Kunwar, Jalees, 2006

३) *Farmers Suicide Still distressingly high,* Sainath P. 2008.

# भारतातील सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम

**पी. आर. कुलकर्णी, अंबाजोगाई**
वाणिज्य विभाग प्रमुख
खोलेश्वर महाविद्यालय, जि.बीड
आजीव सदस्य क्र. ११४५
भ्रमणध्वनी:९९२३७७५७६४

प्रस्तावना:

भारतातील सूक्ष्म लघु व मध्यम उपक्रम क्षेत्र (Micro, Small and Medium Enterprises Sector) देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासात मोठे योगदान देणारे क्षेत्र आहे. भारतासारख्या वाढत्या लोकसंख्येच्या देशात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणाऱ्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महत्त्वाचे स्थान देण्यात आले. रोजगार निर्मितीच्या दृष्टीने शेती नंतर दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या या क्षेत्राचा विकास करण्यासाठी शासन जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहे. पंचवार्षिक योजना आणि औद्योगिक धोरण या दोन्ही पातळ्यांवर या क्षेत्राला सतत प्रोत्साहन देण्यात आले. या क्षेत्राचे नियमन व विकास प्रभावीपणे करता यावा म्हणून संरचनात्मक व प्रशासकीय अशा प्रकारच्या उपाययोजना करण्यात आल्या. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाच्या व्याख्यांमध्ये काळानुरूप योग्य ते बदल करण्यात आले आहेत. या सर्वांचा परिणाम म्हणून हे क्षेत्र आज भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा बनले आहे.

सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास अधिनियम-२००६ (Micro, Small and Medium Enterprises Developement Act-2006):

या क्षेत्रात लघु उद्योग (Small Scale Industries), ग्रामीण कुटिरोद्योग (Cottage and Village Industries), ताग खादी व सिल्क आदि पारंपरीक उद्योग (Traditional Industries Like Coir, Khadi and Silk), लघु सेवा व व्यापार उद्योग (Small Scale Service and Business Enterprises), उत्पादन आणि सेवा उद्योग (Manufacturing and Service Industries),

कृषी व बिगर कृषि उद्योग (Agro and Non Agro Industries), पूरक उद्योग (Ancillary Industries), अति सूक्ष्म उद्योग (Tiny Industries) अशा विविध उद्योगांचा अंतर्भाव होतो. या सर्व उद्योगांचा सुनियोजित व एकात्म विकास करण्याच्या उद्देशाने सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास अधिनियम-२००६ मंजूर करण्यात आला व तो २ ऑक्टोबर २००६ पासून अंमलात आला. वरील सर्व प्रकारचे उद्योग घटक या अधिनियमाच्या कक्षेत आणण्यात आले असून उद्योगांना ''उपक्रम'' ही संज्ञा देण्यात आली आहे. या सर्व उद्योगाची नोंदणी जिल्हा व तालुका पातळीवरील उद्योग केन्द्रात करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या क्षेत्रातील उद्योगाच्या व्याख्यांची पुनर्रचना करण्यात आली असून त्यासाठी या उपक्रमांची विभागणी 'उत्पादन करणारे उपक्रम' व 'सेवा देणारे उपक्रम' अशा दोन वर्गात करण्यात आली आहे. या दोन्ही वर्गात सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या व्याख्या गुंतवणूक मर्यादेच्या निकषांवर करण्यात आल्या असून त्या खालील प्रमाणे आहेत:

उत्पादन उपक्रम:

अ) ज्या उपक्रमात संयंत्रातील गुंतवणूक ५ लाखांपेक्षा जास्त नाही त्या उपक्रमास सुक्ष्म उपक्रम (Micro Enterprises) म्हटले जाईल.

ब) ज्या उपक्रमात संयंत्रातील गुंतवणूक रु.२५ लाखापेक्षा जास्त परंतु रु.५ कोटी पेक्षा कमी आहे. त्यास लघु उपक्रम (Small Enterprises) म्हटले जाईल.

क) ज्या उपक्रमात संयंत्रातील गुंतवणूक रु.५ कोटी पेक्षा जास्त परंतु रु.१० कोटी पेक्षा कमी आहे त्यास मध्यम उपक्रम (Medium Enterprises) म्हटले जाईल.

सेवा उपक्रम:

अ) ज्या उपक्रमात उपकरणांमधील गुंतवणूक रु.१० लाखापेक्षा जास्त नाही.त्या उपक्रमास सूक्ष्म उपक्रम (Micro Enterprises) म्हटले जाईल.

ब) ज्या उपक्रमात उपकरणामधील गुंतवणूक रु. १० लाखापेक्षा जास्त रु. २ कोटी पेक्षा कमी आहे. त्या उपक्रमास मध्यम उपक्रम (Small Enterprises) म्हटले जाईल.

क) ज्या उपक्रमात उपकरणांमधील गुंतवणूक रु. २ कोटी पेक्षा जास्त परंतु रु.५ कोटी पेक्षा कमी आहे. त्या उपक्रमास मध्यम उपक्रम (Medium Enterprises) म्हटले जाईल.

नवीन व्याख्या या अधिनियमाबरोबरच अमलात आल्या. या अधिनियमाच्या अंमलबजावणी बरोबरच केंद्र शासनातील कृषि आणि ग्रामीण उद्योग मंत्रालय व उद्योग मंत्रालयाच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाच्या उपविभागांचे विलीनीकरण करून नवीन सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालय अस्तित्त्वात आले आहे.

### चौथी अखिल भारतीय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम गणना - २००६-०७ (Fourth All India Census of MSMEs - 2006-07):

लघु उद्योगक्षेत्राचा सुनियोजितपणे विकास करण्यासाठी या क्षेत्रातील उद्योग घटकाची परिपूर्ण माहिती संग्रहित करुन माहितीचा साठा तयार करणे आवश्यक असते. या दृष्टीकोनातून देशभरातल्या लघुउद्योगाची वारंवार गणना करण्यात आली. पहिली गणना १९७३-७४ मध्ये करण्यात आली. ज्यात ३० नोव्हेंबर १९७३ पर्यंतच्या नोंदणीकृत उद्योगांचा समावेश आहे. दुसरी गणना १९९०-९१ मध्ये करण्यात आली ज्यात ३१ मार्च १९८८ पर्यंतच्या नोंदणीकृत उद्योगाचा समावेश आहे. तिसरी गणना २००१-०२ मध्ये करण्यात आली ज्यात ३१ मार्च २००१ पर्यंतच्या नोंदणीकृत व अनोंदणीकृत उद्योगाच्या अंतर्भाव करण्यात आला. चौथी गणना या उद्योग क्षेत्राच्या अधिनियमानुसार २००६-०७ मध्ये करण्यात आली यात ३१ मार्च २००७ पर्यंत देशातल्या सर्व राज्ये व केंद्रशासीत प्रदेशातील सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा उद्योग केंद्रात नोंदणीकृत उद्योगाचा समावेश आहे. या गणनेचा अंतिम अहवाल एप्रिल २०११ मध्ये सादर करण्यात आला.

**चौथ्या गणनेनुसार सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची देशातील सद्यस्थिती** (Present Scenario of MSMEs, In India as per Fourth Census):

चौथ्या गणनेमध्ये नवीन अधिनियमांतर्गत या क्षेत्रातील उपक्रमांची एकूण संख्या २२.४८ लाख इतकी असून त्यापैकी ४.९६ लाख उपक्रम कायमचे बंद झाले आहेत तर १.८८ लाख उपक्रम दिलेल्या पत्त्यावर नव्हते. त्यामुळे निव्वळ १५.६४ लाख उपक्रमांचाच सविस्तर पाहणीत समावेश झाला आहे. एकूण १५.६४ लाख उपक्रमांपैकी ९४.९४% उपक्रम सूक्ष्म, ४.८९% लघु तर केवळ ०.१७% उपक्रम मध्यम या वर्गवारीत येतात. एकूण उपक्रमांपैकी ६७% उत्पादन करणारे, १६% दुरूस्ती व देखभाल करणारे व १४% सेवा देणारे उपक्रम आहेत. ग्रामीण भागात असणाऱ्या उपक्रमांचे प्रमाण ४५% आहे. आंतरराज्य तुलना करता सर्वात जास्त उपक्रम असणारी राज्ये तामिळनाडू (१४.९५%), मध्यप्रदेश (१४.७०%), उत्तर प्रदेश (१२%), केरळ (९.६०%), कर्नाटक (८.७१%), मध्यप्रदेश (६.८४%) व महाराष्ट्र (५.५४%) ही आहेत. प्रति उपक्रम रोजगाराचा दर ५.९५ व्यक्ती इतका आहे. ६७% उपक्रम इंधन म्हणून विजेचा वापर करतात तर २४% उपक्रम कोणतेही इंधन वापरत नाहीत. १३.७२% उपक्रम स्त्रियांनी चालविलेले आहेत. ४८.७४% उपक्रमांची मालकी सामाजिकदृष्ट्या मागासवर्गाकडे (एस्.सी., एस्.टी., ओ.बी.सी.) आहे. एकूण उपक्रमांच्या १४.२६% उपक्रम खाद्य पदार्थ व पेये यांचे, १३.६७% उपक्रम तयार कपड्यांचे, फॅब्रीकेशनचे ८.९६%, घरगुती उपकरणांची दुरुस्ती व देखभाल करणारे ८.४६%, कापड - ६.७८%, फर्निचर- ६.३६%, यंत्र व उपकरणे - ४.६६% इत्यादी प्रकारचे उपक्रम आहेत. एकुण उपक्रमांपैकी ४६६७५ उपक्रम निर्यात वस्तू संबंधित आहेत. तिसऱ्या गणनेच्या तुलनेत चौथ्या गणनेत काही महत्त्वाची मुद्दे पुढे आले आहेत. चालू उपक्रमांची संख्या ९% वाढली असून बंद होणाऱ्या उपक्रमांची संख्या १४% ने घटली आहे. उत्पादन करणाऱ्या उपक्रमांची संख्या ४% वाढली आहे. प्रतिघटक रोजगार ४.४८ व्यक्तींवरून ५.९५ व्यक्तींवर तर गुंतवणूक प्रतिघटक रू.६.६८ लाखांवरून रू.२८.७२ लाखांवर गेली आहे. तिसऱ्या

गणनेच्या तुलनेत चौथ्या गणनेत उपक्रमांच्या आजारपणाचे प्रमाण १३.९०% वरून ६.४९% पर्यंत खाली आहे, ही दिलासा देणारी बाब आहे.

आव्हाने:

देशाच्या अर्थव्यवस्थेत व औद्योगिक विकासात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या या उपक्रमाची वाटचाल समाधानकारक असली तरी या उपक्रमांचा पुरेपूर फायदा देणारी नाही हे लक्षात येते.

अल्प भांडवल, मोठी रोजगार निर्मिती, लोकसंख्येच्या स्थलांतरावर नियंत्रण, संतुलित विकास व देशाच्या कानाकोपऱ्यात असलेल्या मनुष्यबळाचा वापर ही या उपक्रमांची बलस्थाने आहेत. मात्र या बलस्थानांचा वापर करून घेणे शासनासमोरचे मोठे आव्हान आहे. अपुरा वित्त पुरवठा, वाहतुक व दळणवळणाच्या सोयींची अपूर्णता, कुशल मनुष्य बळ पुरविणाऱ्या तंत्र शिक्षणाच्या अपुऱ्या सोयी आणि जागतिक बाजारपेठेत स्थान प्राप्त करण्यासाठी आवश्यक दर्जा व पायाभुत सुविधा ही काही महत्त्वाची आव्हाने आहेत, तथापि जागतिकीकरणाच्या युगात तांत्रिक नवप्रवर्तन (Technological Innovation) आणि मानवाचे जीवन समृध्द करणाऱ्या नवनवीन वस्तू व सेवांची निर्मिती करण्याची सर्जनशीलता (Creativity) असणारे उपक्रमच स्पर्धेत टिकू शकतील हे स्पष्ट आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाच्या क्षेत्रापुढे २१ व्या शतकाने हे मोठे आव्हान उभे केले आहे. हे आव्हान पेलण्याची क्षमता भारतीय उपक्रमांमध्ये आहे अशी अपेक्षा निर्माण व्हावी अशी या उपक्रमांची वाटचाल आहे.

संदर्भ:

१) *अंतिम अहवाल,* चौथी अखिल भारतीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम गणना, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम मंत्रालय, भारत सरकार, एप्रिल २०११.

२) *वार्षिक अहवाल,* २०१०-११ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम मंत्रालय, भारत सरकार.

३) उल्हास म. माळकर, *सांगली जिल्ह्यातील लघु उद्योगांच्या अपयशाच्या कारणांचा अभ्यास,* अर्थसंवाद, ऑक्टो.-डिसेंबर २०१०.

४) माने एस. बी., *भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांची प्रगती,* योजना मासिक, नोव्हेंबर. २००९.

# आव्हान - वित्तीय तूट नियंत्रणाचे

**नारायण चिंतामण पाटील**, लासूर
ता.चोपडा (जळगाव)
आजीव सभासद क्र.१३६३
भ्रमणध्वनी: ८८९८९२८३११

स्वातंत्र्यपूर्व काळात अविकसीत, मागासलेल्या, परंपरागत अर्थव्यवस्थांमध्ये भारताचे नाव होते. १९५०-५१ ते १९८५-८६ या साडेतीन दशकात ३ ते ४ टक्केपर्यंत रेंगाळणारा आपला आर्थिक विकास दर १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणानंतर सकारात्मकपणे वाढत गेला. १९९१-९२ ते २००१-०२ या दशकभरात देशातील विविध क्षेत्रातील कृषी, माहिती तंत्रज्ञान, पायाभुत सुविधा, सिंचन, आरोग्य याबरोबरच संरक्षणासारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे आर्थिक विकासदरात सहा टक्के पर्यंत वाढ झाली. त्यानंतरच्या कालखंडात उपरोक्त क्षेत्रातील सिंचन, कृषी, तंत्रज्ञान यामध्ये सकारात्मक वाढ होत गेली व विकास दर ८.५ ते ९% पर्यंत जाऊन पोहोचला. अशातच जागतिक मंदीचे वारे वाहू लागले.

परिणामी प्रगत समजली जाणारी अमेरिका, जपान, युरोपीय अर्थव्यवस्था कोलमडल्या. त्यांचा विकास दर (-) ३ ते ४% पर्यंत खाली आला असे असताना भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकास दरात मात्र फारशी घट झाली नाही. परंतु २००८-०९ यावर्षात वाढती महागाई, रोजगारातील घट यामुळे व व्याजदरात वारंवार केली जाणारी कपात अशा संदिग्ध व नकारात्मक उपायांमुळे गुंतवणूक व उत्पादनांवर विपरित परिणाम होऊन विकासदर पुन्हा ६.९% इतका घसरला. २००८-२००९ नंतर जागतिक अर्थव्यवस्था सावरत असताना युरोपात अभूतपूर्व असा 'युरोझोन क्रायसिस' च्या पेचप्रसंगाला सामोरे जावे लागत आहे. त्याचाच परिणाम भारत, चीन यांसारख्या मजबुत अंतर्गत बाजारपेठ असलेल्या देशांच्या मंदावलेल्या विकास दरावर होत आहे.

उद्‌भवलेल्या आर्थिक पेचप्रसंगांना तोंड देण्यासाठी प्रगत देशांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक पॅकेजेस आणले. अशा स्थितीत आपल्या देशात सुध्दा मोठ्या प्रमाणावर करसवलती देऊन सरकारी गुंतवणुकीत वाढ करुन व अनुदाने, विविध आर्थिक प्रलोभने देऊन सरकारी खर्च वाढवण्यात आला. त्याचा परिणाम म्हणून

आपल्या देशाला जागतिक आर्थिक मंदीच्या झळीतून वाचवले. देश आर्थिक संकटातून सावरण्यास मदत झाली. परंतु उपरोक्त सरकारी आर्थिक उपाययोजनांमुळे एक दुष्परिणामही दिसून आला. पूर्वी करण्यात आलेल्या (एफ.आर. बी.एम.) ॲक्टच्या माध्यमातून केंद्र सरकारची वित्तीय तूट नियंत्रित करण्यात जागतिक मंदीपूर्वी जे यश आपल्याला आले होते ते गमवावे लागले. म्हणजेच एके वेळी केंद्र सरकारची अंदाजपत्रकीय तूट राष्ट्रीय उत्पन्नाच्या ८% एवढी प्रचंड होती. ती कमी करुन २००७-०८ या वर्षात २.६% एवढे खाली आणून उत्तमप्रकारे आर्थिक शिस्त आपण आणली होती. ती जागतिक मंदीनंतरच्या उपाय योजना (अनुदाने, प्रलोभने, करसवलती) यांच्या मुळे वित्तीय तूट पुन्हा अनियंत्रीत झाली म्हणजे मोठ्या प्रमाणावर वाढली.

## आव्हान-वित्तीय तुट नियंत्रणाचे:

देशाचा अर्थसंकल्प आगामी आर्थिक वर्षातील एकूण गुंतवणुकीची आर्थिक विकासदराची, रोजगार पातळीची, उत्पादन व महागाईची स्थिती आदींचा निश्चित अंदाज दर्शवित असतो. त्याचबरोबर देशात उपलब्ध परकिय चलन तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट व एकूण वित्तीय तूट या बाबी देखील अर्थसंकल्पात लक्षवेधी असतात.

थोडक्यात अर्थसंकल्प म्हणजे आर्थिक वर्षात केंद्र सरकारला विविध मार्गांनी किती उत्पन्न मिळेल व विविध प्रकारे किती खर्च करावा लागेल याचे विवरणपत्र होय. म्हणजेच केंद्र सरकारला उत्पादक खर्चाबरोबरच अनुत्पादक खर्च अनुदाने, प्रलोभने, कल्याणकारी योजना, अचानक उद्‌भवणारी नैसर्गिक आपत्ती, भूकंप, महापूर, मदत, पुरस्कार, आंतरराष्ट्रीय मदत आदि बाबींवर खर्च करायचा असतो. अर्थसंकल्प हा एखाद्या चौकातील सुशोभित केलेल्या कारंजासारखा असतो. कारंजातून उडणारे पाणी कारंजाजवळ पडते. पुन्हा तेच पाणी खालून कारंजात जाते. अर्थसंकल्पाचेही तसेच असते. सरकार जनतेकडून कर रुपाने महसुल गोळा करून उत्पन्न मिळवते व तेच उत्पन्न जनतेसाठी विविध विकास व कल्याण योजनांवर खर्च करते. अशा पद्धतीने वर्षभराच्या कालावधीत सरकारला एकूण मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा खर्च जास्त करावा लागला तर जास्तीच्या कराव्या लागणाऱ्या खर्चासाठी सरकारला अतिरिक्त पैसा उभा करावा लागतो. त्यात सरकारी कर्जरोखे, नवीन चलन निर्माण करणे, आंतरराष्ट्रीय कर्जे, आय.एम.एफ. कडून मदत अशा विविध मार्गांनी वित्तीय गरज भागविली जाते. परंतु उपरोक्त विविध मार्गांनी पैसा उभा करणे म्हणजे प्रत्यक्ष वित्तीय तूट निर्माण करणे असते. ही विविध कर्जे (वित्तीय तूट) येणाऱ्या पुढील वर्षात परतफेड करावी लागतात व त्यासाठी परत कर्जे उभारणे सारखे उपाय करुन ही वित्तीय तुट सातत्याने वाढत जाते. त्यासाठी सरकारला वित्तीय काटकसर, करवाढ, खर्च कपात, अनुदान कपात अशा उपाययोजना केल्यास परत त्याचा परिणाम महागाई वाढ, आर्थिक विकास दर घटणे, रोजगार, गुंतवणूक यावर होतो. म्हणून जास्तीची व सातत्याने होणारी वित्तीय तूट नियंत्रण करणे गरजेचे बनते व हीच परिस्थिती २००७-०८ च्या जागतिक मंदीवरील उपाययोजना करताना म्हणजेच करसवलती अनुदाने, प्रलोभने व अतिरिक्त खर्च यामुळे उद्‌भवली. २००७-०८ या वर्षापर्यंत २.६%

एवढ्या खाली वित्तीय तूट नियंत्रित असलेली आपली अवस्था पुन्हा बिकट होऊ लागली. यामुळे एका बाजुला २००८-०९ नंतर वाढती महागाई, त्यावर उपाय म्हणून वारंवार केली जाणारी व्याज दरवाढ, त्याचा गुंतवणूक रोजगार व उत्पादनावरील परिणाम अशा दुष्टचक्रामुळे आपला ८.५ ते ९% असलेला विकास दर पुन्हा घसरू लागला. त्यावर उपाय करतांना सरकारच्या नाकीनऊ आले. म्हणजे एका बाजूला महागाई कमी करण्याचे प्रयत्न व दुसऱ्या बाजूला आर्थिक विकासदरात वाढ करण्याचे आव्हान व त्यात परत वित्तीय तुटीचे आव्हान यामुळे केंद्र सरकार पुरते हैराण झाले. अशातच जागतिक आर्थिक रेटींग एजन्सी स्टॅन्डर्ड अँड पुअर्स ने वाढत्या वित्तीय तुटीमुळे भारताच्या रेटींगमध्ये कपात होवू शकते असा इशारा दिला. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर डी.सुब्बाराव रेड्डी यांनी देखील वित्तीय तूट गंभीर समस्या असल्याचे म्हटले. २०११-१२ मधील एकुण वित्तीय तूट एकुण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ८.५ ते ९% असणार असे म्हटले होते. त्यामुळे देशावरील कर्जाचे प्रमाण ५% पेक्षा जास्त वाढले.

वित्तीय तूट नियंत्रित करण्यासाठी अनावश्यक खर्चाला पायबंद, सबसीडीवर नियंत्रण व महसुली उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न म्हणून करांचे जाळे व्यापक करणे असे प्रयत्न करावे लागतील. त्यासाठीचा सर्वात महत्त्वाचा प्रयत्न म्हणजे प्रत्यक्ष कर संहिता तसेच गुड्स अॅन्ड सर्विस टॅक्स (जी.एस.टी) याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सरकारला ठोस पावले उचलावी लागतील. वित्तीय व्यवस्थापन किंवा नियंत्रण काटेकोरपणे करण्यासाठी सरकार समोरील आव्हाने दिवसेंदिवस वाढत आहेत. हे आव्हान पेलण्यासाठी कठोर आर्थिक शिस्त, अनावश्यक खर्चाला कात्री लावणे, सबसिडींवर नियंत्रण या उपायांवर फक्त चर्चा करण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती किती होते हे पाहणे महत्त्वाचे आहे. वित्तीय तुटीवर अंकुश ठेवण्यासाठी महसुली उत्पन्नात वाढ व वित्तीय काटकसर या उपायांबरोबरच सरकारला करांचे जाळे व्यापक करुन अधिकाधिक कर उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न करावा लागेल. परंतु निरंतर व दूरगामी उत्पन्न वाढीच्या दृष्टीने याचे चांगले परिणाम भविष्यात पहायला मिळतील. डी.टी.सी व जी.एस.टी. या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करवसुली प्रणालीतील बदल करणारे नवीन नियम लागू करण्याबाबत सर्व काही सरकारच्या राजनैतिक इच्छाशक्तीवर 'अवलंबून असेल. केंद्रात घटक पक्षांचे सरकार असल्यामुळे वित्तीय तूट नियंत्रणाची उपाययोजना करणे खूप कठीण व आव्हानात्मक असेल परंतु देशाच्या अर्थव्यवस्थेच्या गरजा व वस्तुस्थितीचे भान ठेवून काम करणे आवश्यक आहे.

**संदर्भ:**

१) दैनिक पुढारीच्या पुरवणी अभ्यासक्रमातून.

२) लोकमत मंथन यातील निष्कर्षावरुन.

# ‘रोहयो’चा स्त्री रोजगारावर प्रभाव

**एम. जे. गायकवाड,** नंदुरबार
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
वसंतराव नाईक कला व विज्ञान महाविद्यालय, शहादा
आजीव सदस्य क्र. १४३५
भ्रमणध्वनी: ९४२३१९४७३४

---

प्रस्तावना:

देशाच्या आर्थिक नियोजनाचे हे सातवे दशक सुरु आहे. या काळातील प्रयत्नांचा परिणाम म्हणून शेती व उद्योगधंदे यांच्या विकासात बऱ्यापैकी प्रगती झालेली दिसून येते. वाहतूक व दळणवळण क्षेत्रात चांगली क्रांती झालेली दिसून येते. परिणामी राष्ट्रीय व दरडोई उत्पन्नाचा आकार वाढलेला दिसून येतो. परंतु नियोजनाची पूर्व नियोजित उद्दिष्टे अर्थात दारिद्र्य निर्मुलन व बेरोजगारी समूळ नष्ट करण्यात अपयश आलेले दिसते. ग्रामीण भारत हा शेती प्रधान आहे. आजही शेतीवर ६५% पेक्षा जास्त लोकसंख्या रोजगार व उदरनिर्वाहासाठी अवलंबून असल्याचे दिसून येते. शेतीचे हंगामी स्वरुप व नैसर्गिक परावलंबन व लोकसंख्येचा अतिरिक्त भार अशा चक्रव्युहातून छुपी व हंगामी बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आढळुन येते. बेरोजगारीच्या या संकटातून मार्ग काढण्यासाठी राष्ट्रीय व राज्यस्तरावर विकासाच्या विविध योजना राबविल्या जात आहेत. त्यात ग्रामीण कामांचा कार्यक्रम, अवर्षण प्रवणक्षेत्र विकास कार्यक्रम, ग्रामीण रोजगाराचा धडक कार्यक्रम, पथदर्शी एकात्मिक ग्रामीण रोजगाराचा कार्यक्रम इत्यादी रोजगार निर्माण करणाऱ्या योजना राबविण्यात आल्या. पण बेरोजगारीचा प्रश्न परिणामकारकपणे सुटलेला नसल्याने १९७७ मध्ये राज्यात रोजगाराची हमी देणारा कायदा संमत करण्यात आलेला दिसतो. बेरोजगारीचा प्रश्न पुरुष श्रमिक केंद्रीतच दिसत असल्याने स्त्री बेरोजगारीच्या संकल्पनेकडे स्वतंत्ररित्या पाहिले जात नाही. कारण ग्रामीण भागात कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी फक्त पुरुषांची मजुरी पुरेशी होत नाही. म्हणून कुटुंबात दारिद्र्य व कुपोषण या

समस्या तीव्र बनत असतात. स्त्री-पुरुषांच्या बेरोजगारीची संकल्पना स्वतंत्रपणे अभ्यासल्यास शासनस्तरावर त्याचे वित्तीय तरतुदींचे नियोजन होऊ शकते. कारण पुरुषांच्या तुलनतेत स्त्री-श्रमिकांच्या बेरोजगारीचा दर मोठ्या प्रमाणात आहे व स्त्री-श्रमिकांच्या वेतनातून कौटुंबिक प्रश्न चांगल्या प्रकारे सोडविले जाऊ शकतात. म्हणून राज्याने १९७७ मध्ये व राष्ट्रीय स्तरावर २००५ मध्ये रोजगाराची हमी देणारा कायदा बहाल करण्यात आला आहे. त्याची परिणामकारकता ही प्रामाणिक अंमलबजावणीवर अवलंबून राहणार आहे.

### स्त्री-शेतमजुरीची स्थिती:

भारतीय अर्थव्यवस्था ग्रामीण व शहरी अशा दोन भागात विभागली आहे. या दोन्ही भागांमधील प्रश्न व समस्या भिन्न-भिन्न आहे. ग्रामीण भागात शेतीत एकूण रोजगारांपैकी ५९% रोजगार निर्माण होतो. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना दुय्यम स्थान असल्याने 'चूल आणि मूल' एवढेच त्यांचे क्षेत्र मर्यादित आहे. आजही ७२% स्त्रिया आर्थिकदृष्ट्या परावलंबी आहेत. सामाजिक दुय्यमत्त्वामुळे आजही महिलांचे प्रश्न कायम आहेत. उदा. मुलींच्या जन्माचे स्वागत नाही, मुलगा हाच वंशाचा दिवा, अंधश्रद्धा, आरोग्याचे प्रश्न, आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न, कन्या विक्री, वेश्या व्यवसाय, पती-पत्नीतील अंतर, स्त्रियांच्या चारित्र्यावरील संशय, स्त्रियांचा लैंगिक छळ, मानसिक छळ इ. तसेच स्त्रियांच्या आर्थिक परावलंबनाची ही कारणे आढळतात. त्यात पुरेशा कामाच्या संधी उपलब्ध न होणे, योग्य वेळी योग्य कामे उपलब्ध न होणे, समान वेतन न मिळणे, उदरनिर्वाहासाठी फक्त शेतीवर अवलंबून राहणे, १९९१ मध्ये भारतातील श्रमिक स्त्रियांपैकी ९०% स्त्रिया असंघटीत क्षेत्रात काम करीत होत्या. शेतीत ८०% स्त्रियांचे प्रमाण आहे. त्यात ५०% स्त्रिया शेतमजूर आहेत. शेतीत स्त्री-पुरुष श्रमिकांच्या बेरोजगारीच्या काळाबाबत तक्ता दर्शवितो की, ४५% ते ६२.७% पर्यन्त बेरोजगारीचा काळ आहे.

### रोहयो अधिनियमातील स्त्री श्रमिकांसाठीच्या तरतुदी:

१) रोहयो अधिनियम १९७७ कलम ३ अन्वये रोजगाराचा हक्क व दर आठवडा किंवा पंधरवाड्यापेक्षा जास्त उशिरा नसेल अशा वेळी मजुरी मिळण्याचा हक्क,
२) कलम ७(२) मधील (पाच) नुसार अकुशल कामगारांच्या कुशलतेसाठी प्रशिक्षणाची

| वर्ष | १९५६-५७ | १९६४-६५ | १९७७-७८ | १९८३-८४ | १९९३-९४ | १९९९-०० | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कामाचे दिवस<br>पुरुष | २३७ | १८५ | २३० | १५९ | २४४ | २३५ | २२७ |
| स्त्रिया | १६८ | २२७ | १८४ | १३६ | ११६ | ११६ | १८४ |
| बेरोजगारीचे प्रमाण<br>पुरुष | ३५% | २३.३% | ३७% | ५६.४% | ३३% | ३५% | ३७% |
| स्त्रिया | ५४% | ६२.२% | ४१.६% | ६२.७% | ४६% | ४५% | ४१% |

*(स्त्रोत - डॉ. विजय कविमंडन - कृषी अर्थशास्त्र)*

,त्यांच्या दर्जात वाढ करण्याची तरतुद,

३) ७(२) नुसार अनुसूचीनुसार वेतन दर देण्यात येईल.

४) ७(क) नुसार प्रसुती व निर्बिजीकरण शस्त्रक्रियांच्याबाबत आणि सोबतच्या मुलांना अपघात झाल्यास सानुग्रह अनुदानाची तरतुद,

५) अधिनियमातील ८(४) प्रमाणे बेरोजगार भत्ता प्राप्त करण्याचा हक्क प्रदान केला आहे.

६) यासोबत कामाच्या ठिकाणी काही मूलभूत सोयी उपलब्ध होण्यासाठी तरतुद आहे. त्यात कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, दुपारी सावलीसाठी सोय, खडी फोडतांना घालायचे चष्मे, प्रथमोपचार पेटी, मुलांना सांभाळण्यासाठी दाई इत्यादी सोयी शेतीत काम करताना उपलब्ध होत नसतात. बेरोजगार भत्ता व सानुग्रह अनुदान, प्रवासखर्च या बाबी शेतमालक देऊ शकत नाही म्हणून रोहयो कायदा शेतमजुरी करणाऱ्या स्त्री श्रमिकांना त्यांच्या बेरोजगारीच्या काळात फारच महत्त्वाचा आधार देतो. परंतु या कायद्याचे यश शेतमजुर स्त्रियांमध्ये याबाबत असणाऱ्या जाणीव-जागृतीवरच अवलंबून आहे. कारण शेतीत स्त्रियांना पुरुषांएवढीच कष्टाची कामे करावी लागतात. पण वेतन सारखे मिळत नाही. अर्थात त्यांच्यातील वेतनाची तफावत २५ ते २८% दरम्यान दिसून येते. म्हणून रोहयो कायदा *'समान काम समान दाम'* व लिंगभेदावर आधारित जादा सवलती स्त्री शेतमजुरांना प्रदान करतांना दिसून येतो.

### राज्यस्तरावरील स्त्री रोजगाराची स्थिती:

दारिद्रय व बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र राज्यात १९७७ ला रोजगाराचा हक्क कायदयाने बहाल करण्यात आला. या प्रेरणेतून भारत सरकारने २००५ मध्ये राष्ट्रीय स्तरावर हा हक्क कायद्याने बहाल केला. राज्यात गेल्या ३५ वर्षापासून रोजगाराच्या व्याप्तीत व श्रमिकांच्या उपस्थितीत सातत्याने वाढ झालेली दिसून येते. १ एप्रिल २००१ मध्ये राज्याच्या ३५० तालुक्यात रोहयोसाठी नोंदणी केलेल्या श्रमिकांची संखया ४१,८७,८११ एवढी होती त्यात २२,०२,७६९ पुरुष तर १९,८५,०४२ स्त्रिया होते. अर्थात स्त्री श्रमिकांचे प्रमाण ५०% च्या जवळपास असल्याचे दिसून येते.

सन १९९५-९६ ते २००४-०५ या दशकात रोहयोवरील एकूण खर्च रु. १२५८.५५ कोटी एवढा झालेला दिसतो तर यातून २२.१६ कोटी मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झालेली दिसते. याकाळात सरासरी प्रतिदिवस प्रतिवर्षी ४६.०३ ते ५२.८० रु. एवढी मजुरी प्राप्त झालेली दिसते. याचा सकारात्मक प्रभाव स्त्री श्रमिकांवर झालेला दिसून येतो. रोहयो कामावर स्त्री श्रमिकांच्या उपस्थितीचे प्रमाण रोहयोच्या सुरुवातीपासून म्हणजे १९७८-७९ मध्ये ४१.४% होते ते १९९० मध्ये ५५.०% होते १९९० नंतरच्या दशकात यात वाढ झालेली दिसते. १९९५-९६ मध्ये हे प्रमाण ३८% पर्यन्त होते. तर १९९८-९९ मध्ये हे ७३% पर्यन्त गेले. तसेच २००६-०७ व २००७-०८ या राष्ट्रीय व राज्यांच्या एकत्रित रोहयो वरील स्त्री श्रमिकांचे प्रमाण अनुक्रमे ४१% व ४४% होते. या काळात अनुक्रमे ९.५० कोटी व ८५.११ कोटी मनुष्यदिवस रोजगार निर्मिती झालेली दिसून येते. जवळपास निम्मा रोजगार स्त्री श्रमिकांना प्राप्त झाल्याचे दिसून येते.

## जिल्हास्तरावरील स्त्री रोजगार स्थिती:

२००१ मध्ये नंदुरबार आदिवासी बहुल जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १३,११,७०९ एवढी होती. त्यात पुरुष ६,६३,५११ तर स्त्रिया ६,४८,१९८ एवढी होती यात एकूण लोकसंख्येपैकी कामकर्ती लोकसंख्या ४६.८१% होती. त्यापैकी ग्रामीण भागात ४९.६२% नागरी भागात २९.४८% श्रमिक होते. जिल्ह्याचा साक्षरते बाबत राज्यात ३५ वा क्रमांक आहे. २००१ मध्ये ५५% साक्षरता होती, स्त्रियांची ४५.२०% होती. तर जवळपास ७०% दारिद्र्याचे प्रमाण आहे. अर्थात १,६७,६९९ कुटुंबे दारिद्र्यात आहेत त्यात जिल्ह्यात स्त्री शेतमजुरांचे ६३.३०% एवढे प्रमाण आहे. तर बिगरशेती क्षेत्रात २००१ मध्ये २५.१०% एवढे प्रमाण स्त्री श्रमिकांचे आढळून आले. यावरुन असे आढळुन येते की, कृषीत्तर भागापेक्षा कृषी क्षेत्रात स्त्री श्रमिकांचे प्रमाण जादा दिसते व पुरुष श्रमिकांच्या तुलनेत शेती क्षेत्रात त्यांच्या बेरोजगारीचा कालखंड मोठा दिसून येतो. तसेच या क्षेत्रात स्त्री-पुरुषांना प्राप्त होणाऱ्या वेतनात २५ ते २८% तफावत असलेली दिसून आली. यामुळे कृषी क्षेत्रात स्त्री श्रमिकांच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम झालेला दिसून येतो.

जिल्ह्यात रोहयो अंतर्गत ज्या कुटुंबात एकही व्यक्ती कमवती नसेल अथवा कायद्याच्या व्याख्येत ती बसत नसेल अशा व्यक्तींनाही रोजगार देण्याचे काम रोहयोने केले आहे. सर्वेक्षित ४०६ स्त्री श्रमिकांपैकी हे प्रमाण १६.१३% होते. तर शहादा व तळोदा तालुक्यात १९ ते २४ व २५ ते ५० वयोगटातील स्त्री श्रमिकांचे प्रमाणे अनुक्रमे ४८.६८% व ३२.२०% व ५० ते ६५ वयोगटापेक्षा जास्त अनुक्रमे ४४.९२% व ३८.४०% एवढे होते.

तसेच रोहयोवर काम करणाऱ्या जिल्ह्यातील स्त्री श्रमिकांमध्ये निरक्षतेचे प्रमाण जास्त दिसते. शहादा तालुक्यात ६९.०२% व तळोदा तालुक्यात ७०.२८% होत. दोन्ही तालुक्यात फक्त प्राथमिक शिक्षण घेतलेल्या संख्या ४०.४५% होती. तर माध्यमिकचे प्रमाण अनुक्रमे १९.१२% व १.०९% एवढेच दिसेल.

रोहयो मार्फत उपलब्ध झालेल्या रोजगारा बाबत शहादा व तळोदा तालुक्यात ३० दिवसापेक्षा जादा रोजगार अनुक्रमे ४३.६७% व ४३.९२% स्त्री श्रमिकांना प्राप्त झाला. तर १५ दिवसापेक्षा जादा अनुक्रमे ३८.६०% व ३३.६४% रोजगार प्राप्त झाला. तर १५ दिवसापर्यंत अनुक्रमे ६.३२% व ६.५४% स्त्री श्रमिकांना रोजगार प्राप्त झालेला दिसून आला. अर्थात ३० दिवसापेक्षा रोजगार प्राप्त करणाऱ्यांची संख्या अधिक दिसत असल्याने रोहयोची पसंती अधिक दिसून येते.

रोहयो वेतनदर हे राज्यातील किमान कायद्याच्या आधारावर निर्धारित झालेले असतात. हे दर राज्याच्या चार परिमंडळात रु. ४५,४७,४९ व ५१ असे होते. किमान वेतनात प्रत्येक दोन वर्षात पुनर्रचना व्हावी असा कायदा आहे पण ७ वर्षापेक्षा अधिक काळ ही पुर्नरचना न झाल्याने स्त्री श्रमिकांना अल्पवेतन प्राप्त झाले. त्याचा आर्थिक स्थितीवर विपरीत प्रभाव दिसून आला 'समान काम समान दाम' या आधारावर वेतनाचे वितरण झाले की नाही हे अभ्यासले असता या बाबत बऱ्याच अंशी तफावत जाणवली. शहादा भागात ९६ स्त्रियांनी समान वेतन मिळाल्याचे सांगितले तर ४८ स्त्रियांनी याबाबत समान वेतन मिळत नसल्याचे सांगितले तर ७५ स्त्रियांनी किमान वेतन मिळत असल्याचे सांगितले. तर ५८ स्त्री

श्रमिकांनी किमान वेतनापेक्षा कमी वेतन मिळत असल्याचे सांगितले तर तळोदा तालुक्यात ४४ स्त्रियांनी किमान वेतन मिळत नसल्याचे सांगितले. तर २८ स्त्रियांनी समान वेतन मिळते व २६ स्त्रियांनी असे वेतन मिळत नसल्याचे सांगितले. तर फक्त १२ स्त्रियांनी किमान वेतन मिळाल्याचे सांगितले. रोहयो कामावरील स्त्रियांची निरक्षरता अधिक असल्याने ही स्थिती दिसून येते. त्यामुळे मजुरी वाटपातील गैरप्रकार मोठ्या प्रमाणात होताना दिसून येतात.

रोहयोतून प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा किती भाग स्त्रिया स्वत:साठी खर्च करतात व घरासाठी किती खर्च करतात यावरुन स्त्रियांना आर्थिक निर्णय घेण्याचे कितपत स्वातंत्र्य आहे हे ही अभ्यासण्यात आले. रु.५०० पर्यन्त खर्च करण्याचे प्रमाण शहादा व तळोदा तालुक्यात अनुक्रमे ४१.२८% व १८.६९% तर रु. ५०० ते १००० पर्यन्त खर्च करण्याचे प्रमाण अनुक्रमे ३८.०७% व ५.६% एवढेच होते तर रु. १००० पेक्षा जादा खर्चाचे प्रमाण अनुक्रमे ५८.०५% व ३९.२५% एवढे दिसले. तर स्वत:साठी खर्च करण्याचे प्रमाणे अनुक्रमे ५०.३१% व ३३.६४% एवढे दिसले तर घर खर्चासाठी अनुक्रमे ९२.८८% व ३७.३८% दिसून आले अर्थात स्त्रिया स्वत:पेक्षा घरगुती खर्चावर अधिक भर देतांना दिसून आल्या. अर्थात प्रापंचिक खर्चात हातभार लागल्याने त्यांचे कुटुंबातील स्थान उंचावल्याचे त्यांच्या सांगण्यावरुन दिसून आले.

जिल्ह्यातील जवळपास ७६.७०% स्त्री कुटुंबे रोहयो कामाला प्राधान्य देत असल्याचे आढळून आले आहे. सर्वेक्षित शहादा तालुक्यात ३४.४९% स्त्रियांना रु. २० ते ४० मजुरी १९९५-९६ मध्ये प्राप्त झाली तर २००५-०६ मध्ये ७२.३०% स्त्री श्रमिकांना रु. ३० ते ९० च्या दरम्यान मजुरी प्राप्त झाल्याचे आढळले. तर तळोदा तालुक्यात या काळात २७.९९% स्त्रियांना रु. ३० ते ९० च्या दरम्यान मजुरी प्राप्त झाल्याचे आढळते. तसेच १९९५-९६ मध्ये रोहयोपासुन ११.७३% स्त्रियांना रु. १५०० पर्यंत तर २६.२९% स्त्रियांना रु. ३००० पर्यन्त २.८% स्त्रियांना रु. ३००० च्या वर उत्पन्न प्राप्त झाल्याचे दिसते. तर २००५-०६ मध्ये ५१.६४% स्त्री श्रमिकांना रु. २००० पर्यंत तर १७.३७% स्त्रियांना २ ते ४ हजारापर्यन्त तर २.३४% स्त्रियांना रु. ६००० पर्यन्त उत्पन्न प्राप्त झाल्याचे दिसून आले.

शोषण ही समाज व्यवस्थेतील भयानक कीड आहे ती रोहयोवर काम करणाऱ्या स्त्री-पुरुष श्रमिकांनाही बाधीत आहे. मात्र याचा स्त्री व पुरुष श्रमिकांवर भिन्न-भिन्न प्रभाव पडत असतो. पुरुष श्रमिकांच्या बाबत फक्त आर्थिक व मानसिक शोषणाचे प्रकार दिसून येतात. परंतु स्त्री श्रमिकांच्या बाबतीत लैंगिक, शारीरिक, आर्थिक, मानसिक मारहाण इ. प्रकारचे शोषण होत असते या बाबत रोहयोवर काम करणाऱ्या स्त्री श्रमिकांना मजुरी बाबत सर्वेक्षित तालुक्यांमध्ये अनुक्रमे २५.७१ व ७.४% शोषण होत असल्याचे आढळले. तर शारीरिक व मानसिक शोषणाबाबत अनुक्रमे ३.४२% व १.८% आणि २.८५% व १३% तक्रारी दिसून आल्या. मारहाणी व लैंगिक शोषणाबाबत अनुक्रमे ०.५७% व १.१४% तक्रारी दिसून आल्या या तक्रारी फार गंभीर स्वरुपाच्या आहेत. याबाबत कायदेशीर कारवाई सोबत सामाजिक व शैक्षणिक प्रबोधनाचीही फार आवश्यकता आहे.

निष्कर्ष:

योजनेच्या अंमलबजावणीत अनेक त्रुट्या, भ्रष्टाचार, गैरप्रकार, शोषण, वेतन वाटपात भेदभाव, धान्य वाटपात भ्रष्टाचार, वेळेवर वेतनाचे वाटप न होणे इत्यादी अनेक बार्बींमुळे स्त्रियांच्या आर्थिक स्थितीवर विपरित परिणाम झालेला आहे. उपलब्ध निधीचा पूर्ण वापर न करणे हा खूप मोठा सामाजिक व आर्थिक अन्यायाचा भाग योजनेत दिसून आला. ३१ मार्च २००६ अखेर रु.३०,६९०,१८,००,००० (तीस हजार सहाशे नव्वद कोटी अठरा लाख) रोहयो निधी संबंधित खात्याच्या मंत्र्याने राज्याच्या एकत्रित संचित निधीत जमा केला. हा सर्व निधी जर योग्य मार्गाने रोहयो राबविण्यासाठी खर्च केला असता तर अंदाजे १,७२,५४२.५५ कोटी मनुष्यदिवस रोजगार निर्मिती होऊ शकली असती. स्त्री श्रमिकांचे सरासरी ५०% उपस्थितीचे प्रमाण गृहित धरल्यास त्यांना निम्मे रोजगार प्राप्त झाला असता. यातून राज्यात शेती बाबतचे महत्त्वाचे प्रश्न सुटू शकले असते व रोहयोवर काम करणाऱ्या अनेक स्त्री-पुरुष श्रमिकांना त्यांच्या गावाजवळ, पडिक जमिनीच्या वापरातून कायम स्वरुपाचे रोजगाराचे साधन उपलब्ध होऊ शकले असते व बऱ्याच अंशी दारिद्र्य, बेरोजगारी व उपासमारी पासून राज्याच्या जनतेची सुटका होऊ शकली असती. अजूनही रोहयोच्या प्रामाणिक अंमलबजावणीने दुष्काळ, दारिद्र्य, बेरोजगारी, उपासमारी, कुपोषण इ. समस्या सुटू शकतात. त्याला लोकांच्या जाणीव जागृतीची गरज व राजकीय इच्छाशक्तीची आवश्यकता आहे.

संदर्भ:


१) विजय कवि मंडन, *कृषी अर्थशास्त्र,* श्रीमंगेश प्रकाशन : २००२

२) महाराष्ट्र शासन, *रोजगार हमी कायदा,* शासकीय प्रेस, मुंबई

३) Govt. of Maharashtra, *Statistical Information book,* Employment Guarantee Scheme (Part-I Expenduture, Part-II-Work-Planing Dept. EGS, Bombay 1984)

४) Mathur Krishnaraj, Diya Pande, Arun Kanchi, *Does EGS require restructuring for poverty alleviation and gender equality* - EPW - Vol. XXXIX no. 17 April 24-30.

५) समर्थन - महाराष्ट्रातील निवडक क्षेत्रांचा आढावा - मुंबई, २००८

६) संचालक आर्थिक व सामाजिक समालोचन जिल्हा नंदुरबार, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, मुंबई

७) Seema Kakade, *Restructuring of the EGS fund scrutiny & lesson in the contendent of NREGS* - Proyas Pune, August - 2008.

# अन्नसुरक्षा: काळाची गरज

**वंदना भगवान देवकर, जयसिंगपूर**
अर्थशास्त्र विभाग
जयसिंगपूर महाविद्यालय
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
आजीव सदस्य क्र. १३४८
भ्रमणध्वनी: ९४२२५२२०१७

---

**प्रास्ताविक:**

भारतासारख्या कृषीप्रधान देशाचा विचार करता देश अनेक प्रकारच्या मूलभूत समस्या सोडविण्यात व्यस्त आहे. म्हणजेच अनेक मूलभूत समस्या सोडविण्यात अजूनही आपल्याला यश प्राप्त झालेले नाही. स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजपर्यंतचा विचार करता काही समस्या ह्या सातत्याने प्रयत्न करून देखील आपले डोके वर काढत आहेत. त्यातील एक समस्या म्हणजे अन्न समस्या होय. तेव्हा कल्याणकारी राज्याचे स्वप्न पाहणाऱ्या या आपल्या भारत देशाला किंबहुना कोणत्याही देशाचे अन्न समस्या सोडविणे हे आद्य कर्तव्य आहे. मानवाच्या अनेक मूलभूत गरजातील एक गरज म्हणून अन्नाचा उल्लेख केला जातो. अन्न हे पूर्णब्रह्म आहे. काम करण्यासाठी प्रथम अन्नाची गरज भासते. तेव्हा ही गरज पूर्ण केल्याशिवाय इतर कोणतेही कार्य होऊ शकत नाही. थोडक्यात परमेश्वराने दिलेल्या देहाची जपणुक करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे आणि हे कर्तव्य पूर्ण करण्यासाठी अन्नाची नितांत गरज असते. मात्र ह्याच अन्नाची भारतात समस्या निर्माण झाली आहे. तेव्हा प्रस्तुत निबंधात अन्न सुरक्षा म्हणजे काय? अन्न समस्या निर्माण होण्यास कोणते घटक कारणीभूत आहेत? अन्न सुरक्षा करण्यासाठी कोणते उपाय आहेत? हा विचार घेऊन आपल्यापुढे लेखनाचा प्रपंच मांडत आहे.

**अन्न सुरक्षा संकल्पना:**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते आजपर्यंत आर्थिक नियोजनात शेती क्षेत्राला अनन्यसाधारण स्वरूपाचे महत्त्व दिले आहे याचे कारणही उघडच

आहे, एकूण लोकसंख्येपैकी ६५% लोकसंख्या शेतीक्षेत्रावर अवलंबून आहे. त्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधन शेती हे आहे. मात्र याच कृषीप्रधान देशात अन्न समस्येची परिस्थिती निर्माण झाली आहे. तेव्हा ही परिस्थिती दूर करून प्रत्येक व्यक्तीच्या मनात नियोजनाचे महत्त्व निर्माण करणे गरजेचे आहे.

भारतात बालक व महिला कुपोषित आहेत. जागतिक भूक निर्देशांकानुसार ८१ विकसनशील देशांमध्ये भारताचा जागतिक भूक निर्देशांकामध्ये ६७ वा क्रमांक लागतो. थोडक्यात भारताच्या बाबतीत अन्न सुरक्षा ही महत्त्वाची बाब बनली आहे. याचा अर्थ असा नव्हे की या संदर्भात प्रयत्न झाले नाहीत, प्रयत्न झाले पण अपेक्षित यश प्राप्त होऊ शकले नाही. पहिल्या महायुद्धापूर्वी भारत हा अन्नधान्याचा निर्यातक देश होता. मात्र ही परिस्थिती फार काळ टिकू शकली नाही. परिस्थितीत बदल होत गेला व अन्नाच्या बाबतीत आपल्याला इतर देशांवर अवलंबून राहावे लागले. १९३५ मध्ये ब्रह्मदेश भारतापासून वेगळा झाल्यानंतर भारताला तांदळासाठी ब्रह्मदेशावर अवलंबून रहावे लागले. त्यातच भरीसभर म्हणून १९४३ साली बंगालमध्ये दुष्काळ पडला आणि या दुष्काळाचा तीव्र तडाखा भारताला सहन करावा लागला. तेव्हा या निर्माण झालेल्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी योग्य अन्नविषयक धोरणाची गरज निर्माण झाली. आणि १९४३ मध्ये 'अन्नधान्य चौकशी समिती' नेमली गेली. चौकशी समितीच्या शिफारशीनुसार भारतसरकारने 'नियंत्रित शिधावाटप पद्धतीचा' अवलंब केला.

त्यातच १९४७ मध्ये भारताची फाळणी झाल्यामुळे भारताचा अन्नधान्याचा बोजा वाढत गेला. तेव्हा हा अन्नधान्य प्रश्न सोडविण्यासाठी भारत सरकारने सप्टेंबर १९४७ द्वितीय अन्नधान्य धोरण समिती' नेमली. या समितीने सुचविलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करून देखील अन्नधान्याच्या बाबतीत सरकारच्या वाट्याला निराशाच आली. अन्नधान्य समस्या सोडविणे गरजेचे असल्याकारणाने सरकार सातत्याने प्रयत्न करीत होते. पण यश प्राप्त होत नव्हते. सरकारने पुन्हा एक प्रयत्न म्हणून १९५० मध्ये 'अन्नधान्य अधिप्राप्ती' समिती स्थापन केली. या समितीने १९४७ च्या समितीच्या शिफारशींच्या विरोधी शिफारशी केल्या. कोणत्याच समितीच्या शिफारशीने ही समस्या सुटून समाधान झाले नाही.

नियोजन काळाच्या संदर्भात विचार करता, अन्नधान्य स्वयंपूर्णता हे पहिल्या पंचवार्षिक योजनेचे मुख्य उद्दिष्ट होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात निसर्गाच्या अनुकूलतेने अन्नधान्याच्या किंमती २५% नी कमी होण्यास मदत झाली. मात्र ही परिस्थिती पुढील काळात बदलली. अन्नधान्याचे उत्पादन वाढून देखील अन्नधान्याच्या किंमती वाढल्या. ह्या किंमती जवळजवळ ४१% नी वाढल्या होत्या. १९५६ पासून अन्नधान्याची अमेरिकेकडून आयात केली जावू लागली. त्यानंतर १९६६ मध्ये 'अन्नधान्य धोरण चौकशी' समिती नेमली. या समितीने देखील अन्न समस्या सोडविण्याच्या दृष्टीने शिफारशी केल्या. १९६९-७० आणि १९७०-७१ या काळात अन्नधान्याच्या बाबतीत समाधानकारक उत्पादन झाले होते. पण ही परिस्थिती १९७१-७२ मध्ये बिघडली आणि जैसे थे प्रश्न निर्माण झाला. म्हणजेच या सर्वांचा सांगोपांग विचार केल्यास स्वातंत्र्यापासून ते आज अखेर भारताला

अन्न समस्येचा प्रश्न भेडसावत आहे. १९७० अखेर हा प्रश्न केवळ अन्नधान्याच्या उपलब्धतेशी संबंधित होता. मात्र आता ह्या प्रश्नाची व्याप्ती संकुचित राहिली नसून व्यापक बनली आहे. स्वावलंबनाला निर्धारित करणारा महत्त्वपूर्ण घटक बनला आहे.

आज २१ व्या शतकाचा विचार करता भारताला एक महासत्ता असलेला देश म्हणून पाहिले जाते. देशाने आज अनेक क्षेत्रात नेत्रदिपक स्वरुपाची प्रगती केली आहे. हे जरी खरे असले तरी दुसऱ्या बाजूला अनेक प्रश्न उग्र रूप धारण करून बसले आहेत. त्यातीलच अन्नसमस्या ही एक आहे. तेव्हा ही समस्या सोडविणे म्हणजे अन्नसुरक्षा होय.

अन्नसुरक्षा ही संकल्पना बहुआयामी व व्यापक स्वरूपाची आहे. अन्न सुरक्षा ही पूर्वीच्या काळी अन्नधान्य उत्पादकतेशी निगडीत होती. मात्र सध्याच्या स्थितीत ही संकल्पना व्यापक बनली आहे. केवळ अन्नधान्याचे पुरेसे उत्पादन म्हणजे अन्नसुरक्षा नव्हे त्याचबरोबर ते अन्नधान्य खरेदी करण्यासाठी लोकांमध्ये क्रयशक्ती निर्माण करणे होय. ही क्रयशक्ती निर्माण करणे म्हणजेच लोकांच्या हातात गरजेइतके उत्पन्न निर्माण होणे होय. हे निर्माण करण्यासाठी आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करावी लागेल. थोडक्यात अन्न सुरक्षा म्हणजे:

१) मागणीप्रमाणे अन्नधान्य पुरवठा असणे आणि
२) त्या अन्नधान्याद्वारे लोकांची गरजही पूर्ण झाली पाहिजे. : पी. बी. श्रीनिवासन.

देशातील सर्व लोकांना कृतिशील आणि आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी सर्व काळात पुरेसा अन्नधान्य पुरवठा करणे होय. : जागतिक विकास अहवाल १९८६.

''सर्वांना सर्वकाळ अन्न मिळविण्यासाठी भौतिक व आर्थिक क्षमतेची निर्मिती होय'' अन्न व कृषी संघटना १९८३ याठिकाणी अन्न सुरक्षेची व्याप्ती स्पष्ट करण्यासाठी चार अवस्था सांगण्यात आल्या आहेत.

१) पहिली अवस्था = पर्याप्त प्रमाणात अन्नधान्य उपलब्धता
२) दुसरी अवस्था = पहिली अवस्था + डाळी
३) तिसरी अवस्था = दुसरी अवस्था + दुध व दुग्धजन्य पदार्थ
४) चौथी अवस्था = तिसरी अवस्था + भाजी, फळे, अंडी, मांस, मासे.

म्हणजेच काय तर लोकांचे कुपोषण थांबून लोकांना पोषक आहार उपलब्ध होणे होय असे म्हणता येईल. याचाच अर्थ अन्न ही जीवनावश्यक वस्तू असल्याने तिचा पुरवठा पूर्णपणे बाजारयंत्रणेवर सोपविणे योग्य होणार नाही. ही गोष्ट विचारात घेऊन सरकार सातत्याने अनेक प्रकारचे प्रयत्न करीत आहे.

### भारतातील अन्नधान्य उत्पादकतेतील कल:

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात संस्थात्मक, तंत्रज्ञानात्मक आणि संरचनात्मक सुधारणा घडवून आणून शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू होते. उपलब्ध शेतजमिनीमध्ये अनेक आदानांचा वापर करून कृषी उत्पादन मिळविले जाते. भारताने कल्याणकारी राज्याचा अंगिकार केल्याने लोकांचे कल्याण करणे महत्त्वाचे आहे. लोकांचे कल्याण करण्याच्या अनेक मापदंडापैकी अन्न सुरक्षा हा एक आहे. तेव्हा देशाने पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून ते आज अखेर आपले

प्रयत्न चालू ठेवले आहेत. कोणत्याही देशाची प्रगती ओळखण्यासाठी अन्नधान्य सुबत्ता हा मापदंड महत्त्वाचा मानला जातो. एखाद्या देशाने अन्नधान्यासाठी इतर देशावर अवलंबून राहणे ही त्या देशाच्या दृष्टीने लाजिरवाणी बाब आहे. कारण हे करण्यासाठी अन्नधान्य आयात करणाऱ्या देशाला निर्यातदार देशाच्या अनेक अटी मान्य कराव्या लागतात. म्हणजेच साध्या भाषेत 'भीक नको पण कुत्रा आवर' अशी अवस्था होऊन बसते. तेव्हा ह्यासाठी अन्नसुरक्षा करणे अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे. भारतासारख्या कृषीप्रधान देशात आज अखेर अन्न समस्येचा प्रश्न अनेक प्रयत्न करूनही सुटलेला नाही. देशातील उपलब्ध असलेल्या जमिनीचा महत्तम वापर करण्यात भारताचा तिसरा क्रमांक लागतो. हे जरी खरे असले तरी कृषी उत्पादकता ही कमी आहे हे वास्तव आहे. याचे कारण म्हणजे लागवडीयोग्य जमिनीचे प्रमाण जास्त असून देखील प्रत्यक्षात कसली जाणारी जमीन कमी आहे. जगाच्या तुलनेत भारताला फक्त २.४२% जमीन वाट्याला आली आहे. तरी देखील अन्नधान्य उत्पादन करणारा भारत हा एक मोठा देश आहे. हे सर्व काही आहे तरीही अन्नसमस्या आहे. म्हणजेच कुठेतरी गणित चुकत आहे हे खरे. लोकसंख्या आणि अन्नधान्य उत्पादन यातील वाढ विचारात घेतल्यास १९५१ मध्ये लोकसंख्या ३६३.२ दशलक्ष होती त्याकाळातील अन्नधान्याची निव्वळ उपलब्धता ४४.८ दशलक्ष टन इतकी होती. तर २००१ चा विचार करता हे प्रमाण लोकसंख्येच्या बाबतीत १०३३.२ दशलक्ष तर अन्नधान्य १४५.६ दशलक्ष टन इतके होते. अन्नधान्याचा दर दिवशी दरडोई उपभोग विचारात घेतल्यास तो १९५१ मध्ये ३३४.२ ग्रॅम इतका होता, तो २०११ मध्ये ४७३.९ ग्रॅम इतका वाढला. याचाच अर्थ या ६० वर्षाच्या कालावधीत म्हणावी तितकी उपभोगात वाढ झालेली नाही. याचा अर्थ अन्नसुरक्षेची गरज आहे. भारतातील अन्नधान्याची उत्पादन क्षमता व प्रत्यक्ष उत्पादकता यांचा विचार करता प्रत्यक्ष उत्पादकता ही उत्पादन क्षमतेपेक्षा फारच कमी असल्याचे जाणवते. भारताची कडधान्य आयात निर्यातीची बाजू अभ्यासता असे चित्र जाणवते की निर्यात ही आयातीच्या मानाने नगण्य आहे. थोडक्यात शेतीची उत्पादकता कमी असल्याने अन्न सुरक्षा ही बाब महत्त्वाची आहे.

### अन्नसुरक्षेच्या अपयशाची कारणे:

सातत्याने प्रयत्न करून देखील भारताला अन्नसुरक्षेच्या बाबतीत यश आले नाही. किंवा उत्पादन व उत्पादकेत वाढ झाली नाही. १९५० पासून २००९-१० पर्यंत लोकसंख्या वाढ आणि अन्नधान्य उत्पादन पाहिले असता ते १९९०-९१ पर्यंत प्रत्येक माणसामागे अन्नधान्याची उपलब्धता ३९५ पासून ५१० किलोग्रॅम पर्यंत होती. मात्र नंतर ती कमी झाली. तेव्हा अन्नसुरक्षा ही महत्त्वाची बाब असल्याने आटोकाट प्रयत्न करून देखील निराशा होते. तेव्हा या अपयशाची नेमकी काय कारणमिमांसा आहे हे पाहणे योग्य ठरेल.

१) वाढती लोकसंख्या:

वाढती लोकसंख्या ही एक सर्व समस्यांचे मुळ आहे असे म्हटल्यास ते वावगे होणार नाही. लोकसंख्या वाढीचे आणि देशात उत्पादित होणाऱ्या अन्नधान्याचे प्रमाण विचारात घेतल्यास या दोन्हीतील दरी फार मोठी आहे. त्यामुळे अन्न समस्या भेडसावत आहे.

२) अन्नधान्याच्या वाढत्या किमती:

भारतात २००८ पासून महागाईचा अनुभव येऊ लागला. सातत्याने अन्नधान्य, भाजीपाला, कडधान्य, गॅस यांच्या किमती वाढल्या पण लोकांच्या हातातील उत्पन्न न वाढल्याने अन्न समस्या गंभीर बनली.

३) शेतीचा लहान आकार:

भारतात शेतीचा सरासरी आकार सुमारे दोन हेक्टर पर्यंत आहे. वाढत्या लोकसंख्येबराबेर हा आकार कमी कमी होत चालल्याने त्याचा परिणाम उत्पादकतेवर होत आहे.

४) निर्वाहासाठी शेती करण्याची प्रवृत्ती:

भारतीय शेतकरी अजूनही उदरनिर्वाहासाठी दृष्टीकोनातूनच शेती करतो. व्यापारी दृष्टीकोनातून शेती न केल्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रश्न येत नाही. परिणामी पारंपरिक पध्दतीने उत्पादन घेतल्याने उत्पादकता कमी राहते.

५) अपुरा भांडवल पुरवठा:

भारतातील शेतकरी हा आर्थिकदृष्ट्या सबळ नसल्याने त्याला भांडवलशाही बँका किंवा सहकारी संस्था यांचा आधार घ्यावा लागतो. या संस्थांकडून होणारा कर्जपुरवठा हा योग्य वेळी व योग्य प्रमाणात न झाल्याने देखील उत्पादकता कमी आहे.

६) सार्वजनिक वाटप व्यवस्था:

भारतात सार्वजनिक वाटप व्यवस्थेमार्फत अन्नधान्याचे वितरण होत असते. मात्र ही यंत्रणा बऱ्याच प्रमाणात कुचकामी असल्यामुळे लोकांना सतत व योग्यवेळी अन्नधान्याचे वाटप होऊ शकत नाही.

७) अन्नधान्याचे राखीव साठे:

देशात अचानक उद्‌भवणाऱ्या संकटांना तोंड देता यावे म्हणून केंद्र सरकार अन्नधान्याचा काही साठा शिल्लक ठेवते. या साठ्यांचा विचार करता मुबलक अन्नधान्य शिल्लक आहे. मात्र योग्य व्यवस्थापनाचा अभाव असल्याने अन्नसमस्या जाणवते.

८) अन्नधान्याचे घटते उत्पादन:

अन्नधान्याच्या उत्पादकतेचा विचार करता १९७० ते १९९० या काळात उत्पादकता वाढत गेली. नंतर ही उत्पादकता घटल्याचे जाणवते. भारतातील अन्नधान्य उत्पादकता ही उपलब्ध क्षमतेपेक्षा फारच कमी असल्याने देखील अन्न समस्या जाणवते.

९) पर्यावरणाचा ऱ्हास:

आज मानवाच्या स्वार्थी स्वभावामुळे किंवा अनावश्यक सुखासाठी जंगलतोड मोठ्या प्रमाणात केली आहे. त्याचा परिणाम जमिनीची धूप होऊन जमीन नापिक बनत आहे.

१०) लोकांच्या अन्नविषयक सवयी:

भारतातील काही लोकांच्या अन्नविषयक सवयीचा विचार करता धार्मिकतेच्या नावाखाली मांस, अंडे, मासे यांचा आहारात वापर केला जात नाही. त्यामुळे देखील अन्न सुरक्षा होत नसल्याचे जाणवते.

११) वाढते शहरीकरण:

वाढत्या शहरीकरणामुळे काही वेळा लागवडीयोग्य जमीन नष्ट होते. परिणामी उत्पादनात घट होऊन अन्नसमस्या जाणवते.

१२) जमिनीचे क्षारीकरण:

काही ठिकाणी पाण्याचा अतिरिक्त वापर झाल्याने जमीन क्षारपड बनली आहे. त्या क्षारपड जमिनीवर कोणतेही पीक येणे शक्य नसते. तेव्हा पाण्याचा नियोजनबद्ध वापर होणे गरजेचे आहे.

१३) कुशल लोकांची कमतरता:

भारतात असा समज आहे की शेती हा निरक्षर लोकांनी करण्याचा व्यवसाय आहे. मात्र हवामानातील बदल, निसर्गाला अनुकुल पिके घेणे गरजेचे असल्याने आता शेती क्षेत्र केवळ निरक्षर लोकांकडे सोपवून चालणार नाही तर त्यांच्या बरोबर शिक्षित लोकांनाही काम करावे लागेल.

१४) शेती अनुदाने:

आर्थिक सुधारणांनंतरचा कालखंड विचारात घेता शेती क्षेत्रातील अनुदान कपात करण्यात आले. कृषीप्रधान असलेल्या या देशातील कृषी अनुदान कपात करणे म्हणजे शेतकऱ्यांना दिलासा न देणे होय.

## अन्नसुरक्षिततेसाठी उपाय:

१) लोकांच्या क्रयशक्तीत वाढ करणे:

अन्न सुरक्षेसाठी लोकांची क्रयशक्ती वाढविणे गरजेचे आहे ही क्रयशक्ती बेकारीचे निर्मुलन करून निर्माण होत असते. त्या दृष्टीने सरकार अनेक योजनांच्या माध्यमातून पूर्ती करीत आहे. आता ही पूर्ती काटेकोरपणे होणे गरजेचे आहे.

२) आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यक्षम करणे:

देशामध्ये काही नैसर्गिक आपत्ती येऊन पिकांची उत्पादकता कमी होत असते. तेव्हा ही उत्पादकता कमी होऊ नये यासाठी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक कार्यक्षम करणे.

३) शेतीक्षेत्रातील गुंतवणूक वाढविणे:

शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा असून देखील या क्षेत्रात होणारी गुंतवणूक घटत असल्याचे चित्र जाणवते. तेव्हा शेती क्षेत्रात गुंतवणूक वाढविल्यास अन्न समस्या सोडविण्यास मदत घेऊ शकते.

४) सिंचनाखालील जमीन क्षेत्र वाढविणे:

भारताच्या एकूण लागवडीयोग्य जमिनीपैकी अत्यल्प हिस्सा हा सिंचनाखाली आहे. याचा अर्थ अजूनही बऱ्याच अंशी शेती ही पावसाच्या पाण्यावर केली जाते. त्यामुळे ज्या भागात पावसाचे प्रमाण कमी आहे तेथे जमिनी पडून आहेत.

५) सेंद्रीय खतांचा वापर करणे:

भारतात नवीन उत्पादन तंत्रामुळे रासायनिक खतांचा वापर वाढला आहे. १९५१-५२ मध्ये १ हेक्टर मागे फक्त अर्धा किलो सरासरी खते वापरली जात होती. आता हे प्रमाण १०० किलोंच्यावर गेले आहे. मात्र दीर्घकालीन उत्पादकता, खतांच्या किमती, पाण्याचा पुरवठा या गोष्टींचा विचार करता सेंद्रीय खतांचा वापर योग्य ठरतो.

६) आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करणे:

देशात हरित क्रांती होऊन देखील देशात सर्व ठिकाणी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर केला जात नाही. अजुनही जुनाट पद्धतीने शेती कसली जाते. तेव्हा उत्पादन वाढीसाठी आता आधुनिक शेतीतंत्राचा वापर होणे आवश्यक आहे.

७) विस्तृत व कार्यक्षम संघटन:

अन्नधान्य समस्या टाळण्यासाठी विस्तृत व कार्यक्षम संघटन असणे गरजेचे आहे. हे काम सहकार क्षेत्रामार्फत किंवा संशोधन केंद्रामार्फत प्रसार माध्यमे म्हणून झाल्यास उत्पादकता वाढू शकेल.

८) अन्नधान्य वितरण व्यवस्था:

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत सर्व

लोकांना योग्य किंमतीला वेळेवर अन्न धान्याचे वितरण होणे गरजेचे आहे. पुरेसे धान्य असूनही अकार्यक्षमतेमुळे ते धान्य योग्य प्रकारे वितरित न होता लाखो टन धान्यसाठा पडून राहतो. हे थांबविणे गरजेचे आहे.

९) संस्कृतीचे जतन:

आज जगाच्या पाठीवर भारतीय संस्कृती डौलाने विराजमान आहे. मात्र या संस्कृतीचा ऱ्हास होत चालला असल्याचे दिसते. भारतीय संस्कृतीतील सर्व सणांमध्ये आरोग्य आणि विकास या गोष्टींची जोपासना होते. उदा. नागपंचमीसारखा सण हा शेतीची बाजू विचारात घेऊन केला जातो. कारण साप हा उंदरांची संख्या कमी करीत असल्यामुळे उंदरापासून धान्यांची होणारी नासाडी थांबवून उत्पादकता वाढण्यास मदत होते.

## निष्कर्ष:

भारताच्या संदर्भात असे बोलले जाते की, पूर्वीच्या काळी एक सधन राष्ट्र म्हणून या देशाचा लौकिक होता. मात्र हा लौकिक कालांतराने नाहीसा झाला आणि अनेक समस्या उभ्या राहिल्या. कल्याणकारी राज्याचा स्वीकार करणाऱ्या आणि कृषी प्रधान म्हणवून घेणाऱ्या देशात लोकांना दोन वेळचे पोट भरून अन्न मिळू नये या सारखी दुसरी लाजिरवाणी गोष्ट नाही. एकीकडे आपला देश २१ व्या शतकात महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहतो तर दुसरीकडे लोकांच्या मूलभूत गरजा भागवू शकत नाही. महाशक्तीशाली किंवा महासत्ता होण्यासाठी त्या देशातील जनता प्रथम सुखी, समाधानी आणि आनंदी असावी लागते आणि हे सगळं होण्यासाठी पोटाची खळगी भरणे गरजेचे आहे. अन्यथा रिकाम्या पोटी स्वत:चा देह सांभाळणे देखील शक्य नसते. फक्त महासत्ता बनण्याच्या गप्पा मारून देश महासत्ता होत नाही तर कृती व्हावी लागते. विकास म्हणजे दुसरे तिसरे काही नसून देशातील लोकांना समाधानी ठेवणे होय. मग देशातील लोक कधी समाधानी राहतील या प्रश्नाचे उत्तर म्हणजेच विकास होय. तेव्हा हा विकास केवळ सरकारने करण्याची गोष्ट आहे किंवा सरकारकडे बोट दाखवून चालणार नाही. यात प्रत्येकाने सहभाग घेतला पाहिजे. जिथे तिथे अन्नधान्याची नासाडी होते ते कटाक्षाने टाळले गेले पाहीजे. शेवटी एवढेच म्हणणे सदैव जागरुकता बाळगून वेळीच या समस्येचा बंदोबस्त केल्यास खरोखरच देश महाशक्तीशाली बनेल असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

## संदर्भ:


१) *योजना,* ऑक्टोबर २०१०

२) *भारतीय अर्थव्यवस्था,* देसाई भालेराव, निराली प्रकाशन

३) *नेट सेट मार्गदर्शिका अर्थशास्त्र,* एन. बी. कुलकर्णी

४) *भारतीय अर्थव्यवस्था,* प्रा. एन. एल. चव्हाण

५) *शिवार्थ,* २२ वी शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषद

६) *कृषी अर्थशास्त्र,* डॉ. विजय कवीमंडन, विद्या प्रकाशन, नागपूर.

७) *अर्थसंवाद,* जानेवारी, मार्च २००३ / खंड २६ अंक ४

८) *व्यावसायीक पर्यावरण,* भोसले-काटे.

# महागाईतील सरकारी धोरण व रिझर्व्ह बँक

**गजानन भाकरे,** कोल्हापूर
आजीव सभासद क्र. १३७७
भ्रमणध्वनी: ९८६०८५७२२८

भारत २०२० मध्ये जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या देशाच्या आर्थिक विकासाच्या दरात घसरण होणे ही एक चिंतेची बाब आहे. भारताने उदारीकरण व खाजगीकरणाचा निर्णय १९९१ मध्ये घेतला. त्यामुळे देशाच्या आर्थिक, सामाजिक, बौद्धिक विकासात भर पडली गेली. लोकांच्या हाती पैसा खुळखुळू लागला. त्यामुळे अनेकांचे जीवन आमुलाग्र बदलून गेले. देशाच्या विकासदरात वाढीची भर पडली. मात्र बदलत्या राजकिय समिकरणामुळे अर्थकारणाच्या चित्रात बदल झपाट्याने झालेला दिसतो.

नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष माँटेकसिंग अहलुवालिया यांनी महागाईबाबत आपला अंदाज चुकल्याचे वक्तव्य नुकतेच केले होते, पण ही महागाई मार्च २०१२ पर्यंत खाली येईल असेही पोकळ मनाने भाकीत केले. मात्र काही दिवसात महागाई वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजेच पेट्रोल, डिझेल, रॉकेल आणि गॅस ह्यांची दरवाढ झाली की, साहजिकच इतर वस्तूंवर अथवा क्षेत्रावर त्याचा परिणाम होऊन महागाई वाढली आहे.

देशाची आर्थिक घडी सुस्थितीत यावी यासाठी रिझर्व्ह बँक आणि सरकार सातत्याने प्रयत्न करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सुब्बाराव यांनी २०११-१२ वर्षात रेपो दरात सतत वाढ करीत आणली. त्याचबरोबर ठेवीदारांच्या हिताचा पण बँकांच्या अडचणीच्या आर्थिक नियोजनाचे महत्त्वाचे निर्णय रिझर्व्ह बँकेने घेतले ते पुढीलप्रमाणे:

१) बचत ठेवीवरील व्याजाचे नियंत्रण काढून टाकले. बचत ठेवीवरील व्याज सध्या ४% आहे. मात्र ज्या ठेवीदाराची रक्कम १ लाखापेक्षा जास्त आहे अशा ठेवीदारांना व्याज बँका आपल्या मर्जीप्रमाणे देऊ शकतात.

२) रिझर्व्ह बँकेत बेसल ३ नियमांची अंमलबजावणी करून बँकांना जादा भांडवल प्राप्त करून दिले.

३) *ग्रामीण जनतेला सर्व समावेशक सेवा* नवीन बँकींग धोरण.

महागाई वाढीवर नियंत्रणाचे कार्य प्रामुख्याने रिझर्व्ह बँकेलाच करावे लागते.

म्हणूनच गेल्या वर्षामध्ये बारा वेळा रिझर्व्ह बँकेने व्याजदरात वाढ केली. ह्याचा मुख्य उद्देश म्हणजे चलनदर वाढीवर अंकुश लावणे होय. व्याजदरात वाढीमुळे बाजारातील कर्जे महाग झाली. त्याचा परिणाम आर्थिक विकासावर झाला. विकासाचा दर ७.३% राहिल्याने सरकारची आर्थिक प्रकृती दर्शविणारी वित्तीय तूट वाढली. त्यामुळे देशाची आर्थिक घडी नीट बसवण्यासाठी सरकारला पेट्रोल, डिझेल, गॅस इ. अनुदान कमी करणे हे कितपत फायदेशीर ठरेल ?

विकासाचा दर वाढविण्यासाठी गुंतवणुकीवर भर देण्यास प्राधान्य असते. मात्र देशात होत असलेले भ्रष्टाचार, घोटाळे, तसेच अनेक गैरव्यवहार ह्यामुळे गुंतवणुकीवर विपरित परिणाम होत असून ह्यामुळे भाववाढ झाली. हे सुध्दा भाववाढ थांबविण्याची मागणी सरकारकडे केली जात आहे.

वाढत्या दरवाढीवर उपाय करण्यात रिझर्व्ह बँक व सरकार प्रयत्न करीत असताना अमेरिकेच्या दुबळ्या अर्थव्यवस्थेचा थोडाफार परिणाम भारतीय आर्थिक वाढीवर होत असल्यामुळे रिझर्व्ह बँकेने व्याजदर सतत वाढ करत गेल्यामुळे कर्ज वसुलीवर परिणाम होऊन बँकांच्या नफा क्षमतेवर परिणाम होऊन बँकांच्या गुणवत्तेवर गदा येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नरसिंहम् समितीचे धोरण व नवीन बँकींग परवाना धोरण ह्यांचा मिलाफ साधून ग्रामीण भागाचा व गरीब जनतेचा विकास हा मुखवटा धारण करून नॉन बँकींग फायनान्स कंपनी मोठे भांडवलदार, बहुराष्ट्रीय कंपन्या व परकीय देशातील गुंतवणुकदार इ. च्या फायद्यासाठी नवीन बँकींग योजना राबवून भांडवलदाराला श्रीमंत केले जात असल्याची भिती व्यक्त केली जात आहे.

नवीन बँकींग धोरण हे ग्रामीण जनतेला सर्व समावेशक सेवा हा हेतू डोळ्यासमोर ठेऊन तसेच ग्रामीण उद्योजकाचा विकास ह्या करिता ४०% अर्थसहाय्य देण्याची तरतूद नव्या धोरणामुळे ग्रामीण भागाचे राहणीमान, मानसिकता, आर्थिक उलाढाल, शैक्षणिक पात्रता, बदल होऊन दारिद्र्य व विषमता कमी करण्यास बँका हातभार लावतील. मात्र फायनान्स कंपन्यांना बँकींग परवाना देण्यापूर्वी यावर सारासार विचार होण्याची गरज आहे. यासाठी कायदेशीर तरतूद करणेही आवश्यक वाटत आहे.

सध्या देशाची अर्थव्यवस्था मंदीतून वाटचाल करत आहे. कारण सतत वाढणारे तेल व डिझेलच्या किंमती ह्याचा परिणाम देशातील तेल कंपन्यांवर होत असल्यामुळे महागाईला वेग आला आहे. तो कमी करण्यासाठी आर्थिक स्थितीवर विचार विनिमय करणे आवश्यक आहे. तसेच प्राथमिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणुक करून विकास दर वाढवण्यासाठी प्रत्येक राज्याला काही स्वायत्तता द्यावी. उदा. महसुल उत्पन्न, पेट्रोल, डिझेल, गॅस यांच्या किंमती नियंत्रित राहतील अशी कार्यप्रणाली विकसित केली पाहिजे. ह्या सर्व बाबींवर सरकार व रिझर्व्ह बँकेने विशेष काळजी घेतली तरच महागाईवर नियंत्रण राहील.

संदर्भ:


1. *Reserve Bank of India Bulletin*, 2011-12.
2. *Money Banking*, International Trade and Public Finance - M. L. Jhingan.
3. *Indian Economy*, Datt & Sundaram.
4. *Indian Economy*, Pratiyogita Darpan.

# आर्थिक विकासात परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीचे योगदान

**दीपक विठ्ठल भुसारे, पैठण**
अर्थशास्त्र विभाग, प्रतिष्ठान महाविद्यालय
आजीव सभासद क्र.१४७९
भ्रमणध्वनी: ९४०५२७६३२०

**शिवाजी अंभोरे, औरंगाबाद**
विभाग प्रमुख, पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालय
आजीव सभासद क्र. ९७३

## प्रस्तावना:

प्रत्येक देशाला विकासाच्या प्रारंभिक अवस्थेत भांडवलाची मोठ्या प्रमाणात गरज असते. भांडवलाशिवाय कोणत्याच देशाचा विकास होवू शकत नाही. अमेरिका, इंग्लंडसारख्या देशांनी १८ व्या, १९ व्या शतकात अनेक देशाकडून कर्ज रुपाने भांडवल घेऊन आपला विकास घडवून आणला आहे. म्हणून या देशांनी आज प्रचंड प्रमाणात आर्थिक विकासात प्रगती केली आहे. ज्या देशात अंतर्गत बचतीचा दर कमी असतो तेव्हा त्या देशाला बाह्य बचतीची गरज असते. बाह्य बचत म्हणजेच परकीय गुंतवणूक होय. भारत हा विकसनशील देश आहे. त्यामुळे भारतात मोठ्या प्रमाणात भांडवलाची कमतरता आहे. भारतात १९९१ नंतर नवीन आर्थिक धोरणानंतर भारतीय अर्थव्यवस्थेत फार मोठे बदल झाले. आपली अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली. परकियांसाठी आपली अर्थव्यवस्था खुली करण्यात आली.

## भारतातील विदेशी गुंतवणुकीचे धोरण:

भारतात १९९१ पूर्वी बंदिस्त अर्थव्यवस्था होती. परकीय गुंतवणुकीला भारतात जास्त प्रमाणात वाव नव्हता. भारताने स्वातंत्र्यानंतर

जवळपास ४०-४५ वर्षे देशातील उत्पादकांना परकीय उत्पादकांच्या स्पर्धेपासून संरक्षण देण्यात आले होते. परंतु १९९१ नंतर भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला ज्यामध्ये भारताच्या उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण यांचा समावेश आहे. भारतात खऱ्या अर्थाने परकीय गुंतवणुकीला चालना १९९१ नंतरच मिळाली. भारत आज परकीय गुंतवणुकीचे एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे. सध्या भारताकडे मोठ्या प्रमाणात परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक आकर्षित होत आहे.

विदेशी गुंतवणूक ही दोन मार्गाने होत असते. एक देयता निर्माण करणारे भांडवल ज्यात अनिवासी भारतीयांच्या ठेवी (NRI) व विदेशी कर्ज याचा समावेश होतो. दुसरे देयता निर्माण न करणारे भांडवल यामध्ये परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI) व परकीय संस्थात्मक गुंतवणूक (FII) याचा समावेश होतो. FDI व FII यामध्ये सुध्दा फरक आहे. परकीय संस्थात्मक गुंतवणूक ही शेअर मार्केट मध्ये केली जाते. त्यामुळे प्रत्यक्षात उत्पादनात वाढ होत नाही. मात्र परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीमुळे प्रत्यक्षात उत्पादनात वाढ होते.

## परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीत भारताचे स्थान:

भारत सध्या परकीय गुंतवणुकीचे महत्त्वाचे एक स्थान बनले आहे. साधारणपणे विकसित देशापेक्षा विकसनशील देशामध्ये परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीचे प्रमाण कमी आहे. दक्षिण, पूर्व आणि दक्षिण-पूर्व आशियामध्ये चीन देशाचा सर्वाधिक FDI चा आंतर्प्रवाह २००४ मध्ये ६०६३० मिलीयन डॉलर्स वरुन २००६ मध्ये ६९४६८ मि. डॉलर्स पर्यंत वाढ झाली आहे. भारतात FDI चा अंतर्प्रवाह २००४ मध्ये ५७७१ मि.डॉलर्स वरुन २००६ मध्ये १६८८१ मि. डॉलर्स पर्यंत वाढ झाली. तसेच बाह्यप्रवाह २१७९ मि. डॉलर्स वरुन ९६७६ मि. डॉलर्स पर्यंत वाढ झाली आहे. ही वाढ जवळपास तीन पटीने झाली आहे. सिंगापूर देशामध्ये २००६ मध्ये FDI चा आंतर्प्रवाह २४,२०७ मिलियन डॉलर आहे. तर बाह्यप्रवाह २००६ मध्ये ८,६२६ मिलियन डॉलर झाला आहे. विकसित देशापेक्षा विकसनशील देशातून FDI जास्त प्रमाणात बाहेर जात नाही. कारण एवढे भांडवल या देशाकडे नसते. यावरुन असे दिसून येते की, दक्षिण, पूर्व व दक्षिण-पूर्व आशियामध्ये सर्वाधिक FDI चा आतंर्प्रवाहामध्ये चीन देशाचा प्रथम क्रमांक लागतो. त्यानंतर सिंगापूर आणि भारताचा क्रमांक आहे. आशियामध्ये मध्ये भारताचा तिसरा क्रमांक आहे.

## भारतातील परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक:

दक्षिण-पूर्व आशियाखंडामध्ये होणाऱ्या परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीमध्ये भारताचा तिसरा क्रमांक आहे. त्यामुळे भारत परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीसाठी एक महत्वाचे केंद्र आहे.

भारतात १९९१ नंतर नवीन आर्थिक धोरणात भारतीय अर्थव्यवस्था खुली करण्यात आली. त्यामुळे परकीयांसाठी आपले दारे खुली झाली. या धोरणात्मक बदलामुळे जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाची सुरुवात झाली. त्यामुळे १९९१ नंतर भारतात FDI चा प्रवाह मोठ्या प्रमाणात वाढला आहे. १९८५-९५ मध्ये ०.४५५ अब्ज डॉलर्स वरुन २००८-०९ मध्ये ३५.१५८ अब्ज डॉलर्स पर्यंत वाढ झाली आहे. १९९१ नंतरच्या आर्थिक विकासात परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीचा फार मोठा वाटा आहे. भारताच्या आर्थिक विकासात परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतात सातत्याने FDI चा ओघ वाढत आहे. आशिया खंडात भारत FDI चे महत्त्वाचे केंद्र बनला आहे.

## भारतात सर्वाधिक परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक करणारे देश:

१९९१ नंतर भारताच्या उदार नीतीमुळे भारतात FDI चा प्रवाह मोठ्या प्रमाणात वाढला. भारतात परकीय गुंतवणुकीसाठी आवश्यक असणारे वातावरण ज्यामध्ये राजकीय स्थैर्य, आर्थिक स्थैर्य, गुंतवणूकीवरील परतावा इ. अत्यंत चांगले आहे. भारतात १९९१ -२००७ या काळात सर्वाधिक परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक मॉरीशस देशाने १८,१४६.८१ मिलियन डॉलर्स केले आहे. भारतातील एकूण FDI च्या हे प्रमाण ४१.२४% एवढे आहे. इतर देशाच्या तुलनेत हे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यानंतर अमेरिका ५,८९३.९१ मिलियन डॉलर्स (१२.७८%) व यु.के. ३,८५७.२५ मिलियन डॉलर्स (६.६८%), नेदरलॅन्ड २६३७.८६ (५.९७%), जपान ४.८५%, जर्मनी ३.६८%, सिंगापूर ३.६७%, फ्रान्स १.९६%, दक्षिण कोरिया १.६६ आणि स्विर्त्झलॅन्ड १.५०% FDI भारतात केली जाते. वरील १० देश मिळून एकूण FDI मध्ये या देशांचा हिस्सा ८३.९९% आहे. त्यामुळे या दहा देशातून भारतात फार मोठ्या प्रमाणात परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक केली जाते. मॉरीशस मार्गे भारतात सर्वाधिक FDI केली जाते याचे महत्त्वाचे कारण असे की, मॉरीशस देशातील उदार करधोरणामुळे त्याला "टैक्स हेवन" म्हटले जाते. अनेक गुंतवणुकदार आपली गुंतवणूक कर वाचविण्यासाठी मॉरीशसमार्गे भारतात गुंतवणूक करतात.

## भारतात राज्यनिहाय होणारी परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक:

भारतात FDI मोठ्या प्रमाणात होत असली तरीही राज्यनिहाय त्याचे प्रमाण असमतोल आहे. त्यामुळे भारतातील सर्व राज्यांचा समतोल आर्थिक विकास झालेला नाही. काही राज्यांचा मोठ्या प्रमाणात आर्थिक विकास झाला आहे, मात्र काही राज्यांचा विकास झालेला नाही. पुढील तक्त्यात भारतातील सर्वाधिक FDI आकर्षित करणाऱ्या प्रथम पाच राज्यांची सूची दाखविली आहे.

## प्रादेशिक कार्यालयनिहाय FDI चा प्रवाह

(कोटी रुपये)

| | RBI चे प्रादेशिक कार्यालय | अंतर्गत राज्य | २००८-०९ FDI | % एकूण FDI |
|---|---|---|---|---|
| १. | मुंबई | महाराष्ट्र, दादर, नगर हवेली,दीव, दमण | १७८,६७९.० | ३५% |
| २. | नवी दिल्ली | दिल्ली, यूपीचा काही भाग व हरयाणा | ६६,६५६.४ | १३% |
| ३. | चेन्नई | तामिळनाडू, पाँडेचरी | ४३,२८५.९ | ८% |
| ४. | बंगळूरू | कर्नाटक | ४२,१४०.८ | ८% |
| ५. | हैदराबाद | आंध्रप्रदेश | ३७,०६९.९ | ७% |

Source: SIA News letter (August 2008, Page 3)

वरील तक्त्यात RBI च्या प्रादेशिक कार्यालयनिहाय प्रथम पाच कार्यालयातील FDI चा प्रवाह दाखविला आहे. मुंबई या प्रादेशिक कार्यालयांतर्गत (महाराष्ट्र, दादर, नगर हवेली, दीव दमण) एकूण FDI च्या ३५% होते. भारतात सर्वाधिक FDI या कार्यालयांतर्गत राज्यांमध्ये होते. ज्यात महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे. म्हणून भारतात महाराष्ट्र राज्य सर्वाधिक FDI आकर्षित करणारे राज्य आहे. मात्र सध्या हा प्रवाह गुजरातमध्ये वाढत आहे. मुंबई नंतर दिल्ली, चेन्नई, बंगळूरू व हैदराबाद RBI च्या कार्यालयांचा समावेश होतो. यावरून असे दिसते की, भारतात समतोल प्रमाणात परकीय गुंतवणूकीचे वितरण न झाल्युळे प्रादेशिक विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येते.

### निष्कर्ष आणि शिफारसी:

१९९१ नंतर FDI चा प्रवाह भारतात वाढल्यामुळे भारताची निर्यात देखील मोठ्या प्रमाणात वाढली आहे. म्हणून भारतात भविष्यात अधिक FDI होण्यासाठी गुंतवणुकीला अनुकूल वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. नुकताच 'प्राईस वॉटर हाऊस कुपर्स' या जागतिक स्तरावरील संस्थेने जगातल्या गुंतवणूक योग्य देशाचा एक सर्व्हे केला होता. त्यामध्ये गुंतवणूक करण्यासाठी योग्य असलेल्या २० देशांची निवड करण्यात आली आहे. या २० देशांमध्ये भारताचा गुंतवणूक योग्य देश म्हणून चौथा क्रमांक लागतो. त्यामुळे जागतिक स्तरावर भारत गुंतवणूकीचे महत्वाचे केंद्र बनले आहे. सध्या जगात 'ब्रिक' (BRIC) ब्राझील, रशिया, इंडिया व चीन या देशाचा समावेश आहे. आर्थिक विकास, गुंतवणूक, रोजगार, निर्यात यामध्ये 'ब्रिक' देशात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. खुल्या आर्थिक धोरणामुळे व पायाभुत सुविधांची

सुधारलेली गुणवत्ता यामुळे परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक भारताकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहे. सध्या रिटेल क्षेत्रात देखील FDI येऊ घातली आहे. मात्र यामुळे भारतातील लाखो किरकोळ व्यापाऱ्यांच्या पोटावर पाय पडणार आहे. त्यामुळे FDI ला परवानगी देताना राज्यकर्त्यांनी विकासात्मक दृष्टीकोन ठेवणे आवश्यक आहे. FDI मुळे विदेशी तंत्रज्ञान, रोजगार, निर्यात, पायाभूत सुविधा, परकीय चलनाची गंगाजळी इ.मध्ये वाढ होते. मात्र दुसरीकडे भारतात मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता वाढत आहे. त्यासाठी प्रादेशिक समता निर्माण करणे आवश्यक आहे. भविष्यात FDI ही मागास राज्यात करण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. तरच त्या राज्यांचा विकास होऊन भारतातील आर्थिक मागासलेपणाचा अनुशेष भरून निघू शकतो. यासाठी राजकीय इच्छाशक्ती महत्त्वाची आहे. यातून भारताची वाटचाल अर्थिक महासत्तेकडे होऊ शकते.

## संदर्भ :


1. Suri, Niti (2004), *Foreign Direct investiment global and Indian Aspects*, New Century publicaions.
2. Chopra Chanchal (2003), *Foreign Direct Investment in India*, Deep & Deep Publications, New Delhi.
3. Shrivastav S., *What is the true level of FDI flows to India?* EPW Feb.15, 2003.
4. *World Investment Report 2007*.
5. Arvind Virmani (April 2004) *Foreign Investment Reform ICRIER*, New Delhi.
6. *Economic Survey of India* - 2009-10, 2010-11
7. *RBI Monthly Bulletin*, June - 2009.
8. Sept (2006), *International Conference 'FDI and Globalisation in India'* Francoise Hay University of Rennes.
9. FICCI's FDI survey - 2004
10. *SIA Newsletter*, August 2008.
11. *SIA statistics various issue*.
12. www.finance india.mart.com
13. www.dipp.gov.in

# भारतीय बँकिंग क्षेत्र

निरगुडे आय. ए., श्रीरामपूर
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
आर.बी.एन.बी.कॉलेज
जिल्हा: अहमदनगर
आजीव सभासद क्र. १०७५
भ्रमणध्वनी: ८८८८६५०२१७

## प्रस्तावना:

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात बँकिंग क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व असते. भारताच्या आर्थिक विकासात तर बँकिंग क्षेत्राला अधिक महत्त्व आहे. त्यासाठी बँकिंग क्षेत्राचाही विकास व्हावा लागतो. प्रस्तुत शोध निबंधात बँकिंग क्षेत्राच्या विकासाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. भारतात बँक व्यवसायाचा उगम फार पूर्वीच्या काळात झाल्याचे दिसून येते. पूर्वीच्या काळी सावकार व सराफी पेढीवाले गरजू लोकांना कर्जपुरवठा करत असत. यापैकी सावकार हे फक्त कर्जे देत असत. सराफी पेढीवाले मात्र कर्ज देण्याबरोबरच ठेवी स्वीकारणे व हुंड्यांचे व्यवहार करीत असत. असे असले तरी बँक व्यवसाय संघटित स्वरुपाचा नव्हता.

## स्वातंत्र्यपूर्व काळ:

१७७० मध्ये कलकत्ता येथे हिंदुस्थान बँक या पहिल्या आधुनिक बँकेची स्थापना झाली. परंतु १८३२ मध्ये ही बँक बंद पडली. त्यानंतर १८०६ मध्ये 'बँक ऑफ बेंगाल' या पहिल्या इलाखा बँकेची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १८४० मध्ये 'बँक ऑफ बॉम्बे' व १८४३ मध्ये 'बँक ऑफ मद्रास' या दोन इलाखा बँकांची स्थापना करण्यात आली. १९२१ मध्ये या तीन इलाखा बँकांचे एकत्रीकरण करुन इंपिरियल बँकेची स्थापना करण्यात आली. १९३५ पर्यंत इंपिरियल बँक मध्यवर्ती बँकेची बरीच कार्ये करीत असे.

## स्वातंत्र्योत्तर काळ:

स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक संयुक्त भांडवली बँकांची स्थापना करण्यात आली. अपुरे भांडवल, सट्टेबाजीच्या व्यवहारांना मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा, सदोष व्यवस्थापन, बँकिंगच्या तत्वाचे पालन न करणे या व इतर कारणांमुळे अनेक बँका बुडाल्या. या पार्श्वभूमीवर १९४८ मध्ये बँक व्यवसाय नियमन कायदा करण्यात आला. हा कायदा १९४९ पासून लागू करण्यात आला. या कायद्यानुसार रिझर्व्ह बँकेला व्यापक अधिकार. देण्यात आले. स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी बहुतेक बँका व त्यांच्या शाखा शहरी भागातच होत्या. त्यामुळे त्या ग्रामीण भागातील लोकांपर्यंत पोहोचू शकत नव्हत्या. भारत हा कृषीप्रधान देश असूनही व देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्यसाधारण महत्त्व असतानाही बँक क्षेत्राकडून या क्षेत्राला मदत केली जात नव्हती. १९०४ च्या सहकार कायद्यानुसार भारतात शेतीला कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी बँकांची स्थापना करण्यात आली.

१९५५ मध्ये इंपिरियल बँकेचे राष्ट्रीयीकरण करुन स्टेट बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. १९५९ मध्ये भारत सरकारने पूर्वीच्या विविध संस्थानातील ८ बँकांचे राष्ट्रीयीकरण करुन त्या स्टेट बँकेशी संलग्न केल्या. म्हणून त्यांना स्टेट बँकेच्या सहाय्यक बँक असे म्हटले जाते. नंतर काही बँकांचे विलिनीकरण करण्यात आले. त्यामुळे सहाय्यक बँकांची संख्या सद्या ५ इतकी आहे.

## व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण:

१९ जूलै १९६९ रोजी सरकारने ज्या बँकांच्या ठेवी रु. ५० कोटीपेक्षा अधिक होत्या अशा १४ मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. ग्रामीण भागात शाखा विस्तार करणे, अग्रक्रम क्षेत्राला कर्जपुरवठा करणे, प्रादेशिक असमतोल दुर करणे या उद्देशाने सरकारने बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. १९८० मध्ये सरकारने ज्या बँकांच्या ठेवी रु. २०० कोटी पेक्षा अधिक होत्या, अशा ६ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यामुळे राष्ट्रीयीकृत बँकांची संखया २० इतकी झाली. १९९३ मध्ये न्यू बँक ऑफ इंडियाचे पंजाब नॅशनल बँकेत विलिनीकरण करण्यात आले. त्यामुळे राष्ट्रीयीकृत बँकांची संख्या १९ इतकी झाली. २००५ मध्ये आय.डी.बी.आय. चे विलीनीकरण आय.डी.बी.आय. बँकेमध्ये करण्यात आले. त्यामूळे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांत एका बँकेची भर पडली.

## अनुसूचित बँका

रिझर्व्ह बँक कायदा १९३४ नुसार भारतातील बँकांची विभागणी अनुसूचित व बिगर अनुसूचित बँका अशी केली जाते. ज्या बँकांचा समावेश रिझर्व्ह बँक कायदा १९३४ च्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये करण्यात आला आहे. त्यांना अनुसूचित बँका असे म्हणतात. अनुसूचीमध्ये समावेश होण्यासाठी बँकांनी काही निकष पूर्ण करावे लागतात. या बँकांना रिझर्व्ह बँकेकडून काही सुविधा मिळतात.

राष्ट्रीयीकरणानंतर देशातील व्यापारी बँकांनी मोठ्या प्रमाणात शाखा विस्ताराचा कार्यक्रम हाती घेतल्याचे दिसून येते. त्यातही ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात शाखा उघडल्याचे पुढील कोष्टकावरुन दिसून येते.

तक्ता क्र. १

अनुसूचित व्यापारी बँकांच्या शाखा (मार्च २०११ अखेर)

| बँकेचे नाव | शाखा | | |
|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | एकूण |
| अनुसूचित व्यापारी बँका | २१,७०५ | ५२,४२५ | ७४,१३० |
| अ) सार्वजनिक क्षेत्रातील बँका | २०,३८७ | ४१,८२४ | ६२,२११ |
| राष्ट्रीयीकृत बँका (२०) | १४,१८५ | ३०,११३ | ४४,२९८ |
| स्टेट बँक समुह (६) | ६,२०२ | ११,७१२ | १७,९१३ |
| ब) खाजगी क्षेत्रातील बँका | १,३११ | १०,२९१ | ११,६०२ |
| जून्या खाजगी बँका (१४) | ७६४ | ४,०५३ | ४,८१७ |
| नवीन खाजगी बँका (७) | ५४७ | ६,२३८ | ६,७८५ |
| क) परकिय बँका (३६) | ७ | ३१० | ३१७ |

*(संदर्भ: RBI Bulletin - Dec 2011)*

वरील तक्त्यावरुन सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी व त्यातही स्टेट बँक व तिच्या सहाय्यक बँकांनी ग्रामीण भागात अधिक शाखा उघडल्याचे दिसून येते. १९६९ नंतर बँकांनी मोठ्या प्रमाणात शाखा विस्ताराचा कार्यक्रम हाती घेतल्यामुळे १९६९ मध्ये ६५००० लोकांमागे एक बँक असे जे प्रमाण होते ते २०१०-११ मध्ये १३४६६ इतके झाले.

शाखा विस्ताराबरोबरच ठेवी गोळा करणे, कर्जपुरवठा त्यातही अग्रकम क्षेत्राला कर्जपुरवठा व इतरही अनेक बाबतीत बँकांनी नेत्रदीपक अशी प्रगती केल्याचे दिसून येते. असे असले तरी ८० च्या दशकात भारतीय बँकिंग क्षेत्रात काही दोष निर्माण झाले होते, ते म्हणजे बँकांच्या कार्यपध्दतीत अकार्यक्षमता, अपुरा भांडवलाचा पाया, कमी लाभप्रदता, असमाधानकारक ग्राहक सेवा इत्यादीमुळे काही बँका तोट्यात होत्या.

## बँकींग क्षेत्रातील सुधारणा -

१९९१ मध्ये नेमलेल्या नरसिंहम समितीने बँकिंग क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी अनेक शिफारशी केल्या. त्यात १) वैधानिक रोखता प्रमाण (SLR) व रोख निधी प्रमाण (CRR) कमी करणे. २) व्यवसाय स्वातंत्र्य ३) बँकांची स्पर्धाशक्ती वाढविणे ४) काही बँकांचे एकत्रीकरण व विलिनीकरण ५) कर्ज वसुली

१९९६ मध्ये नरसिंहम यांच्याच अध्यक्षतेखाली दुसरी समिती नेमण्यात आली. समितीने आपला अहवाल १९९८ मध्ये सादर

केला. त्यात बँकिंग क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी पुढील शिफारशी केल्या:

१) लहान आणि स्थानिक बँकांची निर्मिती
२) भांडवल पर्याप्तता गुणोत्तर राखणे.
३) प्रचलित बँक कायद्याचे पुनर्विलोकन

बँकिंग क्षेत्रातील सुधारणामुळे भारतीय बँकिंग क्षेत्रात अनेक आमूलाग्र बदल झाले आहेत. बँकांच्या कार्यपध्दतीत पारदर्शकता आली. त्यांच्यात स्पर्धा वाढण्यास मदत झाली. त्यातूनच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर बँकिंग क्षेत्रात करण्यात येऊ लागला आहे. त्यामुळे परंपरागत बँकिंग सेवा जास्तीत जास्त अत्याधुनिक पध्दतीने देणे शक्य होऊ लागले आहे. यातूनच ए.टी.एम. ची सेवा असो किंवा टेलीबँकिंग, इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर, कोअर बँकिंग, नेट बँकिंग इत्यादी सेवा उपलब्ध होऊ लागल्या आहेत. तसेच क्रेडिट कार्डस्, डेबिट कार्डस्, स्मार्ट कार्डस्, इत्यादींचा बँकिंग क्षेत्रात प्रवेश झाला.

### वित्तीय समावेशन (Finacial Inclusion)

अलिकडे रिझर्व्ह बँक वित्तीय समावेशन याला सर्वाधिक प्राधान्य देते. यात ज्या घटकांना किंवा क्षेत्राला बँकेच्या सेवा उपलब्ध झालेल्या नाहीत, त्यांना त्या सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात. रिझर्व्ह बँकेने यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत.

१) ज्या ठिकाणी बँकेची अजिबात शाखा नाही अशा ठिकाणी शाखा उघडणे. २०१०-११ मध्ये अशा ४७० शाखा उघडण्यात आल्या आहेत.
२) ATM द्वारे बँकेच्या सेवा उपलब्ध करुन देणे. मार्च २०११ अखेर अनुसूचित व्यापारी बँकांनी ७४५०५ ATM सुरु केले आहेत. त्यामुळे २००९-१० मध्ये दर ATM मागे १९७०० लोक असे प्रमाण होते ते २०१०-११ मध्ये १६२४३ पर्यंत कमी झाले.
३) बँक सेवांच्या उपलब्धतेच्या बाबतीत असलेली प्रादेशिक विषमता कमी करण्यावर भर दिला जात आहे.
४) स्वयं सहाय्यता गटाद्वारे वित्त पुरवठा उपलब्ध करुन देण्यावर भर दिला जात आहे.

### निष्कर्ष:

भारतीय बँकिंग क्षेत्रात अलिकडील काळात अनेक आमूलाग्र बदल झाले आहेत. बँकिंग क्षेत्रात संगणक, माहिती तंत्रज्ञान व इतर आधुनिक तंत्राचा वापर केला जात असल्यामुळे वित्तीय सेवा जलदगतीने उपलब्ध होऊ लागल्या आहेत. एवढेच नव्हे तर अनेक वित्तीय सेवांचा खर्चही कमी झाला आहे. भारतीय बँकिंग क्षेत्रातील आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे देशांतर्गत व परदेशी संस्थामध्ये वित्तीय सेवा पुरविण्याच्या बाबतीत स्पर्धा वाढलेली आहे.

### संदर्भ:


1) *Money Banking, International Trade and public Finance* - M. L. Jhingan

२) *पैसा आणि वित्तीय रचना* - डॉ. सी. जे. जोशी, ए. सी. जोशी

३) *भारतीय अर्थव्यवस्था* - रंजन कोळंबे

4) *Financial Institutions and markets - structure, Growth innorations* - L. M. Bhole

5) *Indian Economy* - Datt & Sundharam

6) *Indian Economy* - Pratiyogita Darpan

7) *Banking System in India* - S. M. Jawed Akhtar, Md. Shabbir Alam

8) *Report on Trend and progress of Banking in India* 2010-11- supplement to RBI bulletin Dec. 2011

9) *International Journal of Management and Economics* - March - 2012

# नवीन आर्थिक धोरणाचे द्विदशक

माधुरी प्रदीप लेले, नागपूर
सहाय्यक प्राध्यापक
बिंझाणी नगर महाविद्यालय
आजीव सदस्य क्र.७०५
भ्रमणध्वनी: ९४२३४०५०९७

---

प्रास्ताविक:

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताचे धोरण ठरवितांना जगात अस्तित्वात असलेल्या भांडवलवाद की साम्यवाद यापैकी कोणत्या अर्थव्यवस्थेची निवड करावी असा प्रश्न तत्कालीन राज्यकर्त्यांपुढे उभा राहिला. परंतु भारताचे द्रष्टये पंतप्रधान पंडीत नेहरू आणि त्यांचे सहकारी यांनी या दोन आर्थिक प्रणालीत सुवर्णमध्य साधत 'मिश्र अर्थव्यवस्था' स्वीकारली. 'कल्याणकारी राज्याची' संकल्पना स्वीकारल्यामुळे भांडवलवादापेक्षा समाजवादाकडे झुकलेली आर्थिक धोरणे अंगीकारली.

एकीकडे भरमसाठ वाढत चाललेली लोकसंख्या तर दुसरीकडे रोजगार संधीची कमतरता, यातून निर्माण झालेले बेकारी आणि दारिद्रयाचे दुष्टचक्र, एम. आर.टी.पी. सारख्या कायदयामुळे उद्योगांच्या विस्तारावर मर्यादा, उत्पादन कमी आणि मागणी अधिक यातून किंमतवाढ, भ्रष्टाचार, काळाबाजार आणि नफेखोरी यासाख्या अनिष्ट प्रथा, सतत तोटयात चालणारे सार्वजनिक उद्योग, आर्थिक विकासासाठी शासनाने घेतलेले देशविदेशातील भरमसाठ कर्ज व त्यावरील व्याज या सर्वांचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर पडल्याशिवाय कसा राहिल ? भारताची आर्थिक परिस्थिती खालावली. १९९१ मध्ये भारत जगातील १६० देशांपैकी २० वा गरीब देश म्हणून गणला गेला. कर्जबाजारीपणात भारताचा तिसरा क्रमांक आला. तर मानवी विकास निर्देशांकात १२३ व्या क्रमांकावर आला. विदेशी चलनाचा साठा तर केवळ एका आठवड्याच्या आयातीएवढा शिल्लक होता. ६७ टन सोने आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीला विकण्याची नामुष्की भारतावर आली.

नविन आर्थिक धोरण - या सर्व परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आणि त्याचवेळी जागतिक बलाढ्य, प्रगत देश व जागतिक वित्तीय संस्थांचा आलेला वाढता दबाव यामुळे भारताने नविन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला.

त्याशिवाय भारताजवळ दुसरा पर्यायही उपलब्ध नव्हता.

जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार 'मुक्त अर्थव्यवस्थेचा' स्वीकार भारताने केला. शासनाचा कमीत कमी हस्तक्षेप ही नविन आर्थिक धोरणाची आवश्यक अट होती उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या त्रिसुत्रींवर हे धोरण आधारित होते. एक मुक्त आर्थिक धोरण ज्यात विदेशी गुंतवणुकीला परवानगी, जागतिक वित्तसंस्थाकडून कर्ज घेण्याची मुभा, रूपयाचे अवमूल्यन व रूपयाची परिवर्तनीयता, भांडवल बाजारात वाढ इत्यादींचा समावेश होता.

## नविन आर्थिक धोरणाचे परिणाम :

या नवीन आर्थिक धोरणाच्या स्वीकृतीमुळे विदेशी कंपन्यांचे भारतात आगमन झाले. आयातीवरील निर्बंध कमी झाले. कामगार संघटनांचा विरोध मोडून कामगार कायदे पुन: नव्याने करण्यात आले. हे कायदे बहुतेक मालकांच्या बाजूचे होते शेतकरी व सामान्य नागरिकांना देण्यात येणाऱ्या सबसिडीज् कमी करण्यात आल्या. एम.आर.टी.पी. सारख्या मक्तेदारीच्या व FERA सारख्या विदेशी विनिमयाच्या बाबतीत असणारे कायदे रद्द झाले. लघुउद्योग व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना असणारे संरक्षण कमी करून हे उद्योग खुले करण्यास सुरूवात झाली.

## अनुकूल परिणाम:

नवीन आर्थिक धोरणामुळे आतापर्यंत बंदिस्त असलेली अर्थव्यवस्था गतिमान झाली. राष्ट्रीय उत्पन्नात भरघोस वाढ झाली. स्वातंत्र्यापासून १.२५ टक्के ते ३ टक्के असणारा विकासदर गेल्या वीस वर्षात ९ टक्क्यापर्यंत वाढला. २००८ मध्ये उद्‌भवलेल्या जागतिक महामंदीचा परिणाम देखील भारतीय अर्थव्यवस्थेवर फार गंभीर स्वरूपाचा व दीर्घकाळ झाला नाही.

भारत हे विदेशी गुंतवणुकदारांसाठी आकर्षणाचे केंद्र झाले. भारताची विदेशी विनिमयाची गंगाजळी २००८-०९ मध्ये ३२५ अब्ज डॉलर्स पर्यंत पोहोचली. विदेशी चलन साठ्याच्या बाबतीत भारताचा जगात पाचवा क्रमांक लागतो. सेवा क्षेत्राच्या बाबतीत तर भारताने गरूडभरारी घेतली. भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी ५५ टक्के उत्पन्न सेवाक्षेत्रातून मिळू लागले. वाहतूक आणि दळणवळण, विमा, बँका, रस्ते, विज निर्मिती इत्यादींचा पुरेशा प्रमाणात विकास झाला. पायाभूत सोयीसुविधा क्षेत्रातही खाजगी क्षेत्राला सहभाग दिल्यामुळे त्यांचा झपाट्याने विकास झाला. उपभोग्य व चैनीच्या उत्तमोत्तम वस्तूंची आयात सहजशक्य झाली, त्यामुळे जीवनमान उंचावले. विदेशी भांडवलासोबत विदेशी तंत्रज्ञानदेखील आले.

## प्रतिकुल परिणाम:

सर्व बाजूंनी विकासाच्या नवनवीन संधी निर्माण झाल्या. आर्थिक विकासाचा दर चांगला वाढला हे जरी खरे असले तरी खरच भारताचा सर्वांगिण विकास, समतोल विकास झाला का? भारतात १९९१ पूर्वी असलेल्या सर्व समस्यांना, प्रश्नांना अनुकूल उत्तरे मिळालीत का ? ह्या प्रश्नाचे उत्तर शोधणे देखील तेवढेच गरजेचे आहे.

२०१० मध्ये जागतिक स्तरावर काढलेल्या 'मानवी विकास निर्देशांकात भारताचा

१७९ देशात १२४ वा क्रमांक लागला. नविन आर्थिक धोरणामुळे भारतीय आर्थिक विकासाचा वेग वाढत असला तरी अनेक क्षेत्र चिंता करण्याचे विषय आहेत.

१) मुळातच भारताने १९९१ ला नविन आर्थिक विकासाच्या धोरणाचा स्वीकार नाइलाजास्तव केला होता. जागतिक वित्तीय संस्था आणि प्रगत, विकसित देशांच्या दबावाखाली आल्यामुळे आणि देशाची आर्थिक परिस्थिती डबघाईला आल्यामुळे अगतिकतेने नविन आर्थिक धोरणाचा स्वीकार भारताला करावा लागला. त्यामुळे या धोरणाचे दूरगामी परिणाम काय होतील किंवा या धोरणामुळे अर्थव्यवस्थेत उद्‌भवलेल्या सर्व समस्यांवर रामबाण उपाय सापडतील की नाही याची शहानिशा कोणीच केली नाही किंवा त्यावर गांभीर्याने चर्चाही झाली नाही. फारच घाईघाईने निर्णय घेण्यात आला. याउलट चीनने मात्र याबाबतीत अतिशय विचारपूर्वक W.T.O. च्या करारात प्रवेश केला.

२) जागतिकीकरणानंतरच्या २० वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल समाजवादाकडून भांडवलशाहीकडे झाली. त्यामुळे भांडवलशाहीचे दोष आपोआपच अर्थव्यवस्थेत शिरले. मुक्त अर्थव्यवस्था, खाजगीकरणाचा वाढता प्रभाव, निर्गुंतवणुकीचे धोरण, प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक या नावाखाली शासनातील मंत्री, उद्योजक व कर्मचारी यांच्यात संगनमताने भ्रष्टाचाराचे सत्र फार मोठ्या प्रमाणात सुरू झाले आहे. टू जी स्पेट्रम, आदर्श, लवासा ही सारी घोटाळ्यांची प्रकरणे म्हणजे हिमनगाचे टोक आहे.

समाजवादामुळे अर्थव्यवस्था बंदीस्त किंवा तुंबलेली होती अशी टीका करणाऱ्यांना ही भांडवलशाही अपेक्षित होती का ? साम्यवाद, समाजवाद किंवा भांडवलवाद कोणतीही अर्थव्यवस्था असली तरी 'आदर्श' परिस्थिती निर्माण करणे शासनाच्या प्रामाणिकपणावर, पारदर्शकतेवर आणि प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून असते.

३) नवीन आर्थिक धोरणामुळे 'उपभोक्तावाद' वाढीस लागला त्याच क्षेत्रात गुंतवणुक देखील वाढली. ग्राहकोपयोगी वस्तू, चैनीच्या वस्तू यांची रेलचेल झाली. विकासाची जी पायाभूत क्षेत्रे आहेत त्यामध्ये विदेशी गुंतवणूक फारशी झालेली दिसत नाही. त्यामुळे चैनीच्या वस्तू भरपूर उपलब्ध झाल्या परंतु ती उपयोगात आणण्यासाठी लागणाऱ्या मुलभूत सोयी मात्र नाहीत अशी अवस्था आहे 'कार' ची संख्या वाढली मात्र रस्ते बदलले नाही वीजेची उपकरणे भरमसाठ आलीत पण वीज भारनियमन देखील वाढले.

४) नविन आर्थिक धोरणात सर्वात दुर्लक्षित राहिलेले क्षेत्र म्हणजे 'कृषि' सर्वात जादा मूल्यवर्धी व रोजगार निर्मिती करणारा, स्वच्छ पर्यावरणाची निर्मिती करणारा 'शेती' हा एकमेव उद्योग आहे. जगातील २४ टक्के शेतकरी भारतात आहेत. अजुनही भारतात २० कोटी रोजगार निर्मिती कृषितून होते. आपल्या देशात कापड निर्माण करणारा, कापड घालणारा कधीच 'आत्महत्या करीत नाही. परंतु कापूस उत्पादक शेतकरी मात्र आत्महत्या करतो. शेती संशोधन, विस्तार, लिखाण, शेतीनिविष्ठा उद्योग, प्रक्रिया उद्योग हे सर्व चांगले चालतात पण शेती व्यवसाय मात्र चालत नाही, असे का ?

५) नविन आर्थिक धोरणामुळे कल्याणकारी राज्य व समाजवादी समाजरचना' या तत्त्वाला हरताळ

फासला आहे. शिक्षण व आरोग्य या मुलभूत समाजजीवनाच्या क्षेत्राकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येत आहे. आर्थिक विकासाचा दर ९ टक्क्यापर्यंत वाढला तरी २०११ च्या जनगणनेनुसार अद्यापही फाउंडेशननुसार निरक्षरतेमुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर १२० अब्ज डॉलर्सचा बोझा पडत आहे तर भारतीय अर्थव्यवस्थेत २६५० अब्ज रूपयांचे नुकसान होत आहे.

बालमृत्यूचे प्रमाण कुपोषणाची समस्या गंभीर स्वरूप धारण करीत आहे.

६) कृषिमालाला योग्य भाव न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये नैराश्याची भावना आहे. एकीकडे अतिसंपन्नता तर दुसरीकडे अतिविपन्नावस्था असा भारत दोन भागात विभागल्या गेला आहे. व्यक्तीगत विषमतेसोबत प्रादेशिक विषमता, उत्पन्न आणि संपत्ती संग्रहणामधील विषमता वाढल्याने समाजात आर्थिक दरी निर्माण झाली आहे. त्यातून नक्षलवाद, दहशतवाद आणि कुटीरतावाद या सामाजिक समस्या जन्माला आल्या आणि प्रसार पावत आहेत.

७) लघु व कुटीर उद्योग, मध्यम आकाराचे उद्योग यांच्याकडे दुर्लक्ष झाल्याने अर्थव्यवस्थेवर दीर्घकालीन परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. तर दुसरीकडे वेगवेगळ्या प्रकारचा कचरा (वेस्ट) निर्माण होण्याची नवीन समस्या अस्तित्वात आली आहे. विकास म्हणजे केवळ उत्पन्न वृध्दी नाही तर सामाजिक विकासामधील सहभाग ही संकल्पना लयास गेली.

८) शासनाची जबाबदारी केवळ दूरस्थ नियंत्रकाची झाल्याने शासनाची कार्यक्षमता ऱ्हास पावत आहे, जबाबदारी झटकण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

नविन आर्थिक धोरणाचा पर्याय स्वीकारल्यानंतर त्या धोरणाचे विश्लेषण करतांना या सर्व मुद्यांचा विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. कोणत्याही देशाच्या संदर्भात वीस वर्षांचा कालावधी फार मोठा नसला तरी स्वीकारलेल्या एखाद्या आर्थिक धोरणाची दिशा आणि गती यांचा आढावा घेण्यासाठी हा कालावधी नक्कीच पुरेसा आहे. देशातील राज्यकर्ते आणि विचारवंत, अर्थतज्ज्ञ यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन विचारमंथन करण्याची गरज आहे, एवढे मात्र खरे.

संदर्भ:


१) *दै.लोकमत,* दि.२४.७.२०११

२) *व्यावसायिक पर्यावरण,* बोधनकर, चव्हाण

३) *अर्थसंवाद,* एप्रिल-जून २०११

४) *अर्थसंवाद,* जानेवारी-मार्च २०१२

५) *दै.लोकमत,* दि.१६ एप्रिल २०१२

६) महाराष्ट्र टाईम्स, दिनांक १५ एप्रिल २०१२

७) इंटरनेट

# भारतातील अन्नसुरक्षाः सद्यस्थिती


दिनकर टकले, परतुर
अर्थशास्त्र विभागप्रमुख
लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, ज़ि.जालना
आजीव सभासद क्र.९२०
भ्रमणध्वनी: ९४२१३२२६१५


## प्रास्ताविक:

भारतासारख्या वाढत्या लोकसंख्येच्या देशात अन्न सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. देशातील सर्व लोकांना अन्नधान्य उपलब्ध करुन देणे सरकारचे कर्तव्य आहे. देशातील कुपोषण व भुकबळीची समस्या केवळ अन्न सुरक्षिततेच्या माध्यमातून कमी होऊ शकते. लोकसंख्या वृध्दी व अन्नधान्य उत्पादन वृध्दी यांची सांगड घालून अन्नसुरक्षा धोरण राबविणे महत्त्वाचे आहे. प्रस्तुत लेखात अन्नसुरक्षेची संकल्पना, अन्नसुरक्षा निश्चितीचे घटक, भारतातील अन्नसुरक्षिततेची सद्य:स्थिती, अन्न सुरक्षेच्या समस्या व अन्नसुरक्षा साध्य करण्यासाठी उपाययोजना इत्यादींचा उहापोह केला आहे.

## अन्नसुरक्षा संकल्पना :

अन्नसुरक्षेच्या बाबतीत अनेक तज्ज्ञांनी व्याख्या सांगितल्या आहेत. जागतिक विकास अहवालात *सर्व लोकांना कोणत्याही वेळी उत्कृष्ट व योग्य जीवन जगण्यासाठी पुरेशा प्रमाणात अन्न उपलब्धता असणे म्हणजे अन्नसुरक्षा होय* असे सांगितले आहे. परंतु अन्न व कृषी संघटन (FAO) संस्थेने *लोकांना सक्षम व आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी त्यांच्या अन्नधान्य पसंतीनुसार व आहारानुसार योग्य, सुरक्षित व पोषक अन्नधान्य भौतिक व आर्थिकदृष्टया सर्व कालावधीत पुरविणे म्हणजे अन्न सुरक्षा होय* अशी व्याख्या केली आहे. सारांश, अन्न सुरक्षेसाठी कोणत्याही देशाला त्यांच्या लोकसंख्येसाठी अन्नधान्याची भौतिक मात्रा उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे लोकांना पुरेसे अन्न उपलब्ध होण्यासाठी त्यांची क्रयशक्ती वाढविणे, अन्न दर्जा सुधारणे, उत्पादनात वृध्दी करणे महत्त्वाचे आहे.

### अन्न सुरक्षा निश्चितीचे घटक:

(अ) अन्नधान्याची स्वदेशी मागणी:

कोणत्याही देशाची अन्नसुरक्षा त्या देशाच्या लोकांकडून अन्नधान्याची मागणी किती प्रमाणात होते यावरुन निश्चित होते. भारतात अन्नधान्याची गरज व मागणी यासाठीचे जे अंदाज वर्तविण्यात आले आहेत. यामध्ये बरीच तफावत दिसून येते. मूर्ती व मोहनदास यांनी वर्तविलेल्या अंदाजानुसार व वेगवेगळया पध्दतीनुसार भारतात १७४ ते ३०० मिलियन टन प्रतिवर्षी मागणी होते. इ.स. २०२० साठीचा अंदाज १८८ ते ३५४ मिलियन टन इतका वर्तविण्यात आला आहे. एकंदरीत वाढत्या लोकसंख्येनुसार अन्नधान्याची स्वदेशी मागणी वाढणार हे निश्चित आहे.

(ब) दरडोई उत्पादन व उपलब्धता:

भारतात तृणधान्य व अन्नधान्याची गरज प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दृष्टिकोनातून एकत्र केल्यास जास्त असल्याचे दिसून येते. स्वामीनाथन यांच्या मते, २०२० मध्ये ही गरज २९६.१९ मेट्रीक टन प्रतिवर्ष असेल. त्यामध्ये ८३ टक्के प्रत्यक्ष मागणी व १७ टक्के अप्रत्यक्ष मागणी असेल. दरडोई अन्नधान्य उत्पादन हा घटक अन्न व पोषण सुरक्षेच्या संदर्भात महत्त्वाचा आहे. भारतात दरडोई उत्पादनात होणारी वाढ सातत्यपूर्ण नाही. त्यामुळे अन्न उपलब्धता सुध्दा कमी-जास्त होतांना दिसून येते.

(क) दरडोई उपभोग:

अन्नसुरक्षा दरडोई उपभोगावरुन निश्चित होते. तृणधान्य पिकांसाठी दरडोई उपभोग १९७०-७१ मध्ये घटलेला दिसतो. हा घटता उपभोग १९९० पर्यंत दिसून येतो. मासिक दरडोई उपभोग वृध्दी दर सुध्दा घटल्याचे दिसून येते. याचा परिणाम म्हणून १९९०-९१ च्या काळात दरडोई प्रतिव्यक्ती उष्मांक १९७० कॅलरीज वरुन घटून १५५७ कॅलरीज झाला. अन्न सुरक्षेसाठी दरडोई अन्नधान्य उपभोग वाढणे आवश्यक आहे.

(ड) अन्न उपभोग प्राधान्यक्रमात होणारा बदल:

अन्न व अन्नधान्यावरील उपभोग खर्चाचे प्रमाण घटले तर शरीरासाठी आवश्यक असणाऱ्या कॅलरीज / उष्मांकसुध्दा घटतात. अन्न उपभोगासाठी मागणीचा प्राधान्यक्रम बदलतांना दिसतो. अन्न पसंतीत फळे, भाजीपाला यांचा उपभोग वाढल्याचे दिसते.

### भारतातील अन्नसुरक्षेची सद्य:स्थिती:

भारतासारख्या विकसनशील देशात अन्नसुरक्षा महत्वाची आहे. कुपोषण व उपासमार टाळण्यासाठी अन्नसुरक्षा हा एकमेव उपाय आहे. भारताने स्वातंत्र्य मिळाल्यापासून कृषी विकास धोरणाचे मुख्य तत्त्व म्हणून कुपोषण, उपासमार, अन्न असुरक्षितता व दारिद्र्य कमी करण्याचे निश्चित केल्याचे दिसते. अन्न उपलब्धता आणि स्थैर्य अन्नसुरक्षेसाठी महत्वाचे उपाय आहेत. भारतात अन्नसुरक्षिततेचा विचार करतांना अन्न व्यवस्थापनाची उद्दिष्टे महत्त्वाची ठरतात. अन्नधान्याची किंमत स्थिरता टिकवून ठेवणे, उत्पादकांना प्रेरणा देणे आणि उपभोक्त्यांना अन्नसुरक्षा पुरविणे ही तीन महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. भारताने अन्नसुरक्षेत सुधारणा करण्यासाठी आपल्या नियोजनात अन्न स्वयंपूर्णतेला महत्त्व दिल्याचे दिसून येते. अन्नधान्य साठा वाढवून सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत गरीब लोकांना स्वस्त किंमतीत अन्न पुरविणे हे अन्नसुरक्षेचे महत्त्वाचे धोरण आहे.

तक्ता क्र.१ : भारतातील अन्न उपलब्धता व वितरण

(मिलियन टन)

| वर्ष | तृणधान्य निव्वळ उपलब्धता | डाळ निव्वळ उपलब्धता | निव्वळ अन्नधान्य उपलब्धता | दरडोई प्रतिदिवस अन्नधान्य उपलब्धता (ग्रॅम मध्ये) | सार्वजनिक वितरण | निव्वळ अन्नधान्य उपलब्धतेशी वितरणाचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५१ | ४४.४ | ८.० | ५२.४ | ३९४.९ | ८.० | १५.३ |
| १९९१ | १४५.७ | १२.९ | १५८.६ | ५१०.१ | २०.८ | १३.१ |
| २००१ | १४५.६ | ११.३ | १५६.९ | ४१६.२ | १३.२ | ८.४ |
| २००८ | १६५.९ | १७.६ | १८३.५ | ४३६.० | ३४.७ | १८.९ |
| २००९ | १७३.७ | १५.८ | १८९.५ | ४४४.० | ४१.३ | २१.८ |

*(संदर्भ : India Economic Survey 2010-11)*

तक्ता क्र.१ नुसार भारतामध्ये १९५१ ला एकूण अन्नधान्य उपलब्धता ५२.४ मिलियन टन होती. तर दरडोई प्रतिदिवस अन्न उपलब्धता ३९४.९ ग्रॅम होती. सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे ८.० मेट्रीक टन अन्न वितरित केले. हे प्रमाण एकूण अन्न उपलब्धतेशी १५.३ टक्के होते. २००९ मध्ये अन्नधान्य उपलब्धतेत वाढ होऊन एकूण निव्वळ उपलब्धता १८९.५ मेट्रीक टन झाली. त्याचप्रमाणे दरडोई प्रतिदिवस उपभोग ४४४ ग्रॅम पर्यंत वाढला. एकूण अन्नधान्य उपलब्धतेपैकी २१.८ टक्के अन्न सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे वितरीत झाले.

भारत सरकार अन्न सुरक्षेच्या बाबतीत दक्ष असुन राष्ट्रीय विकास परिषदेच्या ५३ व्या मिटींगमध्ये २००७ ला अन्न सुरक्षा अभियान जाहीर केले. या अंतर्गत गहू, तांदुळ आणि दाळीचे उत्पादन वाढविण्याचे लक्षांक ठरविण्यात आले. भारताने २००७-२००८ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (National Food Security Mission) अमलात आणले आहे.

## भारतातील अन्नसुरक्षिततेच्या समस्या :

जास्त लोकसंख्या असलेल्या तिसऱ्या जगातील राष्ट्रात अन्नसुरक्षा महत्त्वाची आहे. भारतात अन्नसाठा वाढत असला तरी कृषी क्षेत्रात याबाबत सातत्य नाही. त्यामुळे देशाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अन्नधान्याच्या वाढत्या किंमती, उत्पादनातील हंगामी चढ-उतार, वितरण व्यवस्थेतील त्रुटी या समस्या अन्नसुरक्षेच्या संदर्भात महत्त्वाच्या वाटतात. भारतात आजही दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या लोकांची संख्या मोठी आहे. अशा कुटूंबांची क्रयशक्ती कमी असल्यामुळे देशात अन्नसाठा पुरेसा असून सुध्दा या कुटूंबाची अन्न उपलब्धता कमी दिसून येते. अन्नधान्याचा खालावलेला दर्जा, वितरणातील त्रुटी, अन्न साठवणूकीची समस्या, साठेबाजी व सट्टेबाजी, अन्नधान्याची नासाडी इत्यादी प्रमुख समस्या अन्न सुरक्षिततेच्या संदर्भात आव्हान उभ्या करीत आहे.

दारिद्र्य व आर्थिक विषमता, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील त्रूटी अन्नसुरक्षेत अडथळे आणत आहेत. खोटी रेशन कार्ड, धान्याची अपूरी उपलब्धता, नियंत्रण व व्यवस्थापनाचा अभाव व सर्वांना रेशन कार्ड देण्यात आलेले अपयश हया महत्त्वाच्या समस्या अन्नधान्य सार्वजनिक वितरणात दिसून येतात. एकंदरीत भारतात पुरेशा प्रमाणात अन्न उपलब्धता असून सुध्दा कुपोषण व भुकबळी सारख्या समस्या निर्माण होतांना दिसणे म्हणजे अन्नसुरक्षा धोक्यात असल्याचे मानले जाते.

## अन्नसुरक्षा साध्य करण्यासाठी उपाययोजना :

अन्न सुरक्षितता साध्य करण्यासाठी भारत सरकारने प्रभावीपणे व सातत्यपूर्ण प्रयत्न करणे गरजेचे आहे. अन्नधान्य उत्पादन वाढविणे, अन्नधान्य वितरण व्यवस्था सक्षम करुन किंमत स्थैर्य टिकविणे, लोकांना रोजगार उपलब्ध करुन देऊन त्यांची क्रयशक्ती वाढविणे, दारिद्र्य निर्मूलन प्रभावीपणे राबविणे, अन्नधान्य नासाडी कमी करुन अन्न दर्जा सुधारणे महत्वाचे आहे. एकंदरीत अन्न सुरक्षा योजना यशस्वी होण्यासाठी स्वस्त कर्ज पुरवठा, रोजगारवृध्दी, सार्वजनिक वितरणातील अन्नधान्यासाठी अनुदान वृध्दी करणे, अन्नसाठ्यात स्थिरता प्रस्थापित करणे, इत्यादी. उपाययोजना महत्वाच्या आहेत. आज जागतिकीकरणाच्या काळात कुपोषणासारखी समस्या नष्ट करण्यासाठी अन्नसुरक्षा योजना प्रभावी व सक्षमपणे राबवावी. त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती व लोकसहभाग महत्वाचा आहे.

महाराष्ट्र राज्याने ऑगस्ट २०१२ मध्ये नविन अन्नसुरक्षा कायदा लागू केला. नव्या कायद्यानुसार ग्रामीण भागातील किराणा मालाचे दुकानदार, पिठाच्या गिरण्या, शहरातील वडापाव सेंटर, पाणीपुरीवाले इत्यादी सर्वांना नोंदणी बंधनकारक केली आहे. खाद्य व्यावसायिकांनी चांगले, स्वच्छ, निरोगी व दर्जेदार खाद्य विकले पाहिजे याची जबाबदारी संबंधीत व्यावसायिकांवर टाकण्यात आली. विनापरवाना व्यवसाय करणाऱ्यांना किंवा भेसळयुक्त खाद्य विकणाऱ्यांना सहा महिने तुरुंगवासाची तरतुद कायद्यात आहे. सारांश, महाराष्ट्र सरकारने अन्न सुरक्षेसाठी केलेला हा कायदा उपयुक्त असला तरी त्याचे यश प्रशासनातील पुरेशा मनुष्यबळावर अवलंबून आहे.

## संदर्भ :

१. FAO (Food and Agriculture Organisation of the United Nations) 2000C. *The State of Food Insecurity in the World*, 2000, Rome.

२. M. Mohandas (2006), *'Food Security and Food Stock Management,' in K.Rajan (Ed.), 'Indian Economy : The Post Reform scenario,'* Serials Publications, New Delhi, pp. 18-36.

३. Kalamkar S.S. (2009), *'Globalisation, Food Security and Sustainable Agriculture in India'*, Paper presented at the 92nd Indian Economic Association Annual Conference, KIIT University,

Bhubaneshwar, Dec. 27-29.

४. Khan Mohd. Azam (2006), *'Globalisation and Food Security,' in Talwar Sabana (Ed.), Globalisation and WTO,* Serials Publications, New Delhi, pp.70-79.

५. *India Economic Survey* 2010-11.

६. I. Satya Sundarm (2003), *'India's Food Security : Some Issue,' in Dr.L.S.N. Prasad (Ed.),* Indian Economy : Retropect and Prospects, Serials Publications, New Delhi, pp.8-11.

७. आशुतोष रारावीकर (२००३), *भारतातील अन्न सुरक्षितता,* अर्थसंवाद, खंड-२६, अंक-४, जाने-मार्च, पृ.३२७-३३३.

८. Pandiyan M. (2009), *'Globalisation and Food Security in India,'* IEA Annual Conference Volume Part - II, KIIT University, Bhubaneshwar, Dec. 27-29, pp. 573-578.

# विदेश व्यापार- मूल्य, रचना व दिशेतील बदल

**चंद्रकांत बी. माळी,** माणगाव
टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज, जि. रायगड
आजीव सभासद क्र.: १०५०
भ्रमणध्वनी: ९४२११६९६७१

**हिरालाल व्ही. चव्हाण,** जळगाव
विभागप्रमुख, अरुणोदय ज्ञानप्रसारक मंडळाचे
कला, वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालय
आजीव सभासद क्र.: ८३५
भ्रमणध्वनी: ९४२३९१५६४६

---

कोलंबसने अमेरिकेचा शोध लावला आणि वास्को-द-गामाने भारतीय भूमीवर पाय ठेवले. त्यांनी हे शोध लावण्यामागे पाश्चिमात्य विशेषत: ब्रिटन, पोर्तुगाल, फ्रान्स, इ. देशांची व्यापार वाढविण्याची व्यापारी वृत्तीच कारणीभूत होती असे म्हटल्यास चुकीचे ठरत नाही. भारतात ईस्ट इंडिया कंपनी आली आणि भारतावर व्यापार करत असतांना साम्राज्यही स्थापन केले. अनेक देशांचा इतिहास वाचल्यानंतर साम्राज्यवाद आणि व्यापारवाद ह्या दोन बाबींचा संदर्भ लागतो. व्यापार हा केंद्रबिंदू असल्याने साम्राज्य वाढविण्यासाठी व्यापार आणि परस्पर भूमिका पूर्वी घेण्यात आल्याचे दिसून येते. अनेक अविकसीत राष्ट्रे सुरुवातीला विकसित औद्योगिक देशांच्या वसाहती असल्यामुळे त्यांच्यावर सत्ता असणाऱ्या या राष्ट्रांकडून व्यापाराच्या माध्यमातून त्यांचे शोषण करण्यात आले.

दुसऱ्या महायुद्धानंतर बहुतेक राष्ट्रे वसाहतवादातून मुक्त झाले. स्वतंत्र झालेल्या अल्पविकसीत राष्ट्रांचा विदेश व्यापाराकडे बघण्याचा दृष्टीकोन नंतरच्या काळात काहीसा संशयास्पद राहिला आणि विदेश व्यापाराऐवजी देशांतर्गत बाजारपेठांवरच त्यांनी अधिक लक्ष केंद्रित केले. यापैकी अनेक राष्ट्रांनी औद्योगिकरणाचे व्यापक कार्यक्रम हाती घेतले. आयात पर्यायी उत्पादन धोरण, देशांतर्गत उद्योगांना संरक्षण, आयात तसेच विदेशी गुंतवणुकांवर नियंत्रण याप्रमाणे धोरण स्वीकारले. त्यामुळे विविध राष्ट्रांची निर्यात देखील निराशाजनक राहिली.

अर्थात या सर्व परिस्थितीत अलिकडे वेगाने बदल झालेला दिसून येतो.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताने आर्थिक विकास आणि देशाची प्रगती साधण्याच्या दृष्टीने पंचवार्षिक योजना सुरू केल्या. पंचवार्षिक योजनाच्या व्यापक उदिष्टांचा विचार करीत असतानाच भारताच्या विदेशी व्यापाराला चालना देण्याचा दृष्टीकोन समोर ठेवण्यात आला. १९६०च्या दशकात अनेक विकसनशील राष्ट्रांनी आयात उदारीकरण आणि निर्यात प्रोत्साहनाचे धोरण स्विकारले. भारत सरकारने देखील १९९१ मध्ये उदारीकरणाच्या दिशेने पावले उचलून भारतीय अर्थव्यवस्था व्यापार तसेच विविध क्षेत्रात खुली करण्यासाठी व्यापक धोरण स्वीकारले. आंतरराष्ट्रीय व्यापार हा अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचा समष्टी घटक आहे. वृध्दीचे इंजिन म्हणून व्यापाराचा उल्लेख केला जातो. आधुनिक काळात रस्ते, रेल्वे, हवाई व जलवाहतूक यामध्ये अमूलाग्र बदल झाले आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार हे वृद्धीचे इंजिन आहे किंवा नाही ही बाब त्याचे जागतिक व्यापाराशी प्रमाण किंवा मूल्य, रचना व दिशा, व्यापारशर्ती यासारख्या अनेक विदेशी घटकांवर अवलंबून असते.

## भारताच्या विदेश व्यापाराचे मूल्य:

भारताच्या आयात-निर्यात व्यापार मुल्याच्या आधारे भारताच्या विदेश व्यापाराचे मुल्य समजण्यास मदत होते. जागतिक व्यापाराचा संदर्भ भारताच्या अनुषंगाने विचारात घेतल्यास पाहिल्या पंचवार्षिक योजनेपासून भारताच्या विदेश व्यापारात बदल झाल्याचे दिसून येते. भारताच्या आयात-निर्यातीच्या मूल्यात सातत्याने वाढ झाल्याचे दिसून येते.

१९५०-५१ मध्ये भारताचे निर्यातमूल्य ६०६ कोटी रुपये एवढे होते. १९८०-८१ मध्ये त्यात वाढ होऊन ते ६,७११ कोटी रुपये तर २००१-०२ मध्ये २,०९,०१६ कोटी रुपये, आणि २००९-१० मध्ये निर्यात मुल्य ८,४५,५३४ कोटी रुपये एवढे राहिले. याच कालावधीत आयात मुल्य अनुक्रमे ६०८ कोटी रुपये, १२,५४९ कोटी, २,४५,२०० कोटी रुपये आणि १३,६३,७३६ कोटी रुपये याप्रमाणे राहिले.

भारताच्या निर्यात आणि आयात मूल्यात सातत्याने वाढ झाली असली तरी या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे, ती म्हणजे देशाला व्यापारतोलात आयातमूल्य हे निर्यातमूल्यापेक्षा सतत अधिक राहिल्याने तूट सहन करावी लागली आहे. सन १९४९-५० ते २००९-१० या संपूर्ण कालावधीत केवळ १९७२-७३ आणि १९७६-७७ या दोन वर्षात व्यापारशेषामध्ये अनुक्रमे १०४ कोटी रुपये आणि ६८ कोटी रुपये याप्रमाणे अधिक्य राहिल्याचे दिसून येते. व्यापारशेषामधील तूट सातत्याने वाढत जाणे ही लक्षात घेण्यासारखी बाब आहे.

स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) प्रमाणाशी तुलना करता निर्यात व आयात या दोहोंमध्ये वाढ झाली. पण निर्यातीपेक्षा आयातीचे मूल्य म्हणजेच आयात खर्च अधिक राहिला. भारत लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर असलेला व स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा (GDP) विचार करता जगात सातव्या क्रमांकाचा देश आहे. विदेशी व्यापाराच्या बाबतीत मात्र काळाच्या

ओघात भारताची परिस्थिती खालावत आहे. १९५० मध्ये भारताच्या जागतिक व्यापारात १.७ टक्के वाटा होता. १९९० मध्ये त्यात ०.५९ टक्के इतकी घट झाली, तर आज हा वाटा ०.६ पर्यंत स्थिर आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापारात आपला वाटा कमी असल्याने त्यावरून असे स्पष्ट होते की, आपण अनेक बाबतीत तुलनात्मक लाभाचा वापर केलेला नाही. व्यापाराची रचना तयार वस्तू व सेवांकरिता अनुकूल असली तरी जागतिक व्यापारातील वाट्यात सुधारणा होण्याच्या दृष्टीने त्यांची मदत झालेली नाही. आपल्या जागतिक वाट्यात वाढ करण्यासाठी शेती व सेवा अशा दोन क्षेत्रात आपणास फार मोठी संधी आहे. अर्थात गेल्या काही वर्षात शिथिलीकरण व जागतिक व्यापार संघटन (WTO) च्या नवीन वातावरणामुळे विदेशी व्यापाराची GDP शी असलेली वाढ आहे.

### भारताच्या निर्यातीची रचना:

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळेस भारताच्या निर्यातीमध्ये प्राथमिक वस्तूंचा वाटा अधिक होता. चहा, ताग, कापूस यासारख्या शेती वस्तुंची निर्यात मोठ्या प्रमाणात होती व ती एकूण निर्यातीच्या ५० टक्के होती. १९७०-७१ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत रचनात्मक बदल झाल्यामुळे या वस्तूंचा वाटा ३१ टक्के पर्यंत कमी झाला व त्यानंतर १९९८-९९ मध्ये या वस्तूंचा वाटा १० टक्के पर्यंत कमी झाला.

भारतीय निर्यातीची विभागणी स्थूलमानाने चार गटात केली जाते:

अ) शेती आणि तत्सम उत्पादने: अन्नधान्य, कडधान्य, चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ, काजूबिया, साखर, भाज्या, फळे, मत्स्योत्पादन, मांस इत्यादी

ब) धातू व खनिजे: लोखंड, मॅंग्नीज, अभ्रक इत्यादी

क) औद्योगिक उत्पादने: कापड, तयार कपडे, हस्तोद्योग, चामडे व चामड्याच्या वस्तू, पोलाद, अभियांत्रिकी उत्पादने, ताग इत्यादी

ड) खनिज तेल: इंधन, वंगण इत्यादी

देशाच्या निर्यात व्यापाराचे बदलते स्वरूप समजून घेण्यासाठी काही प्रमुख वस्तूंच्या निर्यातीचा आढावा घेता येईल.

भारताच्या निर्यातीमध्ये चहा-कॉफी ह्या वस्तूंना महत्त्वाचे स्थान आहे. नियोजनाच्या सुरुवातीच्या काळात चहाची निर्यात १०६ कोटी रुपये होती. काही चढउतार होऊन २००४-०५ मध्ये ती १,७८४ कोटी रुपये झाली. ह्याच कालावधीत कॉफीची निर्यात वाढून २००४-०५ ह्या वर्षात तिने रुपये १,००८ कोटीची विक्रमी पातळी गाठली.

सुरुवातीच्या काळात सुतीधागा- कापड इत्यादींची निर्यात साधारण होती. ती तिसऱ्या योजना काळात वाढत्या किंमतीमुळे घसरली. १९७०-७१ ते २००४-०५ ह्या कालावधीत वस्त्र आणि वस्त्रोद्योग निर्यातीत ७५ कोटींवरून १४,३९० कोटी रुपये अशी लक्षणीय वाढ झाली.

तयार कपड्यांच्या निर्यातीला अलिकडील काळात वाढते महत्त्व प्राप्त झाले आहे. १९७०-७१ मधील ९ कोटींवरून ही निर्यात १९७४-७५ मध्ये १९६ कोटींपर्यंत तर २००४-०५ मध्ये

२७,०७७ कोटी रुपये एवढी विक्रमी वाढली.

चर्मोद्योगाच्या संदर्भात कच्चे आणि न कमावलेले चामडे हा भारतीय निर्यातीचा पारंपरिक भाग आहे. अलिकडील काळात ह्या वस्तूंच्या जागी कमावलेले कातडे आणि चामड्यांच्या वस्तूंना मोठी परकीय बाजारपेठ लाभत आहे. १९६०-६१ मध्ये ३१ कोटी, १९७९-८० मध्ये ४९० कोटी तर २००४-०५ मध्ये १०,२२० कोटी अशी लक्षणीय निर्यात नोंद झाली.

अभियांत्रिकी वस्तुंमध्ये लोखंड, पोलाद, सॉफ्टवेअर, इलेक्ट्रॉनिक वस्तू इत्यादींचा समावेश होतो. १९९०-९१ नंतर ह्या निर्यातीला खऱ्या अर्थाने उर्जितावस्था प्राप्त झाली. १९८०-८१ (८२५कोटी), १९९०-९१ (३,२०० कोटी), २००४-०५ (७८,८७०कोटी), अशी स्वागतार्ह वाढ ह्या वस्तूंच्या निर्यातीत झालेली आढळते.

गेल्या काही दशकात भारतीय निर्यातीच्या रचनेत आणि स्वरूपात सुखद बदल होत आहेत. ही वाढ विकसनशील अर्थव्यवस्थेशी सुसंगत आहे. परंपरागत निर्यातीमध्ये शेतमाल, शेती आधारित वस्तू, शेतीजन्य औद्योगिक कच्चा माल ह्यांची निर्यात घटत आहे आणि १९६० नंतर भारतीय औद्योगिक उत्पादनांचे निर्यातीमधील महत्त्व वाढत आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या निर्यातीत प्रशंसनीय वाढ होत आहे. परंपरागत निर्यात घटत असली तरी ह्या वस्तूंच्या निर्यातमूल्यांचा सतत विस्तार होत आहे. अभियांत्रिकी, हस्तकला, हिरे, मोती, जवाहिर, रसायने, तयार कपडे इत्यादींचा वाटा एकूण निर्यातीच्या ६० टक्क्यांहून अधिक आहे. ह्यापैकी काही उत्पादनांना विकसित राष्ट्रांकडून मोठी मागणी आहे.

## भारताच्या आयातीची रचना:

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्या कालावधीत सर्व प्रकारची यंत्रे, तेल, पेट्रोल, अन्नधान्य, मोती यांसारख्या वस्तूंची मोठ्या प्रमाणावर आयात भारतात होत होती. भारतात आर्थिक नियोजनाची सुरुवात झाल्यानंतर आयात होणाऱ्या वस्तूंच्या रचनेत मोठ्या प्रमाणात बदल झालेले दिसून येतात. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर औद्योगिकरणाला चालना मिळाली. त्यामुळे यंत्रसामुग्रीची आयात सुरुवातीस अधिक होती पण पुढे ही आयात कमी झाली. १९६५-६६ पूर्वी अन्नधान्याचा तुटवडा होता. त्यामुळे अन्नधान्य, डाळी, मीठ, तेल, खनिजद्रव्य, खते इत्यादींची मोठ्या प्रमाणावर आयात होत होती. परंतु १९६५ मध्ये हरितक्रांतीची सुरुवात झाल्यानंतर भारतात अन्नधान्याच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली व त्यामुळे भारतात होणाऱ्या अन्नधान्याच्या आयातीत खूप मोठ्या प्रमाणावर घट झाली.

दुसरी पंचवार्षिक योजना कालावधीत महालनोबीस प्रतिमानाची अंमलबजावणी केली व त्यामुळे भारतात अवजड यंत्रसामुग्री जी मोठ्या प्रमाणावर आयात होत होती ती औद्योगिकरणामुळे कमी झाली.

भारतीय आयात सातत्याने वाढत असल्याचे दिसून येते या वाढीला अंतर्गत तसेच बाह्य घटक कारणीभूत आहेत. आयात वाढीची प्रमुख कारणे म्हणून पेट्रोल आणि पेट्रोलजन्य पदार्थ, वंगण, अशुद्ध तेल ह्यांची किंमतवाढ, १९८७ चा दुष्काळ, वास्तव आर्थिक वृद्धीमुळे मागणीत झालेली वाढ, उदारीकरणाचे धोरण इत्यादींचा उल्लेख करता येतो. कच्चा माल, अन्नधान्ये इत्यादींमधील आयात

वाढीचा संबंध विकास आणि स्थैर्याशी जोडता येतो. उदारीकरणाच्या धोरणानंतर ह्या वस्तूंचा आयातीमधील वाटा १९७१ ते १९८१ या कालावधीत वाढला पण नंतरच्या कालावधीमध्ये घटत गेला.

खाद्यतेल, कडधान्ये, साखर इत्यादी वस्तूंची आयात १९९१ ते २००४ ह्या काळात मोठ्या प्रमाणावर वाढली. १९८१ ते १९९१ मधील ३२६ कोटी रुपयांवरून ह्या वस्तूंची आयात १९९१ ते २००४ मध्ये ११,६७४ कोटी रुपयापर्यंत वाढली.

१९८५ ते १९९१ या काळात लोखंड आणि पोलादाच्या आयातीत वार्षिक १४.४ टक्के वाढीची नोंद झाली. पण त्यानंतर या वाढीचा वेग मंदावला. भांडवली वस्तूंच्या आयातीत १९८०-८१ मध्ये १५ टक्के वाढ व नंतरच्या काळात सातत्याने वाढ होत जावून २००४-०५ मध्ये ती २१ टक्के पर्यंत पोहोचली व नंतर पुन्हा घट झालेली आहे.

वरील विवेचनावरून भारतीय आयातीच्या रचनात्मक बदलांची पुढील वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

- वाढत्या औद्योगिकरणामुळे भांडवली वस्तू आणि औद्योगिक कच्च्या मालाच्या आयातीत वाढ घडून आली.
- उदारीकरण नीतीच्या प्रभावाने निर्यात वृद्धीसाठी आवश्यक वस्तूंच्या आयातीत वाढ झाली.
- अन्नधान्याच्या आयातीतील लक्षणीय घट त्याच्या उत्पादनातील स्वयंपूर्णता दर्शविते.
- शेती आणि औद्योगिक विकासाने उपभोग्य वस्तूंच्या आयातीत घट झाली.

सर्व साधारणपणे असा निष्कर्ष काढता येतो की, भारतीय आयातीच्या रचनेत गेल्या दोन दशकात स्वागताई बदल झाले आहेत.

## भारतीय विदेश व्यापाराची बदलती दिशा:

कोणत्याही राष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे विवेचन करतांना दीर्घ कालावधीमध्ये व्यापाराच्या दिशेतील बदलाचे विश्लेषण महत्वाचे ठरते. आयातीची दिशा म्हणजे ज्या राष्ट्रांकडून आयात केली जाते त्या देशांच्या संख्येत झालेले बदल तर निर्यातीच्या दिशेवरून कोणत्या देशात आपल्या वस्तूंना मागणी होत आहे ह्याचे ज्ञान होते. भारताचे व्यापारी संबंध कोणकोणत्या राष्ट्रांशी आहेत हे सांगणे म्हणजे व्यापाराची दिशा होय.

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळेस भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार प्रामुख्याने ब्रिटन या देशाशी होता. कारण स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश भारतावर राज्य करीत होते. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे धोरण व दिशा ब्रिटीश सरकार ठरवत असत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताच्या औद्यागिकरणास व शेती विकासास सुरूवात झाली व त्यामुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या रचनेत तसेच भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी देशांच्या संख्येत बदल झाले आहेत.

## आयातीची दिशा:

स्वातंत्र्यापूर्वी भारताचे आयात व्यापार संबंध इंग्लंड व त्यांच्या इतर वसाहती सोबत होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मात्र भारताचे जगातील अनेक देशांबरोबर व्यापार विषयक संबंध प्रस्थापित झाले.

१९५०-५१ मध्ये भारताच्या एकूण आयात व्यापारात इंग्लंडचा वाटा २०.८ टक्के होता,

२००२-०३ मध्ये त्यात ४.५ टक्के पर्यंत घट झाली. आर्थिक सहकार्य व विकास संघटन (OCED), पेट्रोलियम नियात देशांचे संघटन (OPEC), पूर्व युरापोय देश(EEC), आशियातील विकासशील देश (Asian Developing Countries) आणि इतर देश याप्रमाणे जगातील राष्ट्रांच्या गटाशी भारताचे व्यापारी संबंध आहेत. OECD गटातील राष्ट्रामध्ये युरोपियन राष्ट्रे, बेल्जियम, जर्मनी, युनायटेड अरब संघराज्य तसेच अमेरिका, स्वित्झर्लंड, जपान इ. राष्ट्रांचा समावेश होतो.

OCED औद्योगिक दृष्ट्या प्रगत देश अमेरिका, जपान, युरोपियन युनियन या राष्ट्रांकडून होणारी आयात कमी होत आहे. १९६०-६१ मध्ये हा वाटा ७८.८ टक्के होता, जो २००६-०७ मध्ये ३६.५ एवढाच राहिला. OPEC राष्ट्रे युनायटेड अरब संघराज्य, इराण, सौदी अरेबिया, कुवेत इत्यादी राष्ट्रांकडून होणाऱ्या आयातीवरील खर्चात १९६०-६१ (४.६ टक्के) आणि २००६-०७ (२९.४ टक्के) याप्रमाणे वाढ झाली. समाजवादी राष्ट्रांशी वाढलेल्या आर्थिक संबंधांमुळे भारताच्या आयात खर्चात पुर्व युरोपियन देश प्रामुख्याने रशिया व इतर राष्ट्रांचा वाटा १९६०-६१ (३.४ टक्के) आणि २००६-०७ (२.४ टक्के) याप्रमाणे कमी झाला. सोव्हिएत युनियनचे विघटन झाल्यामुळे हा वाटा कमी झाल्याचे दिसून येते. आशियातील विकसनशील राष्ट्रांचा वाटा वाढलेला आहे. १९६०-६१ (११.८ टक्के) आणि २००६-०७ (३१.३ टक्के) याप्रमाणे मोठी वाढ चीन, हाँगकाँग, द.कोरिया, सिंगापूर, मलेशिया यासारख्या विकासशील आशिया राष्ट्राच्या संदर्भात झालेली पाहावयास मिळते.

सन २००१-०२ मध्ये भारताच्या आयातीत अमेरिका प्रथम स्थानावर (६.१ टक्के), बेल्जियम दुसऱ्या (५.४ टक्के), इंग्लंड तिसऱ्या (५.० टक्के), जपान चौथ्या (४.२ टक्के) आणि जर्मनी पाचव्या (३.९ टक्के) स्थानावर होते.

### निर्यातीची दिशा:

भारताची सर्वाधिक निर्यात OECD राष्ट्रांना होते.१९६०-६१ मध्ये OECD संघटनाचा भारताच्या निर्यातीमधील वाटा ६६.१ टक्के एवढा होता. सन २००६-०७ मध्ये हा वाटा ४१.९ टक्के याप्रमाणे राहिला. यामध्ये युरोपियन युनियन चा वाटा तुलनेने अधिक आहे. OPEC राष्ट्रांना १९६०-६१ मध्ये ४.१ टक्के आणि २००६-०७ मध्ये १६.४ टक्के याप्रमाणे निर्यात वाढल्याचे दिसून येते. पूर्व युरोपियन देशांच्या बाबतीत झालेली निर्यात १९६०-६१ (७.० टक्के), १९८०-८१ (२२.१ टक्के), १९९०-९१ (१७.९ टक्के), आणि २००६-०७ (२.० टक्के) याप्रमाणे मधल्या काळात वेगाने वाढ व त्यानंतर सोव्हिएत युनियनच्या विघटनामुळे नंतरच्या काळात घट झालेली आहे. आफ्रिका, आशिया, लॅटिन अमेरिकेच्या विकसनशील राष्ट्रांना होणाऱ्या भारताच्या निर्यातीचा वाटा एक चतुर्थांश पेक्षा अधिक आहे. यात आशियामधील देश महत्त्वपूर्ण आहेत. १९६०-६१ मध्ये विकसनशील राष्ट्रांना होणारी निर्यात १४.८ टक्के व त्यानंतर २००६-०७ मध्ये ४०.२ टक्के याप्रमाणे वाढलेली दिसून येते.

२००१-०२ मध्ये भारताच्या निर्यातीत प्रथम स्थानावर अमेरिका (१४.९ टक्के), दुसऱ्या स्थानावर इंग्लंड (४.९ टक्के), जर्मनी तिसऱ्या

स्थानावर (४.१ टक्के) आणि जपानचे स्थान चौथे (३.४ टक्के) याप्रमाणे राहिले.

भारताच्या एकूण व्यापारातील हिस्सा लक्षात घेता सध्या (२०१०-११ एप्रिल ते सप्टेंबर) युनायटेड अरब संघराज्य (९.९ टक्के) प्रथम स्थानी आहे. दुसऱ्या क्रमांकावर चीन (९.३ टक्के), तिसऱ्या क्रमांकावर अमेरिका (७.६ टक्के), चौथ्या क्रमांकावर सौदी अरेबिया (४.५ टक्के) आणि जर्मनी पाचव्या क्रमांकावर (३.० टक्के) याप्रमाणे चित्र पहावयास मिळते. याच कालावधीत स्वित्झर्लंड, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, इराण, हाँगकाँग, कोरिया (रिपब्लिक) इंडोनेशिया, युनायटेड किंगडम, जपान, बेल्जियम इत्यादी राष्ट्रांचा एकूण व्यापारातील वाटा २ टक्के पेक्षा अधिक दिसून येतो.

सारांश गेल्या पावशतकातील भारतीय विदेश व्यापाराच्या एकूण मुल्यात झालेली वाढ, व्यापाराच्या रचनेतील बदल आणि विदेश व्यापाराच्या दिशेतील बदल उत्साहवर्धक आणि स्वागतार्ह आहेत. आयात-निर्यात या दोन्ही आघाड्यांवर भारतीय आर्थिक आणि औद्योगिक विकासाचे चित्र स्पष्ट होत आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीचा योग्य तो फायदा घेतल्यास भारतीय अर्थव्यवस्था नजीकच्या काळात एक विकसित अर्थव्यवस्था ठरेल.

संदर्भ:


१) *भारतीय अर्थव्यवस्था*- मिश्र-पुरी (२००३)

२) *आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दांत व धोरणे*- डॉ.गंगाधर कायंदे पाटील (२००७)

३) *भारतीय अर्थव्यवस्थेची विकास धोरणे विषयक समस्या*- शशिकांत हरी अट्रावलकर

४) *भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकास विषयक समस्या*, डॉ. रावसाहेब जाधव पाखेकर

५) *व्यावसायिक अर्थशास्त्र*, स.वा. गोखले

६) *Indian Economy* (26th Edition 2002), A.N. Agrawal.

7) *Development Issues of Indian Economy*, Misra- Puri (2005)

8) *NET Information*, Economic Survey 2010-11, India Export Import Top Product.

# भारतातील अन्नसुरक्षा : एक समस्या

जितेंद्र दगडू तलवारे, धुळे
एस.एस.व्ही.पी.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय
आजीव सभासद क्र. १३५०
भ्रमणध्वनी: ९४२२३२९९९५

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सर्वांसाठी अन्नधान्य मिळवणे हे आपले उद्दिष्ट आहे. संतुलित आहार, पिण्याचे स्वच्छ पाणी, आरोग्यदायी परिसर, प्राथमिक आरोग्य सुविधा यांच्यापर्यन्त पोहोचण्याचा शारीरिक, आर्थिक आणि सामाजिक मार्ग म्हणजे अन्नसुरक्षा. सरकारच्या वेगवेगळ्या योजना देशात असुनदेखील कुपोषण व दारिद्र्याचा प्रश्न दिसून येतो.

देशातील सर्व लोकांना सक्रिय आणि आरोग्य संपन्न जीवन जगण्यासाठी सदा सर्वदा पर्याप्त प्रमाणात अन्नाची उपलब्धता करुन देणे म्हणजे अन्न सुरक्षितता होय.

शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळावा म्हणून शासनाकडून किमान हमी भाव जाहीर केले जातात या किमान हमी भावाची शास्त्रोक्त पद्धतीने गणना करतांना उत्पादन खर्च, जगण्याचे मुल्य, मुल्य समानता यासारख्या अनेक बाबींचा विचार केला जातो. किमान हमी भावामुळे शेतकरी निवडीनुसार पिक घेऊ शकतो. योग्य पिकाची निवड करुन आपले उत्पादन शासनाला किंवा खुल्या बाजारात विकू शकतो हा किमान हमी भाव जवळपास २५ विविध पिकांसाठी जाहीर केला जातो. गेल्या काही वर्षांपासून शासन वेगवेगळ्या कारणास्तव किमान हमी भावाखाली येणाऱ्या सर्व धान्याच्या किंमती वाढवत आले आहे. महागाईला आळा घालण्यासाठी तसेच विशिष्ट पिकांची लागवड वाढावी म्हणून असे केले जाते.

किमान हमी भावामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनाला चालना मिळत असली तसेच उत्पादनात वाढ होण्यास प्रेरणा मिळत असली तरी या कारणामुळे काही वेळेस काही वस्तुंचे भाव वाढायला सुरुवात होते. त्याचे परिणाम ग्राहकांना भोगावे लागतात. किमान हमी भाव शासनाद्वारे राबविल्या जाणाऱ्या खरेदी प्रक्रियेशी जोडलेला आहे. शासनाच्या दृष्टीकोनातून

तक्ता क्र. १

किमान हमी भाव

| प्रती क्विंटल किमान हमी भाव | | |
|---|---|---|
| शेतमाल | २०१० | २०११ |
| गहू | ११०० | - |
| भात | ९५० | १०३० |
| मका | ८४० | ८८० |
| मूग | २७६० | ३१७० |
| उदीड | २५२० | २९०० |
| ऊस | १२९.८४ | १३९.१२ |
| सोयाबीन | १३५० | १४०० |
| शेंगदाणे | २१०० | २३०० |

*(स्त्रोत - अन्न मंत्रालय)*

या खरेदीमागे तीन कारणे आहेत. संकटकाळात अन्नधान्य साठा उपलब्ध व्हावा, सार्वजनिक वितरण व्यवस्थेकरिता खरेदी करणे, जेणे करुन गरिबांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शासनाच्या विविध योजनाच्या माध्यमातुन धान्य स्वस्तात उपलब्ध होईल.

भारतात दरवर्षी ८० दशलक्ष टन गव्हाचे उत्पादन होते. त्यापैकी २/३ गहू अतिरिक्त गहू म्हणून बाजारपेठेत येतो म्हणजेच जवळपास ५४ दशलक्ष टन गहु खुल्या बाजारात येतो. त्यापैकी शासनाने २५ दशलक्ष टन गहू खरेदी केला तर साधारणपणे ३० दशलक्ष टन गहू खाजगी व्यापाऱ्यांकरीता विक्रीसाठी उपलब्ध होतो अशाप्रकारे केली जाणारी खरेदी आणि साठवणूक गरजेपेक्षा खूप जास्त असल्याने या प्रक्रियेत शासन धान्याची साठेबाजी करते. परिणामी चांगले उत्पादन झालेले असतांना बाजारपेठेत गव्हाची कमतरता निर्माण होत असल्याने खुल्या बाजारात गव्हाची किंमत वाढते गेल्या दोन वर्षाच्या कालावधीत आपल्याला हा प्रकार अनुभवास येत आहे. त्यामुळे चांगले उत्पादन होऊनही बाजारपेठेत कृत्रिम टंचाई निर्माण होते आणि त्यामुळे किंमतही वाढते. आपण या खरेदी धोरणाचा फेरविचार करण्याची आणि त्यावर पर्याय शोधण्याची गरज आहे. किमान हमी भावाने धान्य खरेदी करतांना शासनाला येणाऱ्या खर्चाची गोळाबेरीज करणे देखील गरजेचे आहे. आर्थिक सर्वेक्षणानुसार गहू आणि भाताच्या खरेदीचा खर्च साधारणपणे २.१२ ते २.८९ रुपये प्रती किलो येत असून वितरणावर १.८२ ते २.४५ रु. प्रती किलो खर्च करावे लागत आहे. एकुण खर्च तांदळासाठी १८.९३ रु प्रति किलो व गव्हासाठी १४.०२ रु प्रति किलो

येत असतांना गरिबांना तांदूळ व गहू अनुक्रमे रु.३ ते रु. ७.९५ प्रति किलो व रु.२ ते रु.६ प्रति किलो दराने मिळत असल्याने साहजिकच हा खर्च कमी करण्याची गरज आहे. महामंडळाने निर्धारित मर्यादेपुढील धान्यासाठी लागलीच खुल्या बाजारात विक्रीस काढायला हवा. जेथे खरेदीदार त्यांना हवा तेवढा गहू किंवा तांदूळ महामंडळाच्या वायदेबाजारातील गोदामातून खरेदी करु शकतील त्यामुळे खरेदी किंमत कमी होईल आणि संसदेने नंतर खुल्या बाजारातील विक्रीला मंजुरी देण्याची वाट पहात बसण्याऐवजी खाजगी व्यापारी आपापले साठे खरेदी करु शकतील त्यामुळे साठवणूक खर्च कमी होईलच तसेच धान्य कुजण्याची शक्यताही कमी होईल.

अन्न मंत्रालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत जेव्हा देशभरातील सर्व नागरीकांना अन्नधान्य पुरवठा केला जात होता तेव्हा स्वस्त धान्य दुकानदारांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणावर धान्य खुल्या बाजारात पोहचत होते. त्यामुळे १९९२ मध्ये शासनाने सार्वजनिक वितरण यंत्रणा अधिक बळकट करण्याचा आणि गरीबांची संख्या मोठ्या प्रमाणावर असलेल्या दुर्गम आदिवासी आणि पर्वती क्षेत्रात यंत्रणेची पोहोच वाढविण्याच्या दृष्टीने सुधारित सार्वजनिक वितरण यंत्रणा सुरु करण्यात आली तसेच जून १९९७ मध्ये शासनाने गरीबांवर लक्ष केंद्रीत करुन उद्दिष्टाधारीत सार्वजनिक वितरण व्यवस्था आणली. सार्वजनिक वितरण व्यवस्थेत अनेक गळतीच्या मालिका आल्या आहेत आणि परिणामस्वरुप लाभार्थींपर्यंत धान्य पोहचत नाही. अनेक राज्य सरकारांनी उद्दिष्टाधारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गळती थांबविण्यासाठी स्मार्ट कार्ड्स, लाभार्थींसाठी बायोमेट्रीक थम्ब इंप्रेशन अशा अनेक नाविन्यपूर्ण उपाययोजना हाती घेतल्या आहेत. वर्षागणीक अन्नविषयक अनुदान वाढत असताना अन्न मंत्रालय आणि राज्य सरकारांसह अनेक क्षेत्रांमधून उद्दिष्टाधारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेत सर्वंकष फेरविचार करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत वितरीत करण्यात आलेले एकुण अनुदान पुढीलप्रमाणे आहे:

तक्ता क्र. २

वितरित अनुदान

| वर्ष | अनुदान (रु. कोटी) |
|---|---|
| २००७-०८ | रु. ३१२५९.६८ |
| २००८-०९ | रु. ४३६८८.०८ |
| २००९-१० | रु. ५८२४२.४५ |

*(स्त्रोत - अन्न मंत्रालय)*

सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर दिले जाणारे अनुदान दिवसेंदिवस वाढत जाणारे दिसून येते. तरीदेखील कुपोषण आणि दारिद्र्याचे प्रमाण कमी होतांना दिसून येत नाही. त्यासाठी राज्य व केंद्रशासित प्रदेशांनी अन्नकुपन जारी करण्यासह विविध उपाययोजना हाती घेण्याचे ठरविले आहे. अन्न उपाययोजनांसह असेही सुचविण्यात आले होते की, सार्वजनिक वितरण यंत्रणेची माहिती तंत्रज्ञानावर आधारीत संगणकीकरण करायला हवे. आणि अन्नधान्य वितरणाकरीता स्मार्ट कार्ड आधारित व्यवस्था करायला हवी.

संदर्भ:


१) *महाराष्ट्राची आर्थिक पहाणी,* २०११-१२

२) *भारतीय अर्थव्यवस्था,* चव्हाण एन.एल., प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.

३) *सार्वजनिक वितरण यंत्रणा,* दास संदिप, योजना, ऑक्टोबर २०१०, पृ.३

४) *धान्य खरेदी व मुल्यांकन धोरणाच्या फेरविचारांची गरज,* सबनवीस मदन, अनुवाद-कांचन चौधरी, योजना, ऑक्टोबर, २०१०, पृ. ४.


## निवेदन: अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र शहाद्याच्या पत्त्यावर पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा. मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद

# भारतातील दारिद्र्याची समस्या

**जे.एस. इंगळे, लोणंद**
व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख
शरदचंद्र पवार कॉलेज, जि. सातारा
आजीव सभासद क्रमांक ४२
भ्रमणध्वनी ९७६७५२०४८२

---

## प्रास्ताविक:

अतिरिक्त लोकसंख्या, दारिद्र्य, बेरोजगारी, आर्थिक विषमता, प्रादेशिक असमतोल, शेतीची अल्प उत्पादकता, कुपोषण आणि बालमृत्यू या भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील प्रमुख समस्या आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील दारिद्र्याच्या समस्येवर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. दारिद्र्याची समस्या ही भारताला स्वातंत्र्य पूर्वकाळापासून भेडसावत असून इंग्रजांच्या राजवटीत देशातील ८० टक्क्यापेक्षा जास्त लोक दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत होते. आज सरकारी आकडेवारीनुसार देशात सुमारे २५ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत.

## दारिद्र्य म्हणजे काय?

ज्यांना आपल्या उत्पन्नातून किमान आवश्यक गरजाही पूर्ण करता येत नाहीत त्या लोकांना दारिद्र्यरेषेखालील लोक असे संबोधले जाते. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या पाच गरजांना प्राथमिक गरजा किंवा किमान आवश्यक गरजा असे म्हणतात. अपुऱ्या उत्पन्नामुळे लोकांना आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करता येत नाहीत. सन २०००-२००१ च्या जागतिक विकास अहवालात ''सुस्थितीपासून संपूर्णपणे वंचित असणे म्हणजे दारिद्र्य होय'' अशी दारिद्र्याची व्याख्या केली आहे. प्रा अमर्त्य सेन यांच्या मते ''एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मूल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय'' जागतिक बँकेने ''माणशी दर दिवशी एक डॉलर पेक्षा कमी उत्पन्न मिळविणाऱ्या व्यक्ती म्हणजे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती होय'' अशी दारिद्र्याची व्याख्या केली आहे. किमान गरजा आणि प्रभावी मागणीच्या अंदाजासाठी १९८०-८५ मध्ये नेमलेल्या तज्ज्ञ गटाने ''ग्रामीण भागासाठी दररोज प्रती व्यक्ती किमान २४००

कॅलरीज आणि शहरी भागासाठी किमान २१०० कॅलरीज मिळण्यासाठी लागणारे अन्न मिळविण्यासाठीची असमर्थता म्हणजे दारिद्र्य होय'' अशी दारिद्र्याची व्याख्या केली आहे.

सन १९७३ मध्ये भारतात दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण ५४.९० टक्के इतके होते. त्यापैकी ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण ५६.४० टक्के होते. तर शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण ४९.०० टक्के इतके होते. सन १९७७ मध्ये भारतातील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण ५१.३० टक्के, सन १९८३ मध्ये ४४.५० टक्के, सन १९८७ मध्ये ३८.९० टक्के, सन १९९३ मध्ये ३६.०० टक्के, सन २००० मध्ये २६.१० टक्के, सन २००४ मध्ये २७.५० टक्के आणि सन २००७ मध्ये १९.३० टक्के इतके होते. सन २००७ मध्ये भारतात ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण २१.१० टक्के होते. तर शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण १५.१० टक्के इतके होते. भारतात शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे.

### महाराष्ट्र राज्यातील दारिद्र्याचे प्रमाण:

सन १९७३-७४ मध्ये महाराष्ट्रातील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण ५३.२४ टक्के होते. त्यापैकी ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण ५७.७१ होते. तर शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण ४३.८७ टक्के होते. सन १९७७-७८ मध्ये महाराष्ट्रातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण ५५.८८ टक्के होते. त्यापैकी ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण ६२.९७ टक्के होते. तर शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण ४०.०९ टक्के होते. सन १९८३-८४ मध्ये महाराष्ट्रातील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण ४३.४४ टक्के, १९८७-८८ मध्ये ४०.४१ टक्के, १९९३-९४ मध्ये ३६.८६ टक्के, १९९९-२००० मध्ये २५.०२ टक्के इतके होते. सन १९९९-२००० मध्ये महाराष्ट्रातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण २३.७२ टक्के होते. तर शहरी भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण २६.८१ टक्के होते. महाराष्ट्र राज्यात १९७३-७४ ते १९९३-९४ पर्यंत शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागातील दारिद्र्याचे प्रमाण जास्त होते. सन १९९९-२००० मध्ये मात्र ग्रामीण दारिद्र्यापेक्षा शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसते.

### काही राज्यांतील दारिद्र्याचे प्रमाण:

सन १९९९-२००० मध्ये भारतात एकूण लोकसंख्येपैकी २६.१० टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली होती. दारिद्र्य रेषेखालील लोकांचे सर्वात जास्त प्रमाण ओरिसा या राज्यात होते (४७.१० टक्के). तर दारिद्र्याचे सर्वात कमी प्रमाण जम्मू-काश्मिर या राज्यात होते(३.५० टक्के). सन १९९९-२००० मध्ये भारतात ओरिसा खालोखाल बिहार (४२.६० टक्के), मध्य प्रदेश (३७.४० टक्के), सिक्कीम (३६.४० टक्के), आसाम (३६.१० टक्के), त्रिपुरा (३४.४० टक्के), मेघालय (३३.९० टक्के), अरूणाचल प्रदेश (३३.५० टक्के), नागालॅण्ड (३२.७० टक्के), उत्तर प्रदेश (३१.२० टक्के), मणिपूर (२८.५० टक्के), पश्चिम बंगाल(२७.०० टक्के), महाराष्ट्र (२५.०० टक्के) इत्यादी राज्यात दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण जास्त होते. भारतात सन १९९९-२०००

मध्ये तामिळनाडू राज्यात दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण २१.१० टक्के, अंदमान-निकोबारमध्ये २१.०० टक्के, कर्नाटक राज्यात २०.०० टक्के, मिझोराम मध्ये १९.५० टक्के, दादरा नगरहवेली मध्ये १७.१० टक्के, लक्षद्वीप मध्ये १५.६० टक्के, गुजरात राज्यात १४.१० टक्के तर केरळ राज्यात १२.७० टक्के इतके होते. सन १९९९-२००० मध्ये गोवा आणि दीव-दमण मध्ये ४.४० टक्के, चंदीगढ मध्ये ५.७० टक्के, पंजाबमध्ये ६.२० टक्के, हिमाचल प्रदेश मध्ये ७.६० टक्के, दिल्ली राज्यात ८.२० टक्के, हरियाणा मध्ये ८.७० टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली होते.

### दारिद्र्याचे दुष्परिणाम:

दारिद्र्य ही दरिद्री व्यक्ती समोरील आणि राष्ट्रासमोरील गंभीर स्वरुपाची समस्या आहे. दारिद्र्याचे भयंकर परिणाम दरिद्री व्यक्तीला जसे भोगावे लागतात तसेच राष्ट्राला किंवा सरकारलाही भोगावे लागतात. दारिद्र्यामुळे कुटुंबाची प्रगती होत नाही. मुलाबाळांना चांगले शिक्षण देता येत नाही. त्यामुळे चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळू शकत नाहीत. त्यामुळे दरिद्री कुटुंबाचा गाडा दारिद्रयाच्या चिखलात अधिकच रूतून बसतो. दारिद्र्यामुळे कुटुंबातील कोणालाच पोटभर व चांगले अन्न मिळू शकत नाही. त्यामुळे दरिद्री कुटुंबातील व्यक्तींची कार्यक्षमता अत्यंत कमी राहते. कार्यक्षमता कमी असल्याने मजुरी सुद्धा कमी मिळते. त्यामुळे दारिद्र्याचा प्रश्न अधिकच गंभीर बनतो. दारिद्री व्यक्तींना समाजात फारशी किंमत दिली जात नाही. श्रीमंतांनाच समाजात मानमरातब किंवा प्रतिष्ठा असते. दरिद्री व्यक्तींची सर्व ठिकाणी अवहेलना होत असते. हा दारिद्र्याचा सामाजिक परिणाम मानता येईल. देशात दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या जर जास्त असेल तर देशाच्या सरकारला दारिद्र्य निर्मुलनाच्या कार्यक्रमावर मोठा खर्च करावा लागतो. यापैकी बराचसा खर्च अनुत्पादकच असतो. आरोग्य किंवा औषधोपचार यावर केलेला खर्च अल्पकाळात तरी अनुत्पादकच असतो. अशा खर्चामुळे उत्पादक कामासाठी पैसा कमी पडतो. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढत नाही. राष्ट्राचा विकास कमी गतीने होतो हा दारिद्र्याचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम गंभीर आहे. तसेच दारिद्र्यामुळे देशाच्या लोकसंख्या वाढीचा वेग वाढून लोकसंख्येचा आकार मोठा होतो. कारण दरिद्री कुटुंबांची जननक्षमता खूप जास्त असते. दरिद्री लोकांना असे वाटते की, आपल्या कुटुंबात जास्त अपत्ये असतील तर ती मोठी झाल्यानंतर मजुरी करून कुटुंबाला हातभार लावतील. त्यामुळे भारतात एकेका दरिद्री कुटुंबात चार ते सहा अपत्ये दिसून येतात. अशा प्रकारे देशात दारिद्र्याचे प्रमाण जितके जास्त तितका लोकसंख्या वाढीचा वेग आणि लोकसंख्येचा आकार मोठा असतो. दारिद्र्यामुळे देशात अतिरिक्त लोकसंख्येचा प्रश्न निर्माण होतो. अतिरिक्त लोकसंख्येमुळे देशात अनेक आर्थिक व सामाजिक समस्या निर्माण होतात. या समस्यांशी मुकाबला करण्यासाठी सरकारला प्रचंड खर्च करावा लागतो. त्यामुळे देशाच्या प्रगतीचा वेग मंदावतो. दारिद्र्यामुळे गर्भाशये भाड्याने देणे, स्त्रीबीजांची विक्री करणे, मुला-मुलींची लग्ने लहान वयात करणे, मुला-मुलींची विक्री करणे अशा समस्या भारतात निर्माण झाल्या असल्याचे आपण पाहतो. भारतात बालमजुरीला कायद्याने बंदी असली तरी असंघटीत क्षेत्रात बालमजूर आढळून येतात. यास दारिद्र्य

हाच प्रमुख घटक कारणीभूत आहे. दारिद्र्याच्या वाढत्या प्रमाणामुळेच भारतात लहान-मोठ्या शहरात मोठ्या प्रमाणात बेसुमार झोपडपट्ट्या उभ्या राहिल्याचे चित्र दिसत आहे. गुन्हेगारी, व्यसनाधिनता, देह व्यापार, कुपोषण, बालमृत्यू, तीस ते चाळीस वयातच वृध्दावस्था येणे, उपासमार, भूकबळी इत्यादी अनेक गंभीर समस्या दारिद्र्यामुळेच निर्माण झाल्या असून या समस्यांना केवळ दरिद्री व्यक्तीनांच तोंड द्यावे लागत नाही तर सरकारला आणि समाजालाही या समस्यांशी सामना करावा लागतो आहे. भारतासारख्या देशात नक्षलवादी चळवळीचा जन्म होण्यास आणि ही चळवळ अनेक राज्यात फोफावण्यास जे विविध घटक कारणीभूत आहेत त्यामध्ये आदिवासींचे दारिद्र्य हा प्रमुख घटक आहे. दारिद्र्यामुळेच गरीब आदिवासींनी सरकारच्या विरोधात शस्त्र उपसले आहे. अशा प्रकारे दारिद्र्यामुळे अनेक आर्थिक, सामाजिक, राजकीय परिणाम दरिद्री कुटुंबावर आणि अर्थव्यवस्थेवर घडून येतात.

## दारिद्र्याची कारणमिमांसा:

भारतासारख्या विकसनशील देशातील लोकांच्या दारिद्र्यास विविध घटक कारणीभूत आहेत. त्यामध्ये वाढती लोकसंख्या किंवा लोकसंख्या वाढीचा वेग मोठा असणे हा प्रमुख घटक आहे. जगात सर्वात जास्त लोकसंख्या वाढीचा वेग आपल्या देशाचा असून याबाबतीत आपण चीनला केव्हाच मागे टाकले आहे. वाढती लोकसंख्या हा घटक दारिद्र्याचे कारण आहे तसेच परिणाम सुद्धा आहे. दरिद्री कुटुंबाचा आकार (Size of family) मोठा असतो. त्यामुळे कुटुंबातील सर्वांचे पालनपोषण कुटुंब प्रमुखाला करता येत नाही. त्यामुळे दरिद्री कुटुंब आणखीच दरिद्री बनते. कमी मजुरी, दिवसेंदिवस गगनाला भिडत चाललेली महागाई, बेरोजगारी, अशक्तपणा किंवा कुपोषण, भूमिहीनता, अपुरी आणि निकृष्ट शेतजमीन, व्यसनाधिनता, अंधश्रद्धा (बोकडाचा बळी देणे इत्यादी), अनिष्ठ प्रथा (लग्नासारख्या बाबींवर कर्ज काढून मोठा खर्च करणे), वेठबिगारी, पूरक व्यवसाय व स्वयंरोजगार (पशुपालन, कुक्कुटपालन, पानपट्टी, किराणा मालाचे दुकान) नफ्यात न चालणे इत्यादी विविध घटक भारतीय जनतेच्या दारिद्र्यास कारणीभूत आहेत. भारतासारख्या विकसनशील देशातील लोकांच्या दारिद्र्यास कारणीभूत आहेत. भारतासारख्या विकसनशील देशातील लोकांच्या दारिद्र्यास कारणीभूत असणारा आणखी एक महत्वाचा घटक म्हणजे भारतासारख्या विकसनशील देशांची सरकारेच आर्थिक दृष्ट्या फारशी सक्षम नाहीत. म्हणजे राष्ट्र किंवा राष्ट्राची अर्थव्यवस्थाच जर दरिद्री असेल तर त्या राष्ट्रातील बहुसंख्य जनतेला सुद्धा दारिद्र्यातच खितपत पडावे लागते.

## दारिद्र्याच्या निराकरण्यासाठी उपाय:

कोणत्याही देशात दारिद्र्य अस्तित्वात असणे ही माणुसकीला कालिमा फासणारीच बाब आहे. दारिद्र्यामुळे देशाची आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिमा मलिन होते. भारतीय अर्थव्यवस्थेत नजिकच्या काही वर्षात अमेरिकेसारखी महासत्ता बनण्याची क्षमता आहे. परंतु देशातील दारिद्र्य संपूर्णपणे नष्ट केल्याशिवाय भारताला महासत्तेचा दर्जा मिळणार नाही हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. ही बाब आपण सातत्याने राज्याकर्त्यांच्या मनावर बिंबवली पाहिजे. देशात दारिद्र्य टिकून राहिले पाहिजे अशी मानसिकता

काही राजकारण्यांची आहे. ती मानसिकता नष्ट केल्याशिवाय देशातील दारिद्र्याचा प्रश्न निकालात निघणार नाही. देशातील दारिद्र्य संपविण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने अनेक उपाय योजना केल्या आहेत. उदाहरणार्थ विविध रोजगार योजना देशात राबविल्या जातात. परंतु या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे, प्रामाणिकपणे होत नाही. योजनात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात दिसून येतो. हा भ्रष्टाचार संपुष्टात येणे आवश्यक आहे. रोजगार योजना प्रभावीपणे, प्रामाणिकपणे राबविल्या पाहिजेत. शेतीत जेव्हा रोजगार उपलब्ध नसतो तेव्हा त्वरित रोजगार योजना चालू केल्या पाहिजेत. त्यामुळे लोकांना रोजगार मिळून मूलभूत गरजा भागवता येतील. महागाई हे दारिद्र्याचे प्रमुख कारण असून सरकारने महागाई आटोक्यात आणणे आवश्यक आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीवर सरकारचे नियंत्रण असलेच पाहिजे. त्याशिवाय गरीबांना पुरेसे व चांगले अन्न मिळणार नाही. दारू सारख्या व्यसनामुळे सुद्धा दारिद्र्य ओढवते. त्यामुळे सरकारने दारूबंदी करून देशातील सर्व दारूची दुकाने, हातभट्ट्या बंद कराव्यात. दारूड्या लोकांना व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना सरकारने कोणतीही मदत अथवा सवलती देऊ नयेत. दारूबंदी यशस्वी झाली तर दारिद्र्याचे प्रमाण खूपच कमी होईल. कुटुंबाचा आकार मोठा असल्याने कुटुंबावर दारिद्र्याची आपत्ती कोसळते. म्हणून दरिद्री कुटुंबांना लहान आकाराच्या कुटुंबाचे महत्त्व पटवून देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते, सेवाभावी संस्था, शासन यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. एकाच अपत्यावर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या दरिद्री कुटुंबालाच शासनाने मदत करण्याचे जाहीर करावे. वरील उपायांबरोबरच देशभर गावा-गावात चालणारी खासगी सावकारी बंद करणे, अंधश्रद्धांचे व अनिष्ट प्रथांचे उच्चाटन करणे, शेतीची उत्पादकता वाढवणे, भूमिहीन गरीबांना शेतजमिनीचे वाटप करणे, सरकारने दारिद्र्य निर्मूलन योजनावरील खर्चात वाढ करणे इत्यादी उपाय प्रस्तुत अभ्यासकाला सुचवावेसे वाटतात.

संदर्भ:


१) महाजन मुकुंद, *'भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास'*, निराली प्रकाशन, पुणे, २००८, पृ. १८
२) तत्रैव, पृ. १८
३) *प्रबोधन प्रकाशन ज्योती*, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी, डिसेंबर २००८, पृ.३६
४) *अर्थसंवाद*, खंड २८,अंक ४, जानेवारी-मार्च २००५, मराठी अर्थशास्त्र परिषद,पृ.३३५-३३६
५) *आर्थिक सर्वेक्षण* २०००-२००१ आणि दहावी पंचवार्षिक योजना
६) *आर्थिक सर्वेक्षण* २०००-२००१



हे त्रैमासिक अनिल सूर्यवंशी यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजी नगर, बार्शी- ४१३ ४११, जिल्हा सोलापूर येथे प्रसिध्द केले.

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

National Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.५,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

डॉ. अनिल सूर्यवंशी,
कार्यवाह खजिनदार
गोदाई,
शिवशक्ती मैदानाजवळ,
शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११,
जिल्हा-सोलापूर,
दूरध्वनी:(०२१८४) २२४२१४
मो.९०११३३९९०६

डॉ.अविनाश निकम
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
मो.९८२२६६५१४१

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

**(फॉर्म ४, नियम ८ नुसार)**

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.अनिल सूर्यवंशी, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| २. नियतकाल | : त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : डॉ.अनिल सूर्यवंशी |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| ४. मुद्रण स्थळ | : सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, बांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी अनिल सूर्यवंशी असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**डॉ.अनिल सूर्यवंशी,**
मुद्रक व प्रकाशक

उद्यमेन ज्ञानेन वैवम लक्ष्मी प्राप्यते

# श्री महावीर सहकारी बँक लि. जळगांव

मुख्य कार्यालय- ९२, नवी पेठ, जळगांव
फोन: (०२५७) २२३२४९०, २२३९२९०, २२४२०९० फॅक्स: २२४११९०
ई मेल- shreemahavirbank@rediffmail.com

**शाखा**

१) ९२, नवी पेठ, फोन: २२४२०९०
२) ८७, दाणा बाजार फोन: २२२९५९०
३) खॉजामिया रोड फोन: २२२५५३०९
४) शिरसोली रोड शाखा फोन: २२६०२८८
५) बांभोरी शाखा फोन: २२५८१६६
६) भुसावल शाखा फोन:(०२५८२) २२०४६८

## ठेवीवर व्याजाचे आकर्षक दर

| अनु. | कालावधी | सर्व सामान्य | ज्येष्ठ नागरीक/ सहकारी संस्था व ट्रस्ट |
|---|---|---|---|
| १) | ३१ ते ४५ दिवस | ६.००% | ७.००% |
| २) | ४६ ते ९० दिवस | ७.५०% | ८.५०% |
| ३) | ९१ ते १८० दिवस | ८.००% | ९.००% |
| [redacted] | | | |
| ५) | १८२ ते ३६५ दिवस | ९.५०% | १०.५०% |
| ६) | ३६६ ते ४५० दिवस | ११.००% | १२.००% |
| ७) | ४५१ दिवसांसाठी | १२.००% | १२.५०% |
| ८) | ४५२ ते ७३० दिवस | ११.००% | १२.००% |
| [redacted] | | | |
| १०) | ३ वर्षापेक्षा जास्त | ११.५०% | १२.५०% |

**बचत खात्यावर ७.०० % व्याजदर**


**विविध सेवा**

लॉकर सेवा उपलब्ध, शेअर डिमॅट, पॅन कार्ड, एल.आय.सी. सेवा, बी.एस.एन.एल.बील भरण्याची व्यवस्था, माफक शुल्कात आर.टी.जी.एस. व डी.डी. सुविधा, कोअर बँकींग व ए.टी.एम. सुविधा.

आपल्या जवळच्या शाखेस भेट देवून सेवेची संधी द्या.
श्री. दलुभाऊ जैन, चेअरमन

**जाहिरात सहकार्य: प्रा. बालदत्त गोखले, कार्याध्यक्ष, म.अ.प.**

# मराठी अर्थशास्त्र परिषदेस हार्दिक शुभेच्छा!



## दूनेश्वर सुर्यभानजी पेठे

**गट नेता**, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, म.न.पा., नागपूर

**महासचिव**, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, नागपूर शहर

**अध्यक्ष**, संजय गांधी निराधार योजना, पुर्व नागपूर

**नगरसेवक**, प्रभाग क्र. ३७-ब (हिवरी नगर)

**विशेष कार्यकारी अधिकारी**

*

**कार्यालय:** प्लॉट नं. २५, हिवरी ले-आऊट, नागपूर- ४४० ००८.
मो.नं. ९३७११७७६६२, ९३७१७७६६१२